# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. १७/०८/२००५

आज दि. १७/०८/२००५ रोजी दि. १२/०८/२००५ रोजीची मिरा भाईंदर महानगरपालिकेची तहकूब झालेली महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०५ दि. ०४/०८/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | श्री. पाटील मोहन मधुकर | सभापती, स्थायी समिती |
| ४) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सभागृह नेता |
| ५) | श्री. परशुराम दामोदर पाटील | विरोध पक्ष नेता |
| ६) | श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस | सभापती, महिला बालकल्याण |
| ७) | श्रीम. सपार उमा विश्वनाथ | उप-सभापती,महिला बालकल्याण |
| ८) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ९) | श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज | सदस्य |
| १०) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सदस्य |
| ११) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| १२) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| १३) | श्रीम. ज्युडी थॉमस डिसोझा | सदस्या |
| १४) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १५) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १६) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | सदस्य |
| १७) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १८) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १९) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| २०) | श्री. ओमप्रकाश गंगाधरजी अग्रवाल | सदस्य |
| २१) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| २२) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| २३) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| २४) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| २५) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २६) | श्री. नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| २७) | श्री. हंसुकुमार पांडे | सदस्य |
| २८) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २९) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| ३०) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| ३१) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| ३२) | श्री. रविंद्र भीमदेव माळी | गटनेता |
| ३३) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| ३४) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ३५) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ३६) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ३७) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ३८) | श्रीम. भोईर जयाबाई यशवंत | सदस्या |
| ३९) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४०) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सदस्या |
| ४१) | श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी | सदस्य |
| ४२) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ४३) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | सदस्या |
| ४४) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ४५) | श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ४६) | श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट | सदस्या |
| ४७) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ४८) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ४९) | श्रीम. उर्मिला कोमल भामरे | सदस्या |
| ५०) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ५१) | श्री. जेम्स कोलासो इजिदोर | सदस्य |
| ५२) | श्रीम. भानु भगवान पाटील | सदस्या |
| ५३) | श्रीम. गिता भरत जैन | सदस्या |
| ५४) | श्री. रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ५५) | श्री. शशिकांत रतिलाल शहा | सदस्य |
| ५६) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |
| ५७) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |
| ५८) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ५९) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ६०) | श्री. शरद केशव पाटील | सदस्य |
| ६१) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ६२) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |
| ६३) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्या |
| ६४) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ६५) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ६६) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ६७) | श्री. म्हात्रे तुळशीदास दत्तू | सदस्य |
| ६८) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ६९) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ७०) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ७१) | श्री. रमेश धरमचंद जैन | सदस्य |
| ७२) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ७३) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य |
| ७४) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |
| ७५) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ७६) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

## गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पाटील अशोक बळवंत | सदस्य |
| २) | श्रीम. गोहिल शानू | सदस्या |
| ३) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| ४) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ५) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| ६) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| ७) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सदस्य |
| ८) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |

वरिल प्रमाणे महासभेकरीता आवश्यक असणारा कोरम पूर्ण झाल्याने मा. महापौरांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यास सांगितले. त्यानुसार वंदे मातरम् राष्ट्रगीतानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

**मा. महापौर :-**

नमस्कार, मा. आयुक्त, मा. उपमहापौर, मा. विरोधी पक्षनेते, मा. सभागृह नेते, मा. उपआयुक्त व सर्व उपस्थित सदस्य तसेच मनपा अधिकारी व पत्रकार बंधू आपले सर्वांचे स्वागत. विषय पत्रिकेनुसार असलेल्या महत्त्वाच्या विषयावर चर्चा विनिमय करुन खेळीमेळीच्या वातावरणात सभेचे कामकाज पार पाडावे. प्र. सचिव साहेब सभेचे कामकाज सुरु करावे. धन्यवाद.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौरांची परवानगी असेल तर सभा सुरु करण्यापूर्वी मी त्यांची दोन मिनिटे मागत आहे. आपण महामारीला प्रत्येक पक्षातील लोक प्रत्येक सभासद महामारीला विजयश्री मिळविण्यासाठी प्रयत्न करीत आहात. आपले जागोजागी आरोग्य केंद्र चालू आहेत. आज कॉग्रेस पक्षातर्फे आपण १५ ऑगस्टला ५४ ठिकाणी आरोग्य शिबिरे लावलेली होती. आपण ३६,५०० लोकांना औषध वगैरे देण्याचे प्रकरण चालू केलेले होते. त्यामध्ये २०० लोकांना डेंग्यू, लेप्टोपायरेसीस झाल्याचे आढळून आलेले आहे. आपण त्या महामारीवर विजयश्री मिळवण्यासाठी आपणी जो लढा देत आहोत. आपल्याला ह्याच्यामध्ये विजयश्री मिळवला पाहिजे. माझ्याकडे काही शाळेमधील अभिभावकाच्या अशा तक्रारी आलेल्या आहेत की, ज्या शाळेतील विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात आहे. आपण आज सगळीकडे सांगतो की, पाणी उकळून प्या. मुलांना, पालकवर्ग घरुन पाणी उकळून देतात. परंतू त्या शाळेतील मुलांना त्या पाण्याचा वापर बाथरुमला करावा लागत आहे आणि त्यांना वर तेच पाणी प्यायचे आहे. आपण ह्याच्यावर कार्यवाही करण्याचे निर्देश द्यावे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सभेचे कामकाज सुरु करण्यापुर्वी मी महापौरांना........

**मा. महापौर :-**

मा. सदस्य आपण बसून घ्या. गेल्या वेळेस पण असेच झाले. आणि अशीच चर्चा वाढत जाते. आता सभेला सुरुवात झालेली आहे. नंतर आपल्याला बोलायची संधी मिळेल.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मी त्याचीच तुम्हांला जाणीव करुन देतो. नंतर तुम्ही बोलायला संधी देता ते तुमचे कर्तव्य आहे. संधी मागणे हे आमचे कर्तव्य आहे. कर्तव्यात चुकू नये पण चुकतो हे दाखविणे आमचे कर्तव्य आहे आपण ११ ची सभा असतांना १२.१० ला सभेत आला त्याबद्दल तुम्ही निवेदन करावे की, अशाच प्रकारे सभेचे कामकाज चालवणार आहात की, सभेमध्ये लेट आल्याबद्दल दिलगिरी व्यक्त करणार आहात. आमची ही मानसिकता कळू द्या.

**मा. महापौर :-**

महत्वाच्या विषयावर चर्चा करत असतांना आम्हांला येथे येण्यांस वेळ झाला त्याबद्दल आपल्या सर्वांची दिलगिरी व्यक्त करते.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम एवढा महत्वाचा विषय काय होता?

**मा. महापौर :-**

तो विषय आपल्या सभागृहासमोर येईलच. कळेलच आपल्याला.

**जयंत पाटील :-**

सभागृहात बहुसंख्येने नगरसेवक बसलेले आहेत. आपण सभागृहाला कुठलेही इंटीमेशन दिलेले नाही. आपण ११ वाजताची वेळ दिलेली आहे.

**लिओ कोलासो :-**

आपल्या सभेला खरोखर सुरुवात होताना उशिर झालेला आहे.

**रोहित सुवर्णा :-**

सगळे आदेश ॲन्टी चेंबरला जातात. परंतू इथे कोणीही येत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

ॲन्टी चेंबरमध्ये फालतू माणसांची गरज नाही. आम्हाला मेयर मॅडमची गरज आहे.

**लिओ कोलासो :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब आणि सन्मा सभागृह जेव्हा आमचे सहकारी सन्मा सदस्य जयंत पाटील व सन्मा. सदस्य रोहिदास पाटील आपले विचार व्यक्त केले.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी निवेदन केल्यानंतर मा. महापौरांनी आपल्या सभागृहापुढे दिलगिरी व्यक्त केल्यानंतर तुम्ही असे कसे बोलता?

**लिओ कोलासो :-**

या ठिकाणी हा विषय संपवायला पाहिजे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**मोहन पाटील :-**

सन्मा सदस्य मिलन म्हात्रे तुम्ही फालतू हा शब्द मागे घ्यावा.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम मा. उच्च न्यायालयाचे जस्टीस श्रीम. प्रतिभा उपासनी यांचे जजमेंट आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही सिद्ध करुन दाखवू शकतो.

**मोहन पाटील :-**

तुम्ही असे कसे शब्द वापरता.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे तुम्ही बोललेले शब्द मागे घ्या.

**रोहिदास पाटील :-**

ते जेव्हा बोलतात तेव्हा सत्ताधारी पक्षातील सदस्यांनी बोलायला पाहिजे का?

**मोहन पाटील :-**

मा. महापौरांनी दिलगिरी व्यक्त करुन सुचना मांडल्या, सन्मा सदस्य तुम्ही असे कसे बोललात.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडमनी दिलगिरी व्यक्त केल्यानंतर सभागृह नेते साहेबांनी तो विषय काढला. आम्ही तो विषय काढलेला नाही.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २४ चे वाचन केले.)

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मी तुमच्या निदर्शनास आणतो की, तुम्ही ज्या प्रोसिडींगला मंजूरी मागता त्याबाबत मी थोडासा खुलासा करतो की, गेल्या वेळच्या ६ तारखेला जी सभा झाली. त्या सभेमध्ये गणवेशाचा अत्यंत महत्वाचा विषय घेतला, याबाबत महापालिकेचा काय दृष्टीकोन आहे? तुम्हाला फक्त खर्चाच्या मंजुऱ्या घ्यायच्या आहेत, की त्याची विधीवत कर्तव्यपूर्ती करायची आहे. ह्या सभागृहामध्ये त्याचे काय महत्व आहे. तुम्ही या इतिवृत्तांताला आज मंजूरी घेत नाहीत. तुम्ही गणवेश देणार नाही का? कामकाज कसे चाललेले आहे? फक्त पाठीवर बोजा घेऊन त्याला मंजूरी दिली की कामकाज झाले. आम्हाला ज्या गोष्टी योग्य वाटतात त्याबाबत आम्ही पक्ष दृष्टीकोनातून विरोध नोंदवतो. परंतू तुमच्या कर्तव्याच्या काही जबाबदाऱ्या आहेत. मा. उपमहापौर साहेब, तुम्ही जोपर्यंत त्या इतिवृत्तांताला मंजूरी घेत नाहीत. तोपर्यंत तुम्ही गणवेशाची ऑर्डर देऊ शकत नाहीत. आज ऑगस्ट महिना संपलेला आहे. तुम्ही गेल्या १५ ऑगस्टला सुद्धा गणवेश वाटले नाही. हा फक्त प्रशासकिय कामकाजाचा भाग आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब सर्वप्रथम तुम्ही खुलासा करा की, इतिवृत्ताताला मंजूरी मिळाल्यानंतर जो ठराव आला तो ठराव महापालिकेला इम्प्लिमेंट करता येतो का?

**प्र. सचिव :-**

ठराव सभागृहात वाचला तरी अमंलबजावणी करता येतो.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही ठराव वाचत नाही, मग तुम्ही गणवेश कसा घेणार. या ठिकाणी ८४ लोक आहे, अधिकारी आहेत, पत्रकार आहेत, मग कामकाज कसे चाललेले आहे.

**प्र. सचिव :-**

मग ती दुरुस्ती करता येईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

इतिवृत्तांताला मंजूरी न देता त्या विषयाच्या प्रोसिडींगला अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग, जो ठराव करतात तो इम्प्लिमेंट करता येत काय ते सांगा?

**प्र. सचिव :-**

सभागृहात ठराव वाचून झाल्यावर त्याप्रमाणे कार्यवाही करता येते. त्याच्यानंतर एखादा ठराव वाचून झाला नसेल किंवा इतिवृत्तांत मंजूर झाले तरी कार्यवाही करता येते असे दोन पर्याय आहे.

**शशिकांत भोईर :-**

सचिव साहेब, काय नियम आहेत ते तुम्ही प्रथम बघा.

**रोहिदास पाटील :-**

तुमचे काय नियम आहेत ते जरा आठवा. तुमचे लेखी पत्र असे आहे की, जोपर्यंत इतिवृत्तांताला मंजूरी मिळत नाही. तोपर्यंत तुम्हाला सभागृहाच्या कामकाजाचे लेखी उत्तर देऊ शकत नाही. तुम्ही हे पत्र दिलेले आहेत. तुम्हाला आठवते का?

**प्र. सचिव :-**

त्या ठरावाचे सभागृहात वाचन झाले तर त्याप्रमाणे त्याच्यावर कार्यवाही करता येते.

**रोहिदास पाटील :-**

परंतू, या ठिकाणी ठराव वाचून झालेला नाही.

**शशिकांत भोईर :-**

सचिव साहेब, ठरावाचे वाचन सचिवांनी केले पाहिजे. त्याच्यानंतर त्याच्यावर अमंलबजावणी होईल. अधिनियम काय बोलतो ते तुम्ही बघा.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही ह्याच्या आधीचा ठराव घेतलेला नाही. याच्यापुढे एक महिन्यानंतर सभा लागणार आहे. मग तुम्ही एक-दिड महिन्यानंतर काय घेणार? तुम्हाला मंजूरी मिळाली. सगळे मिळाले परंतू त्याचे इम्प्लिमेन्टेशन होत नाही. मग त्याचा काय उपयोग आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल, तुमची सुचना लक्षात आलेली आहे. पुढच्या सभेला घेण्यात येईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम एक महत्वाचा ठराव पार झालेला आहे. त्या ठरावा वर इम्प्लिमेंटेशन करण्यासाठी अधिकारी वर्ग बोलतो की, जोपर्यंत प्रोसिडींगला मंजूरी मिळत नाही तोपर्यंत प्रोसिजर करणार नाही.

**शरद पाटील :-**

मग महापौर मॅडम, प्रत्येक मिटींगचे इतिवृत्तांत तयार करायला एक महिन्याचा कालावधी मिळतो. परंतू, ते इतिवृत्त न येता तुम्ही दोन-दोन मिटींगचे इतिवृत्त का आणता?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही सगळे एका ठरावाला इम्प्लिमेंटेशन करु शकतात. आणि एका ठरावाला आधिकाऱ्यांचा नकार आहे. मॅडम, तुम्ही उत्तर द्या. तुम्ही जर इतिवृत्तांताप्रमाणे कामकाजाला सुरुवात करता तर मागच्या वेळेला एक महत्वाचा ठराव पास झालेला आहे. त्याबद्दल तुमचे काय मत आहे? लोकांच्या प्रॉपर्टीच्या पैशाचा महत्वाचा विषय होता. याठिकाणी ठराव मंजूर झालेला आहे. आपण त्याबद्दल काय करणार, त्याबद्दल प्रथम मला सांगा. तुम्ही त्याबाबत अधिकाऱ्यांना सुचना करा. सचिवसाहेब तुम्ही याठिकाणी कर अधिकाऱ्याला बोलावून पुढची प्रोसिजरप्रमाणे त्यांना पुढचे कामकाज करायला सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

आम्हाला सभागृहामध्ये मंजूरी मिळाली नाही असे सांगून कार्यवाहीला टाळाटाळ होते. सगळ्या नगरसेवकांना अधिकारी वर्ग निर्भिडपणे अगदी सरळ सांगतो की, ठराव मंजूर झालेला नाही. इतिवृत्तांताला मंजूरी न मिळाल्याने कार्यवाही करता येणार नाही. मग तो कोणताही नगरसेवक असो. तुम्ही या उपविधीमध्ये लिहिलेले आहे की, तुम्हाला दुसऱ्या मिटींगला मंजूरी घेतली पाहिजे.

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौराच्या आदेशाने बोलतो की, सन्मा सदस्य ओमप्रकाश अग्रवाल व सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांचा गणवेशाचा विषय होता. तसेच इतिवृत्त आले नाही असे आपले म्हणणे असेत तर मागच्या दोन मिटिंगचे इतिवृत्त तुमच्याकडे आहे. सदरचे इतिवृत्त १५० पानांचे आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जोपर्यंत मागच्या सभेच्या इतिवृत्तांताला मंजूरी मिळत नाही. तोपर्यंत त्या इतिवृत्तांताच्या ठरावाला प्रशासकिय कामकाज सुरुवात करु शकतो का? याचे आम्हाला उत्तर पाहिजे.

**मा. उपमहापौर :-**

जेव्हा गणवेशाचा विषय झाला. विद्यार्थ्यांना गणवेश मिळाले पाहिजेत. ही अत्यंत महत्वाची बाब आहे. अगोदरच आपल्याला थोडासा उशिर झालेला होता. ज्या दिवशी ठराव झाला त्या दिवशी आपण ऑर्डर केलेली आहे. आपण दि. १५ ऑगस्ट पर्यंत कपडे देणार आहोत अशा प्रकारे त्यांनी सांगितलेले होते. अजूनपर्यंत ते गणवेश आलेले नाहीत. परंतू, जेवढी इतिवृत्त पेंडीग आहेत. त्या इतिवृत्तांताना मान्यता दिल्यानंतर आपण सुरुवात करीत असतो. परंतू जेव्हा ठराव मंजूर होतो तेव्हा तो ठराव विधीवत अधिकृत

असतो आणि त्याप्रमाणे कार्यवाही करावयाची असते. परंतू तातडीची बाब म्हणून आपण गणवेशाची अमंलबजावणी केली. इतिवृत्त आले नाही. परंतू पुढच्या सभेला ते इतिवृत्त आणून देणार.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हा एक महत्वाचा विषय आहे. कारण लोक त्यांचे कराचे पैसे करायला तयार आहेत. आपण ठराव पास केलेले आहेत. मग त्याला महत्व नाही का?

**मा. उपमहापौर :-**

ते इतिवृत्तदेखील येणार आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही अधिकाऱ्याना कामाला सुरुवात करण्याचे आदेश द्या. तो सुद्धा एक महत्वाचा विषय आहे. महापालिकेच्या उत्पन्नाचा विषय आहे.

**मा. उपमहापौर :-**

सदर बाबत जो कर संकलकाचा ठराव झालेला होता. त्याचे इतिवृत्त तयार करुन लगेच पुढच्या सभेत आणले जाईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. उपमहापौर साहेब, तुम्ही असे डाव्या बाजूने जाऊ नका. तो एक महत्वाचा विषय आहे की, ज्याच्यामध्ये नगरपालिकेचे उत्पन्न आहे. या करदात्याकडून नगरपालिकेचे उत्पन्न भरण्यास तयार आहे आणि महापालिका ठरावाचे इम्प्लिमेन्ट करीत नाही. तुम्ही एका ठरावाला मान्यता देता आणि तुम्ही एका ठरावाला इम्प्लिमेंट करायला उशीर आहे असे सांगता असे चालणार नाही. तुम्ही अधिकाऱ्यांना कार्यवाही करायला सुरुवात करण्याचे आदेश द्या. ह्याच्या इतिवृत्तांताला मंजूरी मिळाली नाही. म्हणून आम्ही कार्यवाही करु शकत नाही असे त्यांनी उत्तर देऊ नये. ते नागरिकांना ते असेच उत्तर देतात. तुम्ही अधिकाऱ्यांना सुचना करा.

**रोहिदास पाटील :-**

त्याही ठरावाची अमंलबजावणी सुरु होईल असे तुम्ही जाहिर करा. मग चार महिन्याने इतिवृत्तांताला मंजूर घ्या. साधी सरळ मागणी आहे. त्याच्यामध्ये काहीही चूक नाही. एक अत्यंत महत्वाची बाब म्हणून आपण गणवेशाची ऑर्डर दिलेली आहे. महापालिकेच्या उत्पन्नाचे नागरिकांच्या सोयीचे म्हणून त्यांच्या नियमात जे टॅक्स बसतात ते टॅक्स स्विकारले जातील असे मा. महापौरांनी सभागृहात जाहिर करावे. उद्यापासून लोक येऊन टॅक्स भरतील.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो की, सन्मा. सदस्यांनी प्रोसिडींग मंजूरीच्या विषयावर त्यांचे भावनात्मक विचार व्यक्त केले की, आपल्या महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश देण्याची प्रक्रिया प्रोसिडींग मंजूर न झाल्यामुळे थांबलेली आहे. अशा स्वरुपाचा त्यांचा विचार असावा असे मला वाटते. परंतू, याच्यामागे अशी भुमिका आहे की, जेव्हा सभागृहामध्ये ठराव पारित होतो. तेव्हा आपण तो ठराव संपूर्णपणे लिखित स्वरुपात सभागृहाला देत असतो. प्रोसिडींग मंजूरी हा आपला एक प्रघात आहे. प्रोसिडींग मंजूरी कालांतराने सुद्धा होऊ शकते. परंतू एकदा सभागृहामध्ये ठराव पास झाला की त्याप्रमाणे हे कार्यवाहीचे मुद्दे असतील त्याचे वर्क आदेश किंवा कार्यादेश वैगरे आपण काढू शकतो. सन्मा. सदस्यांनी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी गणवेशाबाबतचा जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. ते गणवेश खरेदी करण्याबाबत कार्यादेश झालेले आहेत किंवा नाहीत त्याची आम्हाला माहिती द्या.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य लिओ कोलासो साहेब, त्यांनी सांगितलेले आहे की ऑर्डर दिलेली आहे. जर तुम्ही त्यापद्धतीने ती इम्प्लिमेंट्करता तसा जो टॅक्सचा विषय आहे. तो सुद्धा ठराव झालेला आहे. तो तुमच्या म्हणण्यानुसार होणार त्याचेही रुलिंग द्या की, उद्यापासून त्या अधिकाऱ्यांचे पैसे स्विकारावे.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या महासभेत मंजूर झालेले ठराव सहा-सहा महिने मा. आयुक्त साहेबांकडे कार्यवाहीला जात नाही.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडमनी रुलिंग दिले होते की, तो विषय पुढच्या सभेत विषयपटलावर जो विषय आणावा आणि तो विषय घ्यावा.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील यांना विषय कुठला आहे तेच माहिती नाही.

**मोहन पाटील :-**

मला विषय माहिती आहे. सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांनी 'ज' खाली प्रस्ताव आणला होता. त्यावेळी मा. महापौर मॅडमनी सांगितले होते की आम्ही तो विषय पुढच्या सभेला विषयपटलावर घेणार आहोत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. उपमहापौर साहेब, ती प्रोसिडींग वाचून दाखवा. मा. उपमहापौरांनी मा. महापौरांच्या वतीने निवेदन केलेले होते, निर्णय दिलेला होता.

**शशिकांत भोईर :-**

सत्ताधाऱ्यांनी ते घ्यायला पाहिजे होते.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम तुम्ही या ठिकाणी 'ज' चे प्रस्ताव व इतर प्रस्ताव मांडता, मग तुम्ही विद्यार्थ्यांचा प्रस्ताव का मांडत नाही. तुम्ही ह्या मिटिंगला हा ठराव मांडा. आपण पुढच्या मिटींगला हा ठराव कधी मांडणार मुलांना गणवेश द्यायला सहा महिने राहिलेले आहे. ते गणवेश दि. २६ जानेवारीला द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

प्रत्येक वेळेला मा. महापौरांच्या वतीने मा. उपमहापौर निर्णय देतात. त्यासभेला मा. महापौरांनी ठराव मंजूर झाल्याचा निर्णय दिलेला आहे. आज पुन्हा मा. सभापती साहेब या सभागृहाची दिशाभुल करतात. या गोष्टीचा आम्ही या ठिकाणी निषेध करीत आहे, सभापतींचा. तुम्ही सभागृहाची दिशाभुल करीत आहात.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण बसुन घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपणाला या गोष्टीचा खुलासा करावा लागेल.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांनी 'ज' बाबत जो प्रस्ताव मांडलेला होता. त्या प्रस्तावावर सभागृहात चर्चा होऊन मा. उपमहापौर साहेबांनी मा. महापौरांच्या वतीने रुलिंग दिलेले होते की, सदरचा विषय रितसर विषयपत्रिकेवर घेऊन आपण पुढच्या सभेत आपण आणू.

**शुभांगी नाईक :-**

तो विषय आणलेला नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही सभागृहाची दिशाभुल करुन हा ठराव झालेला आहे.

(सभागृहात गोंधळ)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख विषयाची माहिती नसेल तर बोलू नका.

**आसिफ शेख :-**

मा. उपमहापौर साहेबांनी याचे समाधान होईल तसा खुलासा करावा.

**रोहित सुवर्णा :-**

आपण गरिब मुलांना युनिफॉर्म देत आहोत.

**मिलन म्हात्रे :-**

सचिव साहेब, तुमची नियमावली ५ नंबरच्या पानावर न (क), न (ड) हे फक्त वाचा आणि मग त्याच्यावर मा. महापौरांनी रुलिग करावे. तुम्ही उपविधी मागवून घ्या. कारण तुम्हाला ह्याला बायडींग राहूनच निर्णय द्यायचा आहे. आता सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी सांगितले ह्या इतिवृत्तांतामध्ये पुढे तुमचे निर्णय येणार आहेत. ते थोड्यावेळापूर्वी चर्चेला येणार आहेत. ते आम्ही काढलेले आहेत. माझी अशी विनंती आहे की न(क), न(ड) वर तुम्ही निर्णय द्या.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो की, प्रत्येक महासभेला विधी सल्लागारांना हाऊसमध्ये बसवा म्हणजे आपल्याला अशी अडचण येणार नाही. ते विधी सल्लागार आणि विधी सल्लागार कुठे गेले?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा, तुम्ही खाली बसा. मी तुम्हाला बोलायला परवानगी दिलेली नाही.

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य, ओमप्रकाश अग्रवाल साहेबांनी मागच्या मिटींगमध्ये घरपट्टीच्या सुधारणा संबंधी काही ठराव ठेवलेला होता. त्यांची अशी मागणी होती की, ज्या संकुलामध्ये एखाद्या इमारतीमध्ये एखाद्या व्यक्तीला एकच टॅक्स आहे. दहा लोकांना ३० पैसे टॅक्स लागलेला असतो आणि नविन आलेल्या माणसासाठी टॅक्सबाबत काही फरक आहे. ते सर्व टॅक्स समान असावेत. अशाप्रकारचा आपला ठराव होता.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, तो माझा ठराव नव्हता. तो ठराव स्थायी समितीने पास केलेला होता.

**मा. उपमहापौर :-**

मी त्यावेळेला या डायस वरुन खाली उतरुन आपल्याकडे आलो होतो आणि आपल्याला त्या ठरावाबाबत सांगितले होते. मी आणि सन्मा. सदस्य मिलन म्हात्रेसाहेब, स्थायी समितीचे सदस्य असतांना तो ठराव आला होता अणि त्या ठरावावर चर्चा झालेली होती. आपल्याकडे 'ज' चा प्रस्ताव असताना ठराव आला तेव्हा मी स्वतः डायसवरुन उतरुन आपल्याकडे आलो आणि तुम्हाला विनंती केलेली होती की, 'ज' च्या प्रस्तावातुन आलेला विषय आहे. परंतू आपण त्याला विधीवत आणल्यास आपल्याला या विषयाबाबत सखोल अभ्यास हवा होता की, अशी टॅक्सेबल प्रॉपर्टीज किती आहेत. माझ्या माहितीप्रमाणे अंदाजे रु. १० ते १२ लाखांच्या प्रॉपर्टीज बाबतचा तो प्रश्न होता. कदाचित कमी-जास्त निघू शकतात. आपल्याला त्याच्यामध्ये टॅक्स, लावण्याचे प्रघात असतो. जेव्हापासून नविन बांधले तेव्हापासून असतात किंवा एखाद्या माणसाने कुठल्या वर्षी टॅक्स लावला तेव्हापासून असते. यासाठी आपला एक विशिष्ट नियम तयार व्हायला पहिजे आणि तो विषय विधीवत सभागृहात आणून आपण त्याच्यावर चर्चा केली पाहिजे. परंतू, त्या दिवशी आपण हा विषय मांडण्यासाठी भावनिक दृष्ट्या एवढे सक्षम आणि आतुर होतात. लोकांना न्यायच द्यायचा आहे. आपण त्या दिवशी तो विषय 'ज' चा प्रस्तावातून आणला. आपल्या सभागृहातून वारंवार सन्मा. सदस्यांनी विनंती केलेली होती. सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेबांनी असे सांगितले होते की, पुढच्या वेळेला ठराव आणतांना त्यांचे सुचक आणि अनुमोदक तुम्ही रहा, अशाप्रकारची सुचना केलेली होती. हा ठराव विधीवत आणल्यानंतर त्याचे सुचक आणि अनुमोदक आपण राहिलात तरी चालेल. ह्या विषयामध्ये कुठलीही प्रतिष्ठा करण्याचे कारण नव्हते. तरीसुद्धा आपण तो विषय आणला होता. आणि सदर मोगम ठराव मांडला होता. त्याच्यावर कार्यवाही व्हावी, त्याच्यामध्ये काही अडचणी असल्यास तो भाग पुन्हा सभागृहाच्या निदर्शनास आणावा अशा प्रकारची विनंती मी कर संकलांना करित आहे. त्या ठरावाच्या कार्यवाहीला सुरुवात होणार आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो की, आता मा. उपमहापौरसाहेबांनी टॅक्सच्या बाबतीत खुलासा केलेला आहे. टॅक्सच्याबाबतीत जुने आणि नवे यांच्याविषयी आपल्या नगरपरिषदेमध्ये मी प्रशासनाला खुप वेळा निवेदन दिलेले आहे. आणि सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांनी याठिकाणी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्याबाबत मी जे निवेदन दिलेले होते त्याचे उत्तर देखील दिलेले नाही. मग यांना जुन्या पद्धतीने टॅक्स लावायाचा की नविन पद्धतीने लावायचा याचे देखील उत्तर मला दिलेले नाही. आपण आता 'ज' खाली आलेल्या प्रस्तावाचे तांत्रिकी उत्तर दिलेले आहे. माझ्या निवेदनाचे उत्तर दिलेले नाही. त्याबाबत तुमचे काय म्हणणे नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. उपमहापौर साहेब आपण आपल्या निवेदनामध्ये कार्यवाही सुरु करण्याचा आदेश अधिकाऱ्यांना दिलेला आहे.

**जोजफ घोन्सालविस :-**

सचिव साहेब, पान क्र. ३० मध्ये माझे वक्तव्य आहे की, सन्मा. सदस्या हेलन गोविंद या निष्क्रिय आहे असा माझा बोलण्याचा उद्देश नव्हता. हे वाक्य चुकीचे आहे. जरा दुरुस्ती करुन घ्या.

**केशव घरत :-**

सचिव साहेब, पान क्र. २२ वर शेवटच्या ओळीवर प्रत्येक वेळेला त्याची तीच चुक असते. त्या वाक्यामध्ये तिच हा शब्द पाहिजे.

**रोहित सुवर्णा :-**

पान क्र. ३ वर खाली आमदार हितेंद्र ठाकूर असे पाहिजे होते. त्या ठिकाणी आमदार हा शब्द टाकलेला नाही. तो शब्द टाकावा.

**मिलन म्हात्रे :-**

पान क्र. ४३ वर माझ्या नावाखाली वरुन जो मोठा पॅरेग्राफ मध्ये शेवटी तुम्ही या विषयाबद्दल कसलीही आस्था नाही त्या ठीकाणी तुम्ही या शब्दा ऐवजी तुम्हाला हा शब्द पाहिजे.

**प्रफुल्ल पाटील :-**

पान क्र. ८ वर पाचव्या ओळीवर कायद्याच्या तरतुदीप्रमाणे असे नाही. आठव्या ओळीवर कोणीही हे शब्द नसून कोणतीही हा शब्द पाहिजे. पान क्र. २७ मध्ये शेवटून तिसऱ्या पॅरेग्राफमध्ये आपण चर्चा करा नाहीतर आम्ही बाहेर जातो असे पाहिजे. पक्षाच्या लेव्हलला आणू नये असे पाहिजे. पान क्र. २८ वर दुसऱ्या पॅरेग्राफमध्ये तुम्हीसुद्धा हे काम करु नका असे नसून तुम्हीसुद्धा इथे काही करु नका असे पाहिजे. पान क्र. ३६ वर २२ व्या ओळीवर एस.टी.पी. प्लान नसून प्लॅन्ट पाहिजे. पान क्र. ३८ वर सुरुवातीच्या सहाव्या ओळीवर श्री. शेख यांच्याकडे श्री. बेलवटे यांनी एक ठराव दिला असे नसून श्री. शेख यांच्याकडे श्री. बेलवटे यांनी एक ठराव दिला असे पाहिजे. पान क्र. ४५ वर सभा चालवायची असेल तर असे लिहिलेले आहे, त्याच्याऐवजी नसेल तर असे पाहिजे. त्याच्यानंतर सहाव्या पॅरेग्राफमध्ये १२ व्या ओळीवर त्या सर्व बाबींचा सर्वकष निकाल

लागेपर्यंत असे पाहिजे. १६ व्या ओळीवर त्यांच्या चरणांवर डोके ठेवायला द्या. पान क्र.४५ वर त्यांच्या खाली कुठेतरी गालबोट लागावे असे पाहिजे. त्याच्या खाली दुसऱ्या ओळीवर मांडण्याचा राष्ट्रवादीला अधिकार आहे. तो घटनात्मक अधिकार आहे. त्याच्याऐवजी ठरवावे हा शब्द पाहिजे. त्याच्या खाली दुसऱ्या ओळीवर सभाशास्त्राप्रमाणे चालत नाही ऐवजी चालत नव्हते असे पाहिजे. शेवटून चौथ्या ओळीवर एक्सपर्ट ठेवलेला आहे. त्याला विचारा याच्याऐवजी त्यांना विचारा असे पाहिजे. कारण मी हे सन्मानाने बोललो होतो. शेवटच्या ओळीमध्ये नियमामध्ये तरतुदीचा नसून नियमांमधील तरतुदीचा पाहिजे. पान क्र. ५४ वर खालून १२ व्या ओळीवर तहकुब करण्यात आली ते नसेल टाकलेले आहे आणि ६ व्या ओळीवर कामकाज नियम हा शब्द काढून टाका.

**मिलन म्हात्रे :-**

पान क्र. ५३ वर सन्म. सदस्य मिलन म्हात्रे हा मोठा पॅरेग्राफ आहे. त्याच्यामध्ये सचिवांनी प्रकरण क्र. २ करीता आलेले सुचक सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील आणि अनुमोदक सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांच्या ठरावाचे वाचन केले. वास्तविक पाहता सभागृहामध्ये जे वाचन होते. आपण जे चांगले वाईट बोलतो किंवा आपण बोलतो की विषय या संपूर्ण ह्याच्यामधून हे शब्द मा. महापौरांनी गाळण्याचा किंवा काढून टाकायचे आदेश द्यावेत याचा काय अर्थ होतो? सभाशास्त्रानुसार जे शब्द ह्याच्यामध्ये लागू होत नाहीत. आपण ज्याला अपशब्द किंवा अपमानास्पद शब्द बोलतो ते काढून टाकावे. म्हणजे सभागृहात जी चर्चा होते ते जशीच्या तशी रि रिपीट झाली पाहिजे. हा नियम आहे. तुम्ही ते नियम बनविलेले आहेत. त्याच्यामध्ये ते दिलेले आहे. परंतू आपण तीन-तीन ठिकाणी लिहिलेले आहे की, प्र. सचिवांनी वाचन केले. आम्ही दिलेल्या ठरावावर तुम्ही काही सुधार करता. आम्ही बोलतो की आपण केलेला सुधार आम्हाला चालेल. तो जो. मॉडीफाय झालेला ठराव आहे. त्याचे वाचन इतिवृत्तातांमध्ये जसेच्या तसे आले पाहिजे. म्हणजे सब्जेट टू कंडीशन पाहिजे. आम्ही पान क्र. ५३ ला मंजूरी देत आहोत. पान क्र. ५४ वर वाचन केले असे आलेले आहे. पान क्र. ५५ वर स्थायी समितीचे सभापती मोहन पाटील यांनी स्वातंत्र्य सैनिकांच्या स्मारकाला लोकल केलेले आहे. हा काय प्रकार आहे तेच मला कळत नाही. लोकल म्हणजे काय? ते लवकर असावं. ते लोकल नसावे.

**प्र. सचिव :-**

त्या ठिकाणी लवकर हा शब्द आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

पान क्र. ६८ वर शेवटून दुसऱ्या ओळीवर अडचणीचा आहे. म्हणुन आपण या गोष्टी वगळा.

**मिलन म्हात्रे :-**

पान क्र. ६९ ला एक महत्वाचे आहे. आपल्याकडे आपला एक आदेश आहे. पाटील साहेबांचे भाषण आल्यानंतर आपण एक रुलिंग दिले. ते एक महत्वाचे रुलिग आहे. हा संपूर्ण विषय म्हणजे फंडस् आपण आता ज्या परिस्थितीमध्ये सफरिंग करतो म्हणजे ज्यावेळेला सन्मा. सदस्य मायरा मेन्डोसा महापौर होत्या. त्यावेळेला सुद्धा या विषयावर प्रत्येकजण बोलले होते. सन्मा. सदस्य चंद्रकांत वैतीसाहेब माझ्याबरोबर स्थायी समितीला असतांना बऱ्याच गोष्टींवर चर्चा झाली. परंतू प्रत्यक्ष काहीही झालेले नाही. मॅडम वास्तविक पाहता या विषयपत्रिकेमध्ये आपले जे रुलिंग होते. हा तुमचा अपमान आहे. आम्ही जर हे रुलिंग मिडियामध्ये घेऊन गेलो तर आम्ही तुमच्याकडे टिकेचा भडीमार करुन शकतो. परंतू आम्हाला तो टिकेचा भडीमार करायचा नाही. कारण आमच्याकडे हे रुलिंग येऊन दहा-वीस दिवस व्हायला आहे. परंतू मा. महापौरांच्या एवढा मोठा निर्णय असूनसुद्धा प्रशासनाने म्हणजे त्याच्यामध्ये तुमच्या प्रशासनाची मंजूरी किंवा आर्थिक तरतुदी वैगरे काहीही नाही. ह्याच्यामध्ये कसलाही आर्थिक विषय नाही. फक्त विषय घ्या. कागदाची खाणापूर्ती करुन त्याच्यावर ठराव पास करुन तुम्हाला बँकेत एखादे अकाउंट खोलावे लागणार आहे. एवढेच तुमचे काम आहे. किती पैसे जमतात, तो भाग महत्वाचा नाही. मॅडम, ह्या संपूर्ण प्रोसिडींगला तुम्ही दिलेला निर्णय आहे. मघाशी सन्मा. सदस्य मोहन पाटील बोलत होते. स्थायी समितीचे अनेक सन्मा. सदस्य तसेच मा. उपमहापौरसुद्धा या ठिकाणी बसलेले आहेत. मी पुन्हा एकदा सांगतो की, आम्ही महत्वाच्या विषयांवर अनेक ठराव पास केलेले आहेत. प्रशासन, कमिशनर साहेब किंवा अन्य कोणाकडे सचिव कार्यालयाकडून सदर ठराव पोहचत नाही.

**म. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे, तुम्ही तुमच्या सुचना थोडक्यात मांडा.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही ह्याच्यावर रुलिंग द्या.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्याच्यामध्ये तुमची काय दुरुस्ती आहे ती सुचवा.

**मिलन म्हात्रे :-**

हा विषय विषयपत्रिकेवर आलेला नाही. हिच खरी चूक आहे. तुम्ही पुढच्या मिटींगचे ॲश्युरन्स दिलेली आहे. तो विषय ह्या मिटींगमध्ये आला नाही. मग तो विषय ह्या मिटींगमध्ये का आला नाही? ती सभा तहकूब

झाली. त्याची तारिख बघा. ही दि. १७ एप्रिलची सभा आहे. दि.१७ एप्रिल नंतर मे महिन्यामध्ये सभा झालेली नाही. आता ऑगस्ट महिना चालू आहे. ह्या तीन सभा गेल्या. आपला एवढा महत्वाचा डीसीजन असून सुद्धा सचिव कार्यलयातून निर्णय गेलेला नाही. तुम्ही या विषयापत्रिकेचे आम्हाला सांगा की, तुम्ही हे विषय पुढच्या सभेला घेऊ शकता का? तुम्ही तो विषय आज घेणार का? कारण त्याच्या पॉवर्स तुमच्याकडे आहेत. हा विषय तुम्ही आजच्या सभेत घेऊ शकता का? ठराव करुन विषय घ्या.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे, मी तुमच्या माहितीसाठी सांगिते की, गेल्या वेळेला मा. महापौर दालनामध्ये महापौर निधी उभा करण्यासाठी तातडीची सभा लावलेली होती. त्या सभेमध्ये सविस्तर चर्चा झालेली आहे. आणि आपल्याला ते निधी तयार करायचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मॅडम, आपल्याला हा फन्ड अकाऊन्टला ठेवायचा आहे. हा अकाऊन्ट बॅंकेमध्ये स्पेशल उघडला जातो. आपल्याला त्याच्यासाठी ठराव लागणार आहे. तो दोन ओळीचा ठराव घ्या. म्हणजे विषय संपला. आजच्या सभेला अत्यावश्यक बाब म्हणून घेतला तरी चालेल आमची हरकत नाही.

**मा. महापौर :-**

आजच्या सभेत तसे करुन घेऊया.

**रोहित सुवर्णा :-**

पान क्र. ६९ मध्ये ज्या ठिकाणी तत्कालीन मा. आयुक्त साहेब बोलतात त्या ठिकाणी त्यांनी अशा प्रकारची विचारणा केलेली आहे. आम्ही त्याच्यावर जिल्हाधिकाऱ्यांना लिहिलेले आहे की, आपल्या वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेंतर्गत त्या ठिकाणी आवास हा शब्द नाही. अंतर्गत गरीबीसाठी जी घरे द्यायची आहे. त्यासाठी बाजार १३ वी ओळ आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

पान क्र. ७८ मध्येच जी. आर. आपल्या पालिकेला दि. ०२/११/२००२ रोजी प्राप्त झालेला आहे. दुर्दैवाने दि. २/११/२००२ पासून दि. ०२/११/२००५ पर्यंत त्या ठिकाणी चार महिने लिहिलेले आहे. तिथे चार वर्षे गेली असे पाहिजे.

**रोहित सुवर्णा :-**

पान क्र. ७२ वर माझे वक्तव्य असे आहे की, मा. महापौर मॅडम, वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर पाहिजे होते. ते नगर नाही. पान क्र.७३ मध्ये ठराव क्र. ४ मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालयाच्या इमारती आवारातील उद्यानात बसविण्यांत यावा. त्यांनी इंग्लंड, अमेरिका या देशात जाऊन अर्थशास्त्रावर मोठया पदव्या मिळविल्या. ते बॅरिस्टर झाले. एम.ए. झाले या ठिकाणी ए. हा शब्द नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

पान क्र. ७९ वर मधला पॅरेग्राफ चार बाकी म्हणजे चार राहिलेला नाही. शेवटची ओळ तेव्हा ती पदे भरुन झाल्यानंतर प्रतिक्षा यादी कुठे राहिली? ती पदे भरुन झाल्यानंतर पाहिजे. पान क्र. ८० मध्ये जो ठराव आला होता. हा ठराव जेव्हा सभागृहात वाचून दाखविला तेव्हा त्याची शेवटची ओळ जी त्याच्यामध्ये ॲड केलेली आहे की प्रतिक्षा यादीतील उमेदवारास मंजुरी देण्यात येत आहे अशाप्रकारे ठराव वाचून दाखविलेला नव्हता. ही दुरुस्ती आम्ही ऐकली म्हणून सुचवितो. जे ठराव मांडणारे अनुमोदक आहेत. त्यांनी हयाच्यावर स्पष्टीकरण केले पाहिजे. कारण सचिवसाहेबांनी ठरावाचे वाचन कलेले होते. प्रतिक्षा यादीतील उमेदवारास मंजुरी देण्यात येत आहे अशाप्रकारचे वक्तव्य केलेले नव्हते. आपणही तो ठराव वाचताना असे वक्तव्य केलेले नव्हते. पान क्र. ८१ वर तिस-या पॅरेग्राफमध्ये मघाशी झालेल्या ठरावावरच्या चर्चेत असे पाहिजे. पदोन्नतीच्या विषयावर बोलायचे झाले तर जेव्हा आपण मघाशी त्याच्यामध्ये झालेल्या ठरावावरील चर्चेत पाहिजे. त्याच्यानंतर शेवटच्या ओळीत सेवा शर्ती नियम नको आणि पदोन्नतीला मात्र आणि यांनी मात्र आले. यांनी मात्र पदोन्नतीला मात्र सेवाशर्ती नियम पाहिजेत. त्याच्या अगोदर म्हणजे पुन्हा यांना नवीन नेमणूकीला. शेवटचे वाक्य परत वाचतो. म्हणजे पुन्हा त्यांना नवीन नेमणुकीला सेवा शर्ती नियम नको आणि पदोन्नतीला सेवा शर्ती नियम पाहिजेत. आपले हे वागणे बरोबर आहे.

**रोहित सुवर्णा :-**

पान क्र. ९५ मध्ये ठराव क्र. ८ उपरोक्त प्रकरण क्र. ५ नुसार विकास नियंत्रण नियमावलीमध्ये आर.टी.पी. म्हणजे महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना १९६२ च्याऐवजी १९६६ आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

पान क्र. ८८ वर शेवटून पाचव्या पॅरेग्राफमध्ये चौथी ओळ राष्ट्रवादीवाल्यांनी उगाचच कोलदांडा घातला असे मी बोललो होतो. परंतु, या ठिकाणी कोलंडा म्हटलेले आहे. त्याच्यानंतर शेवटी वर्ग-४ चे कर्मचारी वर्ग-३ मध्ये जाताना असे नसुन वर्ग-३ मध्ये पदोन्नती देण्यासाठी सेवा प्रवेश नियमांची गरज नाही.

त्याच्या खाली माझे वक्तव्य आहे की विषय वर्ग-४ चे वर्ग-३ मध्ये पदोन्नती करण्याचे आहेत. सचिव आमचे ठराव कुठे जातात? सचिव आमचा ठराव तुमच्याकडे आणलेला आहे का? आमचा ठराव तरी हरवू नका असे पाहिजे. पान क्र. ८९ मध्ये वरुन चौथी ओळ आहे मा. सभापतीसाहेब, तुम्ही नियमाने बोलतात. आम्हाला वाटले तर देउ ते दयायला आपल्या घरातील टोपलीतले सामान नसुन टोपलीतले सामान आहे का? असे पाहिजे. तेराव्या ओळीमध्ये प्रवेश नियम नाहीत. म्हणून तुम्ही आता वर्ग-४ ला पुन्हा कोलंडा म्हटलेले आहे. त्या ठिकाणी कोलदांडा पाहिजे. त्याच्यानंतर सहावी ओळ आहे की माझे सेवा शर्ती, नियम तुमच्या पालिकेसाठी तयार करुन ठेवतो. सातवी ओळ आहे की तो बांधून आता तेच बासनात म्हटलेले आहे. त्याच्याऐवजी आता हासुध्दा बासनात बांधायचा आहे. सेवा प्रवेश नियमांचे जाणूनबुजून हत्यार वापरले जात आहे. शेवटून आठवी ओळ सगळयांना नेउन अटीशर्ती शिथिल करुन आपण सरकारकडून आणतात. तुमचे सरकार सगळे करते आणि तुम्ही इथे कोलदांडा घालता पुन्हा या ठिकाणी कोलंडा केलेला आहे. पान क्र. ९० मध्ये वरुन तिसरी ओळ म्हणजे शिपायाचा लिपिक होतो. तर त्यांना प्रमोशन लावायचे नाही असे म्हटलेले आहे. त्याच्याऐवजी दयावयाचे नाही असे पाहिजे. पान क्र. ९२ वर पहिली ओळ महानगरपालिकेच्या इतर अधिकाऱ्यांना वर्ग-१ व वर्ग-२ मध्ये पदोन्नती देण्यासाठी ही सभा मंजुरी देत आहे. खरे म्हणजे हया विषयावर वादंग झाला आणि नंतर सन्मा. सदस्य मिलन पाटील यांनी सांगितले की वर्ग-१ आणि वर्ग-२ हे शेवटचे वाक्य वगळण्यात यावे. शेवटचे वाक्य म्हणजे महानगरपालिकेच्या इतर अधिकाऱ्यांना वर्ग-१ व वर्ग-२ मध्ये पदोन्नती देण्याकरिता ही सभा मंजुरी देत आहे. त्याच्यानंतर सन्मा. सदस्या संगिता म्हात्रेऐवजी सन्मा. सदस्या लिला पाटील अनुमोदन देत आहे असे पाहिजे. त्याच्यानंतर माझ्या वक्तव्यामध्ये तिसरी ओळ ती फक्त स्पेलिंग मिस्टेक आहे असे पाहिजे.

**प्र. सचिव :-**

दि. ०५/०५/२००५ चे इतिवृत्तांत मी वाचतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

पान क्र. २० वर खालून सोळाव्या ओळीमध्ये कंसात लिहिलेले आहे की (नवीन रस्ते, नाले, सडी, विहिरी) त्याच्याऐवजी तळी, विहिरी असे पाहिजे. त्याच्यानंतर पुन्हा खालून त्याच पॅरेग्राफमध्ये शेवटच्या ओळीत गोषवाऱ्यामध्ये आर्थिक तरतुद किती उपलब्ध आहे असे पाहिजे. त्याच्यानंतर अनुक्रमांक ४ मध्ये सध्याचा हा रस्ता सुस्थितीत असून फक्त पॅचवर्क करणे सोयीचे आहे. अनुक्रमांक ९ मध्ये एस.एन. कॉलेज ते खारीपर्यंत असे लिहिलेले आहे. त्या ठिकाणी खाडीपर्यंत असे पाहिजे. नाला पुर्नबांधनी त्याच्याऐवजी शुध्दलेखन पाहिजे, पुर्णबांधणी बाणचा ण असे पाहिजे.

**रोहित सुवर्णा :-**

सचिव साहेब, पान क्र. ४० मध्ये सन्मा. सदस्य मिलन पाटील यांचे वक्तव्य आहे की, मा. महापौर मॅडम, उल्हासनगर महापालिकेला महासभेळच्या रु. साडे आठ करोडच्या हाउस टॅक्सबददल असा ठराव पास केलेला होता. तो वरती सेटलमेन्ट नाही. सेट असाईड झाला असे पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्त साहेब, त्या महासभेमध्ये तत्कालीन मा. आयुक्त श्री. आर. डी. शिंदे साहेब होते. इकडे प्रस्ताव पास झालेला होता. त्या प्रस्तावामध्ये आपले जे तांत्रिक सल्लागार आहेत. त्यांच्याकडून सल्ला घेउन मी निर्णय देईन. तो एक महत्वाचा विषय आहे. त्याच्यामध्ये स्थायी समितीचे सभासद आहेत. एखादया कोर्टाच्या पायरीमध्ये बसु शकतात. आता ते आयुक्तसाहेब राहिलेले नाहीत. तो निर्णय झालेला आहे. आपण त्याबद्दल खुलासा करावा. पान क्र. ३८ वर रु. ५० लाखाचा स्थायी समितीला जो निर्णय दिलेला आहे. तो निर्णय आपण विधी सल्लागारांना विचारुन देउ असे तत्कालीन मा. आयुक्तसाहेबांनी म्हटलेले आहे.

**मा. उपमहापौर :-**

इतिवृत्तांताची दहा पाने पूर्ण झाल्यानंतर आपण त्याच्यावर चर्चा करु.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सचिव साहेब, मी त्या सभेला उपस्थित होतो. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी जेव्हा ठराव मांडला त्यावेळेला त्याच्या बाजूने मतदान केलेले होते. त्याच्यामध्ये माझे नांव नाही. ते नांव टाका. पान क्र. २७ मध्ये मी ठरावाच्या विरोधात मतदान केलेले होते. त्याच्यामध्येसुध्दा माझे नांव नाही.

**प्र. सचिव :-**

तुम्ही मध्येच सभागृह सोडून गेलेले नव्हते ना.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मी या सभागृहात उपस्थित होतो. मी हात वर केलेला होता.

**जयंत पाटील :-**

अध्यक्ष महाशय, प्रोसिडिंग रिपेअर करण्यासाठी आपला पाउण तास गेला. मला हेच कळत नाही की आपला चार-चार जणांचा स्टाफ या ठिकाणी बसलेला आहे. आपल्याकडे टेप रेकॉर्ड असताना आपल्याकडे हया चुका का होतात? ही टाईपिंग मिस्टेक आहे की कारकुनाची मिस्टेक आहे. त्यांचे त्या ठरावामध्ये नांव

नाही. मतदानात नांव नाही म्हणजे ही बाब गंभर आहे. हे प्रोसिडिंग लिहिताना टेप लावून का बसत नाहीत? नाहीतर आपल्याला हयांची काय आवश्यकता आहे. यांना सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांच्या भाषेत कोलदांडा घालावा लागेल. हयाच्यामध्ये कुठेतरी सुधारण व्हायला पाहिजे.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर साहेबा, सन्मा. सदस्य जयंता पाटील यांनी या ठिकाणी जी सुचना मांडलेली आहे. मला वाटते की सभागृहामध्ये इतिवृत्तांत मंजुर करताना फक्त ग्रॅमॅटिकल मिस्टेकचे करेक्शन असते. परंतु, या सभागृहातील इतिवृत्तांतामध्ये जर आपण नजर टाकली तर ग्रॅमॅटिकल मिस्टेक होतात. परंतु, लाईनसुध्दा त्याच्यामध्ये गाळलेल्या आहेत. सन्मा. सदस्य जयंत पाटील यांची सुचना मान्य करावी. याच्या अगोदर कधीही एवढया चुका झालेल्या नव्हत्या.

**जयंत पाटील :-**

माझ्या माहितीप्रमाणे इतिवृत्तांत मंजुरीचा असा अर्थ आहे की जर कोणी एखादा ठराव मांडला असेल समजा सन्मा. सदस्य लिओ कोलासोसाहेबांनी ठराव मांडलेला आहे आणि जर त्या इतिवृत्तांतात ठरावामध्ये काय मिस्टेक झाली असेल, चुकीचा ठराव लिहिला असेल तरच त्याच्यामध्ये दुरुस्ती करणे भाग आहे. हया एवढया ग्रॅमॅटिकल मिस्टेक योग्य नाहीत. जर हया गोष्टीबददल सभागृहाचा अमुल्य वेळ जात असेल तर बाकीचे विषय कधी होतील. आपण त्यांना स्ट्रिक्टली वॉर्निंग दया.

**ओमप्रकाश अग्रवाल : -**

या ठिकाणी आमच्या पक्षाचेसुध्दा स्थायी समितीचे मेंबर आहेत. उदया कोणी कोर्टात गेला तर त्यांना कोण बघायला येणार आहे. इतिवृत्तांताला मंजुरी देण्यापूर्वी मा. आयुक्त साहेबांनी त्या गोष्टीचा खुलासा करावा. मा. आयुक्त साहेब, त्या महासभेमध्ये रु. ५० लाखापर्यंत पॉवर्स देण्याचे अधिकार स्थायी समितीला देण्यात आलेले होते. त्यांना विचारले असता त्यांनी सांगितले की, हा विषय अर्जन्टमध्ये आलेला आहे. मी त्याबाबतीत अभ्यास केलेला नाही. मी विधी सल्लागार नेमुन आणि त्यांना बोलावून माहिती काढतो आणि नंतर तुम्हाला निर्णय देतो. आज आपण पुन्हा त्या इतिवृत्तांताला मंजुरी देत आहोत. खरोखर जो प्रस्ताव मेजोरिटीने पास झालेला आहे. त्या प्रस्तावाला आपले काही मत असेल तर ते माहिती पडले पाहिजे. तुम्ही पान क्र. ३८ वाचा.

**लिओ कोलासो :-**

पीठासीन अधिका-यांच्या परवानगीने बोलतो की आम्हाला या ठिकाणी काहीही वादग्रस्त बोलायचे नाही. सन्मा. सदस्यांनी बहुसंख्येने या प्रोसीडिंगमधील ज्या काही गॅमेटिकल क्लेरिकल चुका दाखविलेल्या आहेत. परंतु, सन्मा. सदस्य जोजफ घोन्सालवीस यांनी सांगितले की, एका ठिकाणी बाजूने मतदान केले. एका ठिकाणी विरोधात मतदान केले तर त्याची नोंद ओमीट झालेली आहे. ही खरोखरच गंभीर गोष्ट आहे. अपार्ट फ्रॉम पार्टी असोल्युशन आम्ही हे मान्य करतो की अशा स्वरुपाच्या चुका यापुढे होणार नाहीत. आपण त्याचे संबंधित प्रशासनाला आदेश दयावेत. परंतु, प्रोसीडिंग मंजुरीचा विषय असताना सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांनी मागील मा. आयुक्तसाहेबांच्या उपस्थितीत सभेतील रु. ५० लाखाच्या मंजुरीच्या संदर्भात जो काही प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्याच्यावर स्वतंत्रपणे विचार व्हायला पाहिजे. त्यासाठी प्रोसिडिंग मंजुरीचा विषय बाजूला जाता कामा नये अशी विनंती आहे.

**रोहिदास पाटील :-**

या ठिकाणी प्रोसिडिंग मंजुरीचा विषय येत नाही. परंतु, या ठिकाणी मा. आयुक्त साहेबांचे मत आहे की, त्यांनी विधी सल्लागारांचे मत घेतल्यानंतर आम्ही निर्णय देउ. आता त्या प्रशासकिय अधिकाऱ्यांना तथा मा. आयुक्त साहेबांना हा रु. ५० लाखाचा ठराव मंजुर आहे की नाही. कारण या ठिकाणी इतिवृत्तांत मंजुर होत आहे. त्या ठरावाला सभागृहाने मंजुरी दिलेली आहे. हा वेगळा विषय झाला. मा. आयुक्तसाहेबांचे जे राईट आहेत. म्हणजे ८४ सन्मा. सदस्यांनी जो ठराव केला असेल आणि तो ठराव मा. आयुक्त साहेबांच्या मते योग्य नसेल तर मा. आयुक्त साहेब तो ठराव फेटाळू शकतात आणि त्या ठरावाच्याविरुध्द जाउ शकतात. परंतु, त्या दिवशी मा. आयुक्तसाहेबांनी तसे निवेदन केलेले होते. ते शास्त्रशुध्द निवेदन होते की तुम्ही बहुमताने केलेल्या ठरावावर मा. आयुक्तसाहेबांनी टेक्निकल मत दिलेले नाही. मी विधी सल्लागारांना विचारुन नंतर मत मांडेन. परंतु, तो त्यांना मान्य आहे की नाही. आजच्या प्रशासनाला या महापालिकेत कामकाज करणा-या प्रशासकांना, प्रशासकीय अधिका-यांना....

**आसिफ शेख :-**

ते नं. ३८ चे बाकी ठेवा. मा. पीठासीन अधिकारी साहेब या ठिकाणी सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांनी जी सुचना केलेली आहे की, तत्कालीन मा. आयुक्त साहेबांनी या ठिकाणी जी शंका कायदयाच्या तरतुदीच्या संदर्भात व्यक्त केलेली आहे की, स्थायी समितीला रु. ५० लाखाच्या पॉवर्स महासभेने सर्व सन्मा. सदस्यांनी ठराव बहुमताने मंजुर करुन दिलेला आहे. मा. आयुक्त साहेबांनी या ठिकाणी स्वतःचे मत नोंदवलेले आहे. ते या प्रोसिडिंगमध्ये आलेले आहे. आपण या ठिकाणी प्रोसीडिंगला मान्यता देत आहोत.

म्हणजे आपण मा. आयुक्त साहेबांच्या मतालासुध्दा मान्यता देत आहोत. मा. आयुक्त साहेबांच्या मतामध्ये परिवर्तन होणार नाही. ते तसेच राहणार आहे.

**रोहिदास पाटील :-**

मी मघाखी खुलासा केला की जरी ८४ नगरसेवकांनी एकमताने ठराव केला असेल तरी मा. आयुक्तसाहेबांचे ते राईट आहेत. त्यांना ते विचारा. याचा या ठिकाणी सोक्षमोक्ष होउ दे. तुम्ही मोगम घेउ नका. ते त्या प्रोसिडिंगमध्ये येत आहे. मंजुरी देतेवेळी मा. आयुक्तसाहेब जरी बदलले असेले तरी तेच मा. आयुक्त आहेत. मा. आयुक्तसाहेबांची खूर्ची तिच आहे. त्यांची रिस्पॉन्सिबिलीटी तिच आहे. त्यांनी सल्लामसलत करुन जाहिर करावे की, त्या मताशी आम्ही सल्ला घेतलेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. आयुक्तसाहेब, त्या विषयावर आपले काय मत आहे ते व्यक्त केले तर बरे होईल.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल, आपण प्रश्न विचारलेला आहे. परंतु, सभागृहात जेवढे ठराव पास झाले ते बऱ्याच वेळेला बहुमताने पास झाले असतात. तेव्हा आपण स्थायी समितीला रु. ५० लाखाच्या पॉवर्स देण्याचा ठराव बहुमताने केलेला होता. त्याच्यामुळे तो ठराव चुकीचा आहे असे म्हणण्याचे काही कारण नाही. मा. आयुक्त साहेबांनी त्यावेळेला एक निवेदन केलेले होते की, मी या विषयावर विधी सल्लागारांशी बोलेन. परंतु, दुर्देवाने आपल्याकडून मा. आयुक्त साहेबांची बदली झाल्यानंतर त्या विषयामध्ये आयुक्त जे काही उत्तर देणार होते. ते या ठिकाणी हजर नाहीत. आता सन्मा. आयुक्त श्री. गायकवाड साहेबांनी विधी सल्लागारांशी या विषयावर चर्चा केलेली आहे. त्यांनी आजच्यापुरते त्यांचे मत दयावे अशी मी त्यांना विनंती करतो.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे. त्या संदर्भामध्ये मी विधी सल्लागारांकडून चर्चा कलेली आहे. विधी सल्लागारांचे असे मत आहे की, मा. आयुक्त साहेबांनी या विषयावर माझ्याबरोबर चर्चा केलेली नाही. मी त्यांना असे सांगितले की, जर मा. आयुक्त साहेबांनी सभागृहात उत्तरासाठी एखादे आश्वासन दिलेले असेल तर मा. आयुक्त साहेब तुम्हाला सांगणार नाहीत. तुम्हीच मा. आयुक्त साहेबांना विचारायला पाहिजे की तुम्ही सभागृहामध्ये असे-असे जे काही उत्तर दिलेले आहे किंवा जे काही बोललेले आहेत. तुम्हीच त्या संदर्भात मा. आयुक्त साहेबांना सांगायला पाहिजे व सल्ला दयायला पाहिजे. आपण या ठिकाणी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्याबाबतीत मी त्यांच्याशी चर्चा करुन आपल्याला उत्तर देईन.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, मी आपल्याला सांगु इच्छितो की मा. महासभा ठराव करुन वॉर्ड कमिटी किंवा स्थायी समितीला अधिकार देउ शकते. पण शासन अशा ठरावाला मंजुरी व मान्यता मिळत नाही. अशा प्रकारचे अधिकार देण्यासंबंधीचा ठराव मुंबई महानगरपालिकेनेदेखील केला होता. परंतु, त्याला आजपर्यंत राज्य सरकारने मंजुरी दिलेली नाही. असे श्री. पी. सी. पिसोळकर चीफ ऑडिटर ऑफ मुंबई यांचे म्हणणे आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, एक शैक्षणिक बाबीचा विषय सभागृहासमोर आणू इच्छितो. आपल्या सभागृहातील सर्व सन्मा. सदस्य, प्रशासकीय अधिकारी शैक्षणिकदृष्टया म्हणजे तो चेणा, उत्तन, पेणकरपाडा किंवा अन्य असु दे. महापालिका हददीमध्ये शिक्षणचा विषय असेल तर सगळयांची सहानुभूतीची भुमिका असते. परंतु, आता असे एक अवचित घडलेले आहे की आपल्या बंदरवाडीच्या शाळेमध्ये प्राथमिक मराठी व गुजराथी दोन्ही शाळा चालतात. त्या शाळेमध्ये लोकांच्या सोयीच्या दृष्टिने ग्राउन्ड फ्लोअरला टॅक्सचे ऑफिस चालवावे अशी विनंती केल्यानुसार टॅक्सचे ऑफिस सुरु झाले. प्रभाग समितीचे ऑफिस आल्यानंतर आम्ही हयाच सभागृहात तिकडे जागा नसल्याचे निदर्शनास आणले होते. शिक्षण अधिकारी व्यवस्थित निवेदन करु शकले नाही. मा. महापौरांनी सहानुभुतीने योग्य तो निर्णय घेउ असे सांगितले. तेव्हा एक प्रभाग समितीचे ऑफिस झाले. आजच्या घटकेला प्रभाग समितीच्या ऑफिसच्या ॲन्टी चेंबर बनविण्यासाठी दुसरा वर्ग बंद करुन मुले बाहेर काढून त्या ठिकाणी ॲन्टी चेंबरचे काम सुरु झाले. आपली शैक्षणिक बाबतीत भुमिका कुठपर्यंत योग्य आहे. काय आपली सहानुभूती आहे, आपुलकी आहे कि मनमर्जी आहे की, नियमबाह्य आहे. एकतर मुतुबाई श्रावण कोळी यांनी आपल्याला ती जागा दिली. त्या बाईचे पत्र होते की, तुम्ही या ठिकाणी प्रभाग ऑफिस सुरु करु नका. मी फक्त मुलांच्या सोयीसाठी ही शाळा दिलेली आहे. आता आपण आपल्या अधिकारामध्ये वेगळया भुमिकेत चाललेले आहोत. आपली शैक्षणिकबाबतीत अशी भुमिका असता कामा नये. आपल्या सर्वांना माहिती आहे की, या सभागृहाने ती एक मताने खारीच्या शाळेच्या वरती पाच माळ्याची आपली इमारत आहे. तिथे प्रभाग समितीचे ऑफिस बनावे अशी आर्थिक मंजुरी देउन नउ महिने झाले. ते काम सुरु झालेले नाही. परंतु, आपण आज ते वर्ग बंद करुन, ती मुले बाहेर काढली. आता त्या सगळया

शिक्षिका, पालक बाहेर आहेत. अशा पध्दतीने कामकाज चालले तर कसे होईल. त्या मुलांनी, शिक्षकांनी कुठे जायचे ते बाहेर उभे आहेत. यावर मा. उपमहापौरसाहेबांनी निवेदन करावे.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटीलसाहेब, आपल्या आजच्या महासभेचे कामकाज लवकर आटोपले तर आजच मा. आयुक्तसाहेब, शिक्षण अधिकारी आणि आपण प्रत्यक्ष जाउन त्या जागेची फिजीबिलीटी बघु की खरंच वर्ग कमी पडतो का? जर आज शक्य नसेल तर उदया निश्चित ११.३० वा. जाउया.

**रोहिदास पाटील :-**

आपण आजच जाउया.

**आसिफ शेख :-**

या ठिकाणी प्रभाग समितीचे मा. अध्यक्षसाहेब हजर आहेत. ते त्याचा खुलासा करतील. माझ्या माहितीप्रमाणे ते त्या कार्यालयात पण बसत नाहीत.

**नरेन्द्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, त्या प्रभाग कार्यालयामध्ये अशी परिस्थिती आहे की, खाली टॅक्सचे काम होते. वर एका केबीनमध्ये प्रभाग अधिकारी बसतात. मधल्या केबीनमध्ये मुले बसतात. त्याच्या बाजूला प्रभाग अध्यक्षांचे केबीन आहे. जी मुले शिकतात त्यांनासुध्दा अडचणी येतात. कारण त्या रुममध्ये आपले कॉम्प्युटर ऑपरेटर, क्लार्क वगैरे बसतात. मुले व्यवस्थित शिकु शकत नाहीत व क्लार्क व्यवस्थित काम करु शकत नाहीत. आपल्याकडे वर अजून एका ठिकाणी रिकामी जागा आहे. मा. आयुक्त श्री. आर. डी. शिंदे साहेब असताना त्यांनी श्री. केसरीनाथ म्हात्रे साहेबांना रिक्वेस्ट केलेली होती की मुलांना वर शिफ्ट करावे आणि कोणाला अडचण होणार नाही असे केबीन करुन घ्यावे. आपण सर्व्हेला जाताना मलासुध्दा बरोबर न्या.

**रोहिदास पाटील :-**

मी त्यावेळेला सविस्तर निवेदन केलेले होते की, याया माध्यमाच्या दोन शाळा चालतात. त्या ठिकाणी जागा उपलब्ध नाही.

**मा. उपमहापौर :-**

आपण प्रत्यक्ष जागेवर जाउन पाहणी करुन जो मधला योग्य मार्ग निघेल तो काढूया.

**नरेन्द्र मेहता :-**

तुमच्याबरोबर मलासुध्दा घेउन जा.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, याच्या जोडीला अजून एक विषय आहे. आपण त्या ठिकाणी जाणार आहोत म्हणून मी बोलतो. आपले खाली जे आरोग्य केन्द्र आहे. तिथे एकदम अपुरी जागा आहे. तिथेच सगळे औषधाचे खोके आहेत, रुग्णांना तपासण्यासाठी बेड आहे आणि तिथेच सगळे डॉक्टर बसलेले आहेत. इतकी कमी जागा आहे. आरोग्य केन्द्राच्या बाजूला लागून एक मोकळी जागा आहे. महापालिकेने ती तेवढी जागा वाढविली की, रुग्ण तपासण्यासाठी औषधे ठेवण्यासाठी वेगळी जागा होईल. त्याच्यासाठी आपले आरोग्य अधिकारी आहेत. आपण संध्याकाळी जाताना आरोग्य अधिकाऱ्यांना जोडीला घेउन त्या जागेची पाहणी करुन घ्या.

**आसिफ शेख :-**

(ठरावाचे वाचन केले.)

**हंसुकुमार पांडे :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की माझ्या लक्षवेधीचे काय झाले ते सांगा. मी आपल्याकडे लक्षवेधी दिली होती. ती फेटाळण्याचे कारण सांगा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील तुमची लक्षवेधी आपदग्रस्त पुर परिस्थितीबददल होती. त्या दिवशी या विषयावर आपली सतत अडीच तास चर्चा झालेली आहे आणि आपले समाधान झाल्यामुळे ती लक्षवेधी फेटाळण्यात आलेली होती.

**रतन पाटील :-**

माझे समाधान झालेले नाही. समाधान होण्याच्या संदर्भात मी बोललेलो नाही. आपण माझी लक्षवेधी विचारात घेणार म्हणून मी बोललो नाही. आपण आम्हाला त्यावेळेला बोलायला वेळ का दिला नाही.

**मा. महापौर :-**

इतरांनी ज्या सुचना मांडलेल्या आहेत. तशाच प्रकारच्या सुचना तुम्हाला मांडायच्या होत्या. आपण तसे लेखी नमुद केलेले होते. आपली सुचना त्याच्यामध्ये नमुद करुन घेतलेली आहे.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही सुचना मांडलेली नाही. मग आमची सुचना कुठून येणार? आमची सुचना आता आहेत. तुम्हाला घ्यायच्या असतील तर घ्या.

**मा. महापौर :-**

आपण आम्हाला लेखी सुचना दया. त्या दिवशी या विषयावर सविस्तर चर्चा झालेली आहे.

**रतन पाटील :-**

तुम्ही आमची लक्षवेधी स्विकारा. या ठिकाणी मी सुचना दिलेल्या आहेत, त्या अंमलात आणाव्यात.

**मा. महापौर :-**

लेखी सुचना द्या.

**रतन पाटील :-**

लेखी सुचना दिलेल्या आहेत.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही फक्त चांगल्या विषयाला बगल देत आहात. त्या दिवशी तुम्ही जसे आत्मीयतेने निवेदन केले. आजही पुर परिस्थिती किंवा महामारी सुरु आहे. त्याच्याबददल आपले निवेदन अपेक्षित होते. आम्ही त्या दिवशी आपल्याकडे मागणी केलेली होती की, या लेप्टोस्पायरसीसमध्ये, डेंग्युमध्ये ज्यांचे निधन झाले. मी पक्षाच्या वतीने बोललो होतो की, आपण त्यांना रु. १ लाखाचे अर्थसहाय्य करावे. त्याच्याही पलिकडे जे लेप्टोस्पायरसीसचे पेशन्ट वारले आणि अजून काही पेशन्ट औषध घेत आहेत. आपण महापालिकेचे कोणतेही कर्तव्य बजावत नाहीत. आपण अशी भुमिका का घेत नाही. ते मला समजत नाही. याला राष्ट्रवादी विरोध करित आहे का? कोणीही विरोध करणार नाही. ही तुमच्या कर्तव्याची चुणूक आहे. आम्ही त्याची अपेक्षा करतो. पक्षाच्या दृष्टिने विरोध करतो हा एक वेगळा विषय आहे. अन्य महापालिकेने केले नसेल तरी आपल्या महापालिकेने घोषित करावे की जे लेप्टोस्पायरसीसचे पेशन्ट आहेत. जे रुग्ण आता औषध घेतात, जे मृत्युशी झुंजतात. त्यांच्या औषधांचा संपर्णू खर्च महापालिका करेल असे तुम्ही मा. आयुक्त साहेबांबरोबर चर्चा करुन घोषित करा. आपल्या दृष्टिने ते व्हायला पाहिजे. आपण ते दयायला पाहिजे. मी उदाहरण म्हणून सांगतो की भिवंडी महापालिकेने लेप्टोस्पायरसीसच्या केसेससाठी झालेला खर्च केला. त्यांचे जे बिल आहे ते बिल महापालिका अदा करते. आपल्या नियमात जे आहे ते आपण करावे असे माझे म्हणणे आहे. एखादा सक्षम माणूस खर्च करु शकतो. एखादा सक्षम माणूस खर्च करु शकत नाही. तो पेशन्ट मरतो. आता माझ्याकडे काशीची एक केस आहे. तो माणूस हॉस्पिटलमध्ये पडून आहे. त्याच्या हॉस्पिटलचे बिल भरले जात नाही. त्याच्यामुळे डॉक्टर पेशन्टला डिस्चार्ज देत नाही. आता आपला मॅसेज गेला की महापालिका हयाच्यातील खर्च उचलेल. एक्झॅक्टीक जी बिले येतील ती तुम्ही द्या. लटरसटर बिल आले तर ती नका देऊ. पण ती तरी बिले द्यायला पाहिजे. तर डॉक्टर कोणीतरी पाठवून देईन. मा. महापौर मॅडम, ही चांगली गोष्ट आहे. तुम्ही हयाच्यावर घोषणा करायला पाहिजे. याच्यामध्ये कोणी एखादयाचा नातेवाईक आहे, एखादया समाजाचा आहे, एखादया प्रभागाचा आहे अशातला हा विषय नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

मुंबई महानगरपालिकाने भी इस बात का आदेश दिया है। सन्मा. सदस्य रोहिदास पाटील जो बात बोल रहे है। वह सही बात है। उसके उपर अंमल करना चाहिए। मै सन्मा. सदस्य रोहिदास पाटील के बातसे सहमत हूँ।

**मुक्ता रांजणकर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांच्या विचारांशी मी सहमत आहे. कारण मुंबई महानगरपालिकेने प्रत्येक प्रायव्हेट हॉस्पीटलला असे आदेश दिलेले आहेत की अशा रुग्णांचा मोफत इलाज करावा.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर, तुम्ही निर्णय घ्या. हा जो खर्च असेल तो महापालिका स्विकारेल असे सांगा. आम्ही प्रत्येक बिल कोणीही नगरसेवक बघणार नाही. फक्त अधिकाऱ्यांनी ती बिले बघायची, तुम्ही बघायची आणि ते बिल दयायचे आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

हम लोगोने नउ जगहपर कॉंग्रेस सेवा दल के माध्यमसे यह शिबिर रखा था। उसमे वेस्ट मे सात लोग लेप्टोस्पायरसीससे इन्फेक्टेड थे। ऐसे मालुम पड रहा है और मै चाहूँगा की नगरपालिका के माध्यमसे इसका सर्व्हे करके जैसे सन्मा. सदस्य रोहिदास पाटील बोल रहे है। वैसे खर्चा देना चाहिए। दुसरी बात है की, हम लोग उस दिन कलेक्टरसाहबके पास गये थे।

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, माझ्या वॉर्डमध्ये एक बिगाऱ्याचा मुलगा लेप्टोस्पायरसीसचा रुग्ण आहे. त्याच्या हॉस्पिटलच्या बिला संदर्भात निर्णय घ्या.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हयाच्यावर कोणीही विरोध करणार नाही. तुम्ही तुमच्या अधिका-यांना सांगा.

**मोहन पाटील :-**

या गोष्टीबाबत डॉ. बावसकरांकडून कोणत्या रोगाचे किती रुग्ण आहेत ती माहिती घ्या.

**आसिफ शेख :-**

सन्मा. पिठासिन अधिकारी मा. महापौर मॅडम............

**हंसुकुमार पांडे :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख आप जरा बैठिये। हम लोगोने बोलनेका नही क्या?

**आसिफ शेख :-**

हम लोग आपकी बात पर सहमत है।

**महेन्द्रसिंग चौहाण : -**

सन्मा. सदस्य हंसुकुमार पांडे, हम लोगभी आपकी बात पर समर्थन दे रहे है।

**हंसुकुमार पांडे :-**

सन्मा. सदस्य महेन्द्रसिंग चौहाण, आपका समर्थन है। फिरभी हम लोगोंको लोगोंसे बात सुननी पडती है उसका क्या? हम लोगोंको कलेक्टरके पास लेके गये। कलेक्टरके पास जानेके बाद कोईभी निदान नही निकला। लोग हमारे ऑफिसमे आकर बैठते है और पुछते है की, हमारा फॉर्म क्यो भरवाया, हम लोगोको आश्वासन क्यों दिया। तो हम लोग उसका क्या जवाब देंगे। जिनका नुकसान हो गया उनका फॉर्म भरो कहकर हम लोगांसे फॉर्म भरवाया और अपने-अपने विभागमे पैसे बाँटे। आपने उस दिन पढा होगा की रु. ४० लाख बाँटा गया। मिरा भाईंदर मे रु. ४० लाख किधर बाँटा गया। महानगरपालिकाका बेवकुफ बनाने का काम चल रहा है।

**लिओ कोलासो :-**

सन्मा. सदस्य हंसुकुमार पांडे यांच्या भाषणा संदर्भात बोलतो की निधी वाटपाचे मा. महापौरांच्या अध्यक्षतेखाली झालेले नाही. ते काम महसुल खात्याचे लोक इन्डिपेन्डन्टली करित आहेत. आपण सभागृहामध्ये अशाप्रकारे मा. महापौरांना टार्गेट करणे बरोबर नाही असे मला वाटते.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, रु. ४० लाख वाटल्याचे तुम्हीच त्या दिवशी आम्हाला सांगितलेले होते. ते रु. ४० लाख कुठे वाटले त्याची आम्हाला लिस्ट दया. आमच्या प्रभागातसुध्दा पाणी भरलेले होते.

**रतन पाटील :-**

हे रु. ४० लाख कुठल्या प्रभागात वाटलेले आहेत.

**मोहन पाटील :-**

या संदर्भात मा. उपमहापौर साहेब बोलतील.

**हंसुकुमार पांडे :-**

आमच्या प्रभागात कुठेही एक पैसा मिळालेला नाही. हे चुकीचे आहे.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, हे पैसे कुठल्या प्रभागात वाटले त्याचा या ठिकाणी उल्लेख करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, प्रभाग क्र. २४ मध्ये पैसे वाटले गेले.

**हंसुकुमार पांडे :-**

रु. ४० लाख कुठे गेले त्याचा आम्हाला हिशेब पाहिजे.

**शुभांगी नाईक :-**

ते रु. ४० लाख कोणत्या प्रभागात वाटले गेले त्याचा आम्हाला हिशेब पाहिजे.

**रतन पाटील :-**

या रु. ४० लाखाचा हिशेब दिला नाही तरी त्या पैशाचे कुठल्या-कुठल्या प्रभागात मदत म्हणून वाटप झालेले आहे. ते तरी जाहिर करा.

**मा. उपमहापौर :-**

आजच्या या निधीशी या महापालिकेचा दुरान्वयेदेखील संबंध येत नाही. हे जे पैसे वाटले गेले हयाबाबत महाराष्ट्र शासनाने पॉलिसी घोषित केली होती. तुमचे, आमचे मिरा भाईंदरचे दुर्दैव आहे की या विषयाला वारंवार फॉलो-अप करुन आपण मा. मुख्यमंत्र्यांनादेखील आपले निवेदन सादर केले. या परिसरातील विधानसभेचे सदस्य अर्थात आपले मा. पालकमंत्री आणि महाराष्ट्र राज्याचे पर्यावरण आणि उत्पादन शुल्कमंत्री श्री. गणेश नाईक साहेब, आमदार श्री. मुजफ्फर हुसेन साहेब यांच्या माध्यमातूनदेखील हा विषय आपण पूर्णपणे मांडतो.

**रोहिदास पाटील :-**

मा. उपमहापौर साहेब, एक मिनिट थांबा. मला असे सांगायचे आहे की श्री. वसंतराव डावखरे आणि श्री. नाईक साहेबांचेसुध्दा नांव घ्या.

**मा. उपमहापौर :-**

परंतु, आपल्याला आतापर्यंत कुठलेही चांगले उत्तर मिळालेले नाही. आपण ज्यावेळेला सभा स्थगित केली. एवढे महत्वाचे विषय असताना या महापालिकेतील जवळजवळ सर्व नगरसेवक ठाण्याला आले. आपण कलेक्टर साहेबांशी चर्चा केली. कोणालाही दुखवण्याचा आमचा प्रयत्न नाही असे आम्हाला कलेक्टर साहेबांनी फक्त सांगितले. दुसऱ्या दिवशी तहसीलदार श्री. झरकेराव साहेब मिरा भाईंदरमध्ये आले. कोणत्याही लोकप्रतिनिधीला किंवा कोणालाही विश्वासात न घेता त्यांनी परस्पर तलाठयांना घेउन ह्या परिसराची पाहणी केली आणि आज मी पुन्हा सर्कल साहेबांशी बोललो असता मला सांगितले की, निदान पाच-सहा फुट पाणी भरले असेल त्यांच्यासाठीच पैसे दयायचे. माझ्या माहितीप्रमाणे या विषयात आतापर्यंत १५९२ लोकांना पैसे वाटप झालेले होते.

**हंसुकुमार पांडे :-**

यह बात फॉर्म भरने के पहले बोलना चाहिए था की पाच-छहः फुट पानी भरेगा उसको फॉर्म भरा जायेगा। फॉर्म नही भरना चाहिए था। अगर आश्वासन होता तो हमारे लोग मोर्चा लेकर आते थे। आज झोपडपटटीवाले हमारे ऑफिसमे मोर्चा लेकर आये थे। हम लोग उसका क्या जवाब देंगे।

**मा. उपमहापौर :-**

अगर यह पैसा मेरे को देने का रहता था तो मै अभी तक बॉट चुका होता। ऐसी कोई बात नही।

**हंसुकुमार पांडे :-**

पहलेही यह सिस्टिम डालने चाहिए थी की तीन फुटवालोंको पैसा नही मिलेगा।

**रक्षा शहा :-**

आमच्या इथे पाच-पाच फुट पाणी होते.

**मा. उपमहापौर :-**

यह बात हम लोगोको सर्कलने कही है । फिरभी आज हम लोग अगर जल्दी मिटींग खतम होगी तो मंत्रालयमे जानेका हमारा प्रयास है । हम लोग एक आखरी प्रयत्न करेंगे । यह सिर्फ सर्कलने कहा है । यह अंतिम आदेश नही है ।

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर मॅडम, मेरी सुचना है की अभीभी फॉर्म भरना चालू है । पैसा नही मिलेगा तो आप फॉर्म मत बाटिये नही तो सब लोग महानगरपालिका के पास मोर्चा लेकर आयेंगे । अभी फॉर्म भरना चालू है ।

**रक्षा शहा :-**

जर महानगरपालकेचे अधिकारी एरियामध्ये फिरुन फॉर्म भरत असतील तर तुम्ही त्यांना आदेश देउन रिक्षा फिरवून सांगायला पाहिजे की आम्ही ते पैसे देणार नाही. पैसे का मिळत नाही असे आम्हाला लोकांनी विचारायला नको.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या अधिकाऱ्यांनी सर्व्हे केलेला आहे. आम्हाला वाहनात घेउन फिरलेले आहे. आज प्रत्येकाला जबाबदारी कठिण झालेली आहे.

**रक्षा शहा :-**

आपण महानगरपालिका आणि तलाठी ऑफिसतर्फे सगळया वॉर्डमध्ये रिक्षा फिरवून सांगितले पाहिजे की आता आम्ही हे पैसे तुम्हाला देणार नाही. लोक आम्हाला विचारतात. आम्ही काय करायचे ते सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपले कर्मचारी अजूनही फॉर्म भरायला फिरत आहेत.

**हंसुकुमार पांडे :-**

लाउडस्पीकर लगाके अनाउन्समेन्ट करो की जहाँ पाच फुट पानी भरा है उधरही पैसा मिलेगा । क्योंकी लोग हमको तंग न करे ।

**प्रेमनाथ पाटील :-**

सन्मा. सदस्य हंसुकुमार पांडे यांच्या मताशी मी सहमत आहे.

**रक्षा शहा :-**

मॅडम, देवचंदनगर चाळ, सुदामानगर आणि शांतीनगर इथे पाच फुट पाणी भरलेले होते. तुम्ही तिथे अजूनपर्यंत अन्नसुध्दा पोहोचवलेले नाही. आपण अशा परिस्थितीत काय करायला पाहिजे. सन्मा. सदस्य मिलन पाटील त्यावेळेला हजर असल्यामुळे तिथे केवढे पाणी भरलेले होते ते त्यांना माहिती आहे. मग तिथे राहणारी लोक माणसे नाहीत का?

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, प्रभाग क्र. २३ मध्ये पैसे वाटले आणि आमच्या समोरच्या प्रभाग क्र. २४ मध्ये पैसे का वाटले नाही हा असा भेदभाव का?

**रोहिदास पाटील :-**

मी मा. महापौरांना विनंती करतो की तुम्ही हयाच्यावर निर्णय घ्या. माझ्या वॉर्डमध्ये अकरा केसेस आहेत की, ज्यांचे लेप्टोस्पायरसीसने निधन झालेले आहे. आता अनेक रुग्ण औषधोपचार करित आहेत. हयाच्यामध्ये खरे काय, खोटे काय याचा तुम्ही निर्णय दया की, आपण मेलेल्या लोकांना एवढे रुपये देउ किंवा औषधपाणी ज्यांचे चालू आहे त्यांना औषधपाण्याचा खर्च देउ हे घोषित करा.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, या विषयात काही सेक्शन आहे. मला या ठिकाणी काही सेक्शन वाचून दाखवायचे आहेत. आपली परमिशन आहे का?

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य हंसुकुमार पांडे, सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, सन्मा सदस्य प्रेमनाथ पाटील आणि सन्मा. सदस्या रक्षा शहा यांनी या ठिकाणी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. तशाच भावना संपूर्ण सभागृहाच्या आहेत. या संदर्भात महापालिकेच्यावतीने प्रभाग अधिका-यांनी प्रत्येक ठिकाणी जाउन कुठे-कुठे पाउस गेलेला आहे. त्या पावसामुळे ज्यांचे-ज्यांचे नुकसान झालेले आहे. हयाचा संपूर्ण सर्व्हे केलेला आहे. परंतु, या सर्व्हेच्या हिशेबाने तलाठयांमार्फत पैसे वाटप करण्यात आलेले आहे. परंतु, आपल्या प्रभाग अधिकाऱ्यांनी सर्व्हे केलेला आहे. त्याचा आणि तलाठयांच्या पैशाचा या ठिकाणी वाटपाचा महापालिकेचा काडीमात्र संबंध नाही. पैसे वाटपातही आणि धान्य वाटपात काही दुरान्वये संबंध नाही असे मघाशी मा. उपमहापौरांनी सांगितले.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख, तुम्ही त्यांच्याबरोबर होते. तुमचे पैसे आहेत.

**रक्षा शहा :-**

महानगरपालिकेचा संबंध नाही तर रिक्षा फिरवायला पाहिजे. तुम्ही महानगरपालिकेची माणसे पाठवतात. मग महानगरपालिकेचा संबंध का नाही?

**प्रेमनाथ पाटील :-**

परंतु, मा. महापौर मॅडमनी रु. ४० लाख भरले असे डिक्लेअर केलेले आहे.

**आसिफ शेख :-**

महापालिकेच्यावतीने ज्या लोकांच्या घरात, दुकानात पाणी गेलेले आहे. त्यांना महापालिकेमार्फत आर्थिक मदत ज्या-ज्या प्रभागात करायची आहे. ती-ती मदत करण्यात येईल.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख, वाढदिवस तुमचा आणि पैसा सरकारचा असे चाललेले आहे.

**रोहित सुवर्णा :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख पैसे वाटत करताना तुमचा पेपरला फोटो आहे.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख, तुम्ही विषयाची गफलत करित आहात.

**आसिफ शेख :-**

मी विषयाची गफलत करित नाही. आता मी बोलतो तर मला बोलू दे. तुम्ही बोलताना मी मध्ये बोलत नाही. आम्ही प्रामाणिकपणे वागतो.

**शुभांगी नाईक :-**

सगळे प्रामाणिकपणे वागतात.

**रोहिदास पाटील :-**

पुरग्रस्तांना सहकार्य करणे हा वेगळा विषय आहे. महामारीतील लोकांना सहकार्य करणे हा वेगळा विषय आहे.

**आसिफ शेख :-**

दोन्ही विषय एकत्र आहेत. तुम्ही बोलत असताना आम्ही गप्प बसतो. आम्ही शिस्त पाळतो. आम्ही शिस्तीने चालतो.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही शिस्तीचे धडे शिकवू शकता. परंतु, तुम्ही शिस्तीने वागा.

**आसिफ शेख :-**

आम्ही शिस्तीचे धडे शिकविण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. आम्ही सर्व सन्मा. सदस्यांचा मान ठेवतो. तुम्ही आमचा मान ठेवत नसाल तर आम्हीसुध्दा तुमचा मान ठेवणार नाही. मा. महापौरसाहेबा, या ठिकाणी या सभागृहातील सर्व सन्मा. सदस्यांची भावना आहे की, अतिवृष्टीमुळे आपल्या मिरा भाईंदर परिसरातील लोकांचे फार मोठे नुकसान झालेले आहे. घराघरामध्ये, झोपडपट्‌टीमध्ये पाणी गेलेले आहे. जी मदत आपल्याला राज्य शासनातर्फे आणि कलेक्टर आणि तलाठयामार्फत देण्यात आली आणि आपल्या प्रभाग अधिका-यांनी जे-जे सर्व्हे केले. त्या सव्हेच्या हिशेबाने आपल्या पालिकेतर्फे लोकांना कोणत्याही तऱ्हेची मदत मिळालेली नाही. जी मदत काही ठराविक प्रभागात मिळाली असेल त्या-त्या प्रभागातील नगरसेवक सक्रिय होते. त्यामुळे मदत मिळालेली आहे. प्रभाग अधिकाऱ्यांनी जो सर्व्हे केलेला आहे. त्या सर्व्हेला अनुसरुन आपण त्या लोकांना मदत करणे पालिकेचे कर्तव्य आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १३३(अ) मध्ये विशिष्टपणे तरतुद नमुद केलेली आहे की, जर नैसर्गिक आपत्ती असेल तर आपल्याला चालू आर्थिक वर्षाचा कर माफ करण्याची तरतुद आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, आपण अशा लोकांना काहीतरी हातभार लावला पाहिजे. शहरी आणि ग्रामीण असा कुठल्याही प्रकारचा भेदभाव न करता झोपडपटटी असो, घर असो, कोणाचे दुकान असो आपण त्या सर्वांना एक वर्षाचा कर माफ करावा. जेणेकरुन महानगरपालिकेतर्फे आपण नैसर्गिक आपत्तीमध्ये त्या लोकांना काहीतरी मदत केली असे होईल.

**रोहिदास पाटील :-**

ठाणे महापालिकेने असे केलेले आहे.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, ठाणे महानगरपालिकेने घरपटटी माफ केलेली आहे.

**आसिफ पटेल :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतोय. सन्मा. सदस्य आसिफ शेख बोलले की, जे नगरसेवक सक्रिय होते. त्यांना शासनाकडून देणगी मिळाली, मदत मिळाली. मग आम्ही सर्व झोपलेले होतो आणि तुम्ही एकटे जागे होते का?

**आसिफ शेख :-**

सर्व नगरसेवकांनी मदत केलेली आहे. मदत पोहोचण्यासाठी पाठपुरावा करायला पाहिजे होता.

**आसिफ पटेल :-**

आम्ही पुरग्रस्त परिस्थितीमध्ये पाण्यातून फिरत होतो. तरी आम्हाला मदत मिळालेली नाही. म्हणजे आम्ही झोपलेले होतो का? ही जबाबदारी महानगरपालिकेची आहे. कारण महानगरपालिकेचे कर्मचारी सर्व्हेसाठी फिरत होते. त्यांना कुठे किती पाणी भरले ते माहिती आहे. आता तहसीलदारांना रिपोर्ट दिला.

**जयाबाई भोईर :-**

पाणी भरलेले होते तेव्हा तुम्ही आले होते का?

**महेंद्रसिंग चव्हाण :-**

मा. महापौर महोदय, इसके पहले हाऊसमे कभीभी जो घरमे बैठा था सब बाहर थे मदत नही की ऐसा कोईभी नगरसेवक नही है। उस समय सारे लागोने मदत की थी। जो सक्रीय नगरसेवक थे उन्होने मदत की है। आपका कहना बिल्कुल गलत है।

**हंसुकुमार पांडे :-**

जिनके पास काफी नुकसान हुआ था उनके पास मदत आयी थी।

**आसिफ पटेल :-**

सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चव्हाण साहब जिसके लागेबांदे ज्यादा थे उनके इलाकेमे सरकारकी मदत मिली। अधिकारीयोंसे जिनके लागेबांदे जादा थे उनके तरफ सरकारकी मदत मिली। ऐसा बोलना चाहिए। बाकी सब निष्क्रीय थे ऐसे मत बोलो और बाकी सब घरपर सोये थे ऐसे भी मत बोलिये।

**हंसुकुमार पांडे :-**

वह तलाठीकी पुँछ पकडकर घुस रहे थे। उनके पास मदत आयी है।

**जयाबाई भोईर :-**

आम्ही काय केले नाही का? आम्ही मदत केली. आम्ही ऐवढ्या पाण्यात फिरलेलो आहोत.

**आसिफ पटेल :-**

जिथे दोन फुटसुध्दा पाणी भरलेले नाही तिथेसुध्दा लोकांनामदत मिळाली आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

सर्व नगरसेवकांना विनंती करण्यांत येते की आपण सर्वांनी १२ तारखेला जी सभा तहकूब केली आपण ह्या विषयावर किती तास बोललेलो होतो. ह्याला कोणी आहे का? आतासुध्दा मिटींग तहकूब करायची आहे का? त्यामुळे विषयाला धरुन बोला. कुठला विषय चालु आहे तो विषय धरुन बोला. तुम्हाला सर्वांना ऐवढेच

बोलायचे असेल तर एवढ्या सर्व नगरसेवकांनी या विषयावर भाषणे दिलेली आहेत. मी ह्यांना सांगतो की आपले एक महिन्याचे मानधन पुरग्रस्तांना द्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**आसिफ पटेल :-**

एकदम करोडोचे नुकसान झालेले आहे.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

दोन महिन्याचे मानधन द्यायचे असेल तर दोन महिन्याचे द्यायला तयार व्हा. अशी माझी विनंती आहे.

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलू इच्छिते की माझ्या प्रभागामध्ये पाच सहा फुट पाणी होते आणि तरीही आपण विजय पार्क, गोकुळधाम ह्या माझ्या प्रभागात पाच ते सहा फुट पाणी होते. तरी अजूनपर्यंत काहीही मदत मिळालेली नाही.

**रक्षा शहा :-**

आप मानधन देनेको बोला। लेकिन रु. ४० लाख आया था उसमेसे करो।

**हंसुकुमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, मिरा भाईंदरमे पुरग्रस्तोंके लिए कितना रुपया आया वह बताईए।

**जयाबाई भोईर :-**

निधी वाटण्याचा रु. ४० हजार खर्च केला.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

एका महिन्याचा खर्च रु. ४० हजार केला.

**रोहित सुवर्णा :-**

आम्ही एक वर्षाचा निधी देऊ

**हंसुकुमार पांडे :-**

निधी रु. ४० लाख आया करके बढानेका।

**रक्षा शहा :-**

मा. महापौर मॅडम, आपको निधी बाँटना चाहिए।

**जोजफ घोन्सालवीस :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, सन्मा. सदस्य रोहीदास पाटील यांनी सांगितले की लेप्टोस्पायरसीसने जे मेलेले आहेत त्यांना नगरपालिकेची जबाबदारी म्हणून रु. १ लाख मदत डिक्लेअर करावी. हॉस्पीटलमध्ये जे उपचार घेत आहेत त्यांना सर्व खर्च नगरपालिका देईल असे डिक्लेअर करा.

**रोहित सुवर्णा :-**

मी माझा एक महिन्याचा मानधनाचा निधी त्यांना देईन. परंतु, ते कायद्यामध्ये आहे का? माझा एक वर्षाचा नगरसेवक निधी विदाऊट कमिशन द्यायची तयारी आहे. तो नगरसेवक निधी रु. अडीच लाख मी द्यायला तयार आहे.

**रतन पाटील :-**

आमच्या शिवसेनेच्या वतीने एक महिन्याचा पगार ह्या मदत निधीमध्ये देत आहोत.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी खाली बसावे.

**रतन पाटील :-**

आम्ही आपल्याला तसे लेखी लेटर देतो.

**आसिफ पटेल :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, आता सन्मा. सदस्य रोहीदास पाटील यांनी जो मुद्दा मांडला, लेप्टोस्पायरसीसला महानगरपालिकेतर्फे त्यांचे बिल भरण्याचा प्रयत्न करावा.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, या ठिकाणी सन्मा. सदस्यांनी आपल्या तीव्र सुचना मांडलेल्या आहेत. आता पुढचा विषय घ्या.

**प्रभात पाटील :-**

आपण १२ तारखेची सभा ह्या विषयावर तहकूब केलेली होती. आपण संपूर्ण सभासदांच्या भावना लक्षात घेतल्या पाहिजे.

**रोहीदास पाटील :-**

वैद्यकिय मदत करायची आहे.  मग तशी वैद्यकिय मदत करा.

**रतन पाटील :-**

कलम ६३ मध्ये आयुक्त साहेबांना तशा परवानग्या आहेत. त्यांना खर्च करण्याचा अधिकार आहे. त्या पध्दतीने त्यांनी करायला पाहिजे. ह्याच्यामध्ये बहूतेक खर्च करायला पाहिजे.

**मा. महापौर :-**

या ठिकाणी हा विषय संपलेला आहे. या विषयावर आता कोणीही वक्तव्य करु नये. दि. २६ जुलै रोजी जी पुरग्रस्त परिस्थिती निर्माण झाली या परिस्थितीमध्ये ज्यांना लेप्टोची लागण झालेली आहे आपण अशा रुग्णांना महानगरपालिकेत पूर्ण वैद्यकिय सुविधा मोफतरित्या देणार आहोत. असे मी घोषीत करते.

**रोहीदास पाटील :-**

मृत पावलेल्या व्यक्तींना काय मदत करणार?

**जोजफ घोनसालवीस :-**

ज्यांचा मृत्यु झाला त्यांन योग्य अशी रक्कम डिक्लेअर करावी.

**रोहीदास पाटील :-**

सभागृह नेते, तुम्ही योग्य असेल तर ती रक्कम सांगा. जे तुम्हाला पटते.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौरांनी रुलिंग दिल्यानंतर, मा. आयुक्त साहेबांनी, मा. महापौर जे निर्णय घेतील ते आम्हाला मान्य राहील.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मी आता तुम्हाला जे पत्र दिलेले आहे ते तुम्ही रेकॉर्डवर घ्या. महापौर मॅडम, मी एक सुचना करु इच्छिते. महापौर मॅडम, एक एक सदस्य १५-२० मिनिटे बोलू शकतो. आम्हांला तुम्ही २ मिनिटे देऊ शकत नाही. तुमचे सन्मा. नगरसेवक तुमची परवानगी न घेता उठू शकतात आणि तुम्ही मग आम्हांलाच बोलता की, परवानगी न घेता बोलता म्हणून.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मा. महापौर मॅडम, मृत व्यक्तींनासुध्दा घोषीत करा.

**कैलासबेन जानी :-**

मा. महापौर मॅडम, तहसीलदाराने आपल्या नगरपालिकेमध्ये जे सांगितलेले आहे तो सगळा सर्व्हे झालेला आहे. तरीसुध्दा आमच्याकडे दुकानदार तक्रार करतात. मी दुकानदारांना सुचना करते की, तहसीलदारांना सांगा की रिक्षा फिरवा आणि ज्यांचे ज्यांचे फॉर्म भरलेले आहेत त्यांना पैसे मिळणार नाहीत असे तुम्ही तहसीलदारांना सुचना करा आणि सांगा तहसीलदारांनी आपल्या माणसांना फॉर्म भरण्यासाठी सांगितले होते. म्हणून आपल्या माणसांनी फॉर्म भरलेले आहेत. ते आपल्या माणसांचा उपयोग करु शकतात. तुम्ही त्यांना रिक्षा लावायला सांगा आणि रिक्षामधून अनाउन्समेंट करायला सांगा. सगळ्या दुकानदारांना पैसे मिळणार नाहीत ज्यांच्याकडे पाच फुट पाणी गेले असेल त्यानांच पैसे मिळणार. तुम्ही अशी सुचना करुन रिक्षा फिरवा. आम्ही बाहेर पडलो की आमच्या मागे लागतात. तहसीलदार आपल्या माणसांचा उपयोग करु शकतो. मग तुम्ही रिक्षा फिरवा अशी सुचना देऊ शकत नाही का?

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मी त्या आपल्याला दोन गोष्टी सांगु इच्छिते की आपण १२ तारखेची सभा सोडून जिल्हाधिका-यांच्या भेटीस गेलो त्यानंतर मला असे वाटते की दोन दिवसांनी त्याला आठवडा होणार आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मदतीचा ओघ सुरु असताना मिरा भाईंदर हे एकच असे शहर आहे की आपल्याला मदत पोहचत नाही. आपण त्याचे कारण शोधले पाहिजे. आपण या एका नगराचे मा. महापौर आहात. बाजूला उपमहापौर आहेत. पालकमंत्री आपले आहेत, मुख्यमंत्री आपले आहेत असे असताना आपले शहर आपल्या लोकांना मिळणा-या सोयी सुविधांपासून वंचित राहता कामा नये. यासाठी आज युध्दपातळीवर परिस्थिती निर्माण झालेली आहे. या सभागृहाच्यावतीने मी आपल्याला विनंती करते की सन्मा. सदस्यांच्या सर्व भावना लक्षात घेता आपण आणि मा. उपमहापौर साहेबांनी जातीने या प्रश्नामध्ये लक्ष घालून शासनाने आमच्या एक दिवसाच्या मानधनाने या शहराची गरज भागणार नाही. शासनाची जी मदत आहे इतर गरजवंतासारखी आम्हालाही मिळाली पाहिजे, आमच्या नागरिकांना मिळाली पाहिजे. ही सभागृहाची भावना लक्षात घेता आपण जातीने कामाला लागा. मी ही आपल्याला सभागृहाच्या वतीने विनंती करते.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, आपण मला नेहमी बसा बसा करतात मी बसते. मी आतापर्यंत तुमचा फार मान केलेला आहे. परंतु तुम्ही माझा मान करीत नाही. मी मागच्या वेळेलासुध्दा उठली होती आणि तुम्ही मला बसविले होते. तेव्हा मी बसली होती, आता परत उठली तुम्ही मला परत बसवितात. म्हणजे तुमचे नुसते बसवायचेच काम आहे का? तुम्ही नेहमी हात असे करतात आणि खाली बसवतात. आम्ही तुम्हाला मान देऊन खाली बसतो.

**मा. महापौर :-**

ह्या विषयावर सविस्तर चर्चा झालेली आहे. आपणसुध्दा या विषयावर बोललेलो आहोत. तुम्हाला त्या विषयावर आता काय सुचना करायच्या आहेत. विषय कुठला आहे.

**रिटा शाह :-**

आम्ही विषयावर बोलतो आम्ही वेडेवाकडे बोलत नाही.

**मा. महापौर :-**

आपल्या कोणाला माझे अधिकार दिलेले नाहीत.

**रिटा शाह :-**

आम्ही रिमोट कंट्रोलने चालत नाही. तुम्ही रिमोट कंट्रोलवर चालत असाल आम्ही आमच्या हिशोबाने चालतो. तुम्ही बसून हात करुन बसविता. आपण माझा नेहमी अपमान करता. मी उठली की बसा बसा सांगतात. मी दोन तीन वेळा उठली तुम्ही मला बसायला सांगितले. मी तीन वेळा उठली तुम्ही मला तीन वेळा बसायला सांगितले तुम्ही मला बसण्यासाठी हात खाली केला, मी खाली बसली. कुठलाही दुसरा सन्मा. सदस्य बोलत असताना मी कधीही उठत नाही.

**मा. महापौर :-**

तुम्ही तुमच्या सुचना थोडक्यात मांडा.

**रिटा शाह :-**

सुचना थोडक्यात मांडावी हे बरोबर आहे. मी सकाळ पासून उठत नाही, बोलत नाही कारण मी नेहमी टार्गेट बनते म्हणून मी बोलायचे बंद केले. आपण मा. महापौर आहात त्यामुळे आपण प्रथम या सभागृहाचे हे लक्षात ठेवा. तुम्ही महापौर आहात तुम्हाला जेवढ्या पॉवर्स आहेत तेवढ्या शासनाने सभासदांनासुध्दा पॉवर्स दिलेल्या आहेत.

**मिलन पाटील :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह तुम्ही बोला.

**रिटा शाह :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील, तुम्ही बोलत असताना आम्ही मध्ये बोलत नाही. आम्ही का बोलतो कारण आम्हालासुध्दा माहित आहे की तुम्हाला जास्त समजते. सकाळपासून हे चालले आहे. मला असे वाटते की सभागृह डिसीप्लेनने चालवायला तुम्ही करु इच्छिता आणि आम्हीसुध्दा करु इच्छितो. सभागृह डिसीप्लेनने चालायला पाहिजे. सभागृहाचे मा. महापौरांना आता एक नाही, दोन नाही, तीन मिनिटामध्ये, एक तास, दीड तास उशीरा येतात. हे सर्वांना माहित आहे की कुठल्याही एका विषयावर सेटींग होत नाही. सभासद वाट बघत राहतात. मिटींग सुरु होणार म्हणजे आमच्या वर्गात टिचर आलेल्या नाहीत आणि मुले गप्पागोष्टी करतात असे घडत आहे. ह्या शहराची तशी परिस्थिती आहे. आज आपला देश स्वतंत्र देश आहे आणि वाणी स्वतंत्र आहे. हा प्रत्येकाचा अधिकार आहे. सभागृहात एकत्र सभासदांनी किती बोलायचे आणि काय बोलायचे ते सर्व सभागृहाला माहित आहे. इथे एका विषयाचे, एका प्रश्नाचे चांगल्या रितीने उत्तर मिळत नाही म्हणून सभासद वारंवार उभे राहतात. आपल्याकडे रु. ५० लाखाचा मुद्दा उपस्थित केला की ते कायदेशीर आहे की बेकायदेशीर तेव्हा शिंदे साहेब बालले होते की मला बघावे लागेल. विधी सल्लागारांना विचारावे लागेलते आजपर्यंत विचारत राहीलेले आहेत. आणि त्यांचे काय वाटोळे झालेले कोणाला माहित नाही. परंतु आम्ही स्टँडींगचे सभासद आहोत. मला असे वाटते की रु. ५० लाखाच्या पॉवर्स आम्हाला मिळालेल्या आहेत. मग त्याचे इम्प्लीमेंटेशन झालेले आहे. परंतु शिंदे साहेबांनी आत्तापर्यंत आणि आजपर्यंत ते विचारुन घेतलेले नाही. की ते कायदेशीर आहे की बेकायदेशीर आहे. इतर नगरपालिकेत काय झाले असे नाही की आज कमिशनर गायकवाड साहेब आलेले आहेत ते काहीतरी कारस्थान करुन गेले म्हणजे सगळे संपले असे नसते. मॅडम, माझी एक विनंती आहे की मी उठायचे बंद केलेले आहे कारण मी सभागृहाचा जास्त वेळ घेते. म्हणून मी उठायचे बंद केलेले आहे. कारण जे होणार आहे ते होणार आहे. आपल्याकडे मेजॉरीटी आहे. मीसुध्दा सत्तेमध्ये सहभागी आहे. कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी सत्तेमध्येसुध्दा मी सहभागी आहे आपल्याकडे मेजॉरीटी आहे म्हणून आपण सर्व काही करुन घेता याचा अर्थ असा नाही की, आपण काहीही करुन घेऊ शकता. हे सर्व खोटे चाललेले आहे. आम्हाला डिसीप्लेन शिकवायचा असेल तर प्रथम आपण डिसीप्लेन शिका.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मा. महापौर मॅडम, आपण आता लेप्टोस्पायरसीसच्या रुग्णांना ओषधांचा जो खर्च जाहिर केला तो आपण अगदी स्तुत्य निर्णय घेतला. त्याचबरोबर मृत आहेत आपण त्यानांही अशी रक्कम जाहिर करावी.

**परशुराम पाटील :-**

डॉक्टर साहेब आता हे बघा. डेंग्यु आणि मलेरियावर जे बाधीत आहेत आपली परवाची मिटींग ह्या विषयावर झाली. आज शहरामध्यें कोणकोणते रुग्ण आहेत त्याची सविस्तर माहिती द्या. आपण ती माहिती

दिली त्याच्यामुळे सभागृहामध्ये अशी चर्चा होणार नाही आणि हा टाईमपास होणार नाही. आपण उठून माहिती द्या.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मा. महापौर मॅडम, आपण एखादी रक्कम एक सहानुभुती म्हणून जाहिर करावी.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, बॉम्बेवालोंको रु. १ लाख का निधी घोषीत किया था। आप लोंग कमसेकम रु. ७५ हजार की रक्कम मृत लोगोंके लिए घोषीत किजिए। ऐसी मेरी सुचना है। १० लोग मरे होंगे तो रु. ७.५० लाख होगा। मिरा भाईंदर महानगरपालिका के पास साडेसात लाख भी नही है क्या?

**रोहीदास पाटील :-**

तुम्ही याचा शहानिशा करा. जे नियमात आहे ते बघा. जे मृत झालेत त्यांना रु. २ लाख देण्याचे ठरलेले होते. त्यांचे वाटप रु. १ लाख राज्यशासनाने आणि रु. १ लाख केंद्रशासनाने दिलेले आहेत. त्यांना रु. २ लाखाचा धनादेश मिळालेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य रोहीदास पाटील जरा सेक्शन वाचून दाखवितो. माझ्या वॉर्डमध्ये एक लेप्टोस्पायरसीसचा रुग्ण आढळलेला आहे. त्याच्यामध्ये जो हॉस्पीटलमध्ये ॲडमीट आहेत.

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते की, सर्व प्रभागामध्ये पाणी भरले होते आणि आमच्या आंबेडकर नगरमध्ये माझे वॉर्ड यांनीसुध्दा फोन केलेला होता त्यांनी स्वतःहून बघितले आहे की पाणी घरात घुसलेले आहे म्हणून आंबेडकर नगर, भोलानगर, गांधीनगर यांना अजूनही काहीही मदत मिळालेली नाही. आपण त्याचा निष्कर्ष करीत आहात आणि निष्कर्ष झाल्यानंतर मी खरोखरच सांगते की ज्यांच्या घरात खरोखरच पाणी गेलेले आहे, सर्व प्रभागात ज्यांच्या घरात पाणी गेलेले आहे त्यांना अगोदर आर्थिक मदत द्या.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आता ही जी सगळी चर्चा झाली. माझ्या वॉर्डमध्ये मा. आयुक्त साहेब स्वतः आलेले होते. त्यांनी सांगितले की मी त्यांना बोललो की एका गरीब माणसाचा मुलगा त्या ठिकाणी ॲडमिट आहे. आपण त्याच्या हॉस्पीटलचे बिल देऊ शकतो का? कायद्यात तरतुद आहे का? बघावे लागेल असे त्यांनी सांगितले. त्यावेळेला आपले ऑडिटर वगैरे सगळे होते. सेक्शन ६३ नुसार कमिशनर साहेबांना याचे पूर्णपणे अधिकार आहे. ह्याच्यामध्ये नं. ६ संसर्गिक किंवा संक्रमण रोगांनी आजारी असलेले किंवा अशा रोगाची बाधा असलेले किंवा शंका असलेल्या व्यक्तींना वेगळे ठेवण्यासाठी, उपचार करण्यासाठी असलेल्या रुग्णांसहीत सावर्जनिक रुग्णालये, दवाखाने बांधणे वगैरे तसेच सार्वजनिक वैद्यकिय सहाय्यासाठी असतील अशा अन्य उपाययोजना करणे म्हणजे आता आपण हा जो विषय या ठिकाणी चर्चेला चाललेला आहे. मा. आयुक्त साहेबांना या सेक्शन नुसार संपूर्ण अधिकार आहेत. आपण ह्याच्यावर करोडो रुपये खर्च करु शकतो. त्याचे लिमीट नाही. आपण ह्या सेक्शनचा आधार घेऊन आजच्या आज ठराव करुन घ्या आणि ही चर्चा या ठिकाणी संपवा. आता पुरग्रस्त परिस्थिती बघा. नं. १६ रोगट वस्त्यांच्या सुधारणा, उपद्रावक झाडेझुडपे कापून टाकणे वगैरे म्हणजे वस्तीची साफसफाई करणे. नं. १७ जन्म आणि मुत्युची नोंदणी म्हणजेच आता जे मृत्यु होतात. नं. २० महानगरपालिकेतील सर्व पाणी पुरवठा केंद्राची व्यवस्था चांगली राखणे. दुर्धर रोगाच्या प्रचारास प्रतिबंधक आळा घालणे. नं. २४ या अधिकारा अन्वये तद्नुसार त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याची कोणतीही जबाबदारी पार पाडणे. ही सर्व सेक्शन ६३ मध्ये आणि त्याच्यामध्ये २१ सुध्दा आहे. आपण त्या सगळ्यांची तरतुद वाचून आज ठराव करुन विषय संपवून टाका. येणाऱ्या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे. तुम्ही सेक्शन ६३ चा वापर करुन घ्या.

**रोहीदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आमच्या हे लक्षात येत नाही की मा. आयुक्त साहेब गप्प आहेत, त्यांचे मंत्रीमंडळ गप्प आहे. कायद्याची गोष्ट असेल तर तुम्हाला सांगायला हे लोक कशाला सल्ला देत नाहीत. नाकाडी साहेब, आम्ही चुकीचे बोलतो, खरे बोलतो, काय बोलतो तुमचे मा. आयुक्त साहेब काय बोलतात ते मा. महापौर मॅडमना सांगा.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही काय सेक्शन वाचले. त्याचे तुम्ही ह्याच्यावर रुलिंग द्या.

**रोहीदास पाटील :-**

आम्ही जबरदस्ती करत नाही. आमचा कुठल्याही गोष्टीला आग्रह नाही. आमचे निवेदन असे आहे की त्या सगळ्या महापालिकेच्या सुविधा आहेत. नियमात आहे. हा कोड वाचून दाखवायची आमच्यावर पाळी का येत आहे. आम्ही चूकीचा आग्रह करतो का? आम्ही वाचून सांगतो की अनेक महापालिकांनी आपापल्या सुविधेनुसार सवलती जाहिर केलेल्या आहेत, वैद्यकिय मदत जाहिर करु शकता, मृत झालेल्या व्यक्तींना मदत

जाहिर करु शकता. आपल्या बजेटनुसार तुम्ही करा. त्यांनी रु. १ लाख केले. आपले रु. ९० हजार, रु. ९५ हजार करा. याच्याहून कमी करा, त्याच्याहून कमी करा. खरोखरच शहानिशा केल्याशिवाय तुम्ही देणार नाही काय? ते लेप्टोस्पायरसीसचे पेशन्ट आहेत, तुम्ही तेवढाच चेक देणार आहात. आपण ऐवढ्यावेळा येऊन ऐवढे उगीचच बोलायचे आणि मग चुकीचा शब्द वापरतो. त्याच्यावर चर्चा होते हे कशासाठी तुम्ही वैद्यकिय मदत सांगितली. आपण मृतांना आकडा घोषित केलेला नाही. तुम्हाला योग्य वाटते ते द्या. आम्ही तुम्हाला लिबर्टी दिलेली आहे. तुम्ही जी रक्कम सांगाल ती रक्कम जाहिर करु.

**रोहित सुवर्णा :-**

मॅडम ६३ च्या २१ मध्ये डेंग्यु आणि लेप्टोस्पायरसीसबद्दल दुर्धर रोगांच्या प्रसाराला प्रतिबंध करणे आणि आळा घालणे. तसेच २५ मध्ये मा. आयुक्त साहेबांना संपूर्ण अधिकार आहेत. ह्या अशा परिस्थितीमध्ये अतिवृष्टी, भुकंप असे इतर असेल तर जनतेसाठी करोडो रुपये खर्च करु शकतात. जर विनिर्दीष्ट केलेल्या बाबींसाठी पुरेशी तरतुद करणे. आणि अशावेळी सर्वेक्षणाद्वारे कामे सुरु करणे आणि ते चालु ठेवणे. मी आपल्याला सांगु इच्छितो की ठाणे महानगरपालिकेने वाल्मिकी आंबेडकर आवास योजने अंतर्गत केंद्र शासनाकडून जे रु. २० हजार येतात आणि राज्य शासनाकडून रु. २० हजार येतात. महानगरपालिकेन बेघर लाकांना प्रत्येक व्यक्तीच्या मागे रु. १० हजार दिलेले आहेत. तो ठराव ठाणे महानगरपालिकेत मंजूर झालेला आहे. आपण आज तो निर्णय बेघर लोकांसाठी घेऊ शकतो. अशा अनेक महानगरपालिकेने असे निर्णय घेतलेले आहेत आणि आपल्याला ते पर हेड, पर हाऊस अधिकार आहेत.

**डॉ. रमेश जैन :-**

मा. महापौर की परवानगीसे बोलता हूँ की, जितने भी संक्रमक रोग अभी मिरा भाईंदर क्षेत्रमे चल रहे है और जिसको लेप्टोस्पायरसीस, डेंग्यु रिपोर्ट पॉझीटिव्ह है और उसके कारण मर गया है।तो उसको अपने तरफसे रु. ५० हजार या रु. ७५ हजार देना चाहिए।

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम कृपया आपण ह्या विषयावर रुलिंग द्यावे. मा. आयुक्त साहेब कृपया आपण रुलिंग द्यावे. आपण ऑडीटरांचे ओपीनियन घ्यावे.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, या ठिकाणी सन्मा. सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन पुरग्रस्तांना मदत करण्याचा जो विषय आहे आणि जे अनेक रोगाने या पुरामध्ये बाधित झालेले आहे, त्या अनुषंगाने सर्व सन्मा. सदस्यांनी या ठिकाणी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. आपणही महानगरपालिकेच्यावतीने त्यांना औषधाचा खर्च करण्याचे मान्य केलेले आहे. त्याला सर्व सन्मा. सदस्यांनी मान्यता दिलेली आहे. दुसरा आर्थिक मदत करण्याचा जो विषय आहे. या ठिकाणी सर्व सन्मा. सदस्यांच्या भावना त्यांना आर्थिक मदत करण्याच्या आहेत परंतु, त्या कायद्यात कशा काय बसतात यावर चर्चा केली तर संपूर्ण दिवस जाईल यासाठी आपण सर्व गटनेते. मा. आयुक्त साहेब सर्वांनी तुमच्या दालनामध्ये बसून ह्याच्यावर निर्णय घ्यावा आणि त्याप्रमाणे आपण त्यांना आर्थिक मदत नियमाने कशी करता येईल त्याचा विचार करावा आणि सभागृहामध्ये त्या विषयावरची चर्चा थांबवावी.

**मिलन म्हात्रे :-**

हा ठराव इकडे घ्या. हे सभागृह आहे.

**मा. उपमहापौर :-**

हा ठराव होऊ शकत नाही. विषय पत्रिकेवर नसलेल्या विषयावर चर्चा करणे म्हणजे ठराव होऊ शकत नाही.

**रोहित सुवर्णा :-**

६३ मध्ये मा. आयुक्त साहेबांनी निवेदन करुन तो अधिकार मा. महापौरांना आहे असे निवेदन घऊ शकतो.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा, सभागृहाच्या ज्या भावना आहेत. आपण या ठिकाणी त्या भावना व्यक्त करीत आहोत इथे कोणाचेही असे असायचे कारण नाही की कोणाला मदत मिळू नये. प्रत्येकालाच वाटते की मदत मिळाली पाहिजे. आपल्याकडे ८५४१ पंचनामे झाले त्यानंतर आत्तापर्यंत जी मदत झाली ती मदत एकूण १७१८ लोकांना रु. ४३ लाख ८३ हजार वाटले गेलेले आहेत. कोणाला काहीही बोलायचे कारण नाही. मी स्पष्टीकरण देत नाही. ती सांगतो ती माझी माहिती आहे ते ऐकून घ्यायचे आहे. हे जे पैसे वाटले गेले ते जास्त करून फक्त स्लम परिसरामध्ये वाटले गेलेले आहेत. या घटनेने शहराचा बराचसा भाग अडचणीखाली होता. त्याच्यानंतर काही पंचनामे ८५४१ मध्ये बाकी होते. ते पूर्ण झालेले आहेत. सन्मा. सदस्यांनी असे सांगितले की रिक्षाने अनाऊन्स केले पाहिजे. सन्मा. सदस्या शुभांगी नाईक तुमच्या प्रभागात नाही तर ह्या सदनातील कुठलाही नगरसेवक, कुठलाही अधिकारी किंवा कुठलाही सामाजिक कार्यकर्ता, प्रतिष्ठीत मंडळी

रस्त्यात ज्यांना ज्यांना अफेक्टेड व्यक्ती भेटले की त्यांना ते विचारतात की आम्हाला अजूनपर्यंत काही मिळालेले कसे नाही. काही लोक विचारतात की दहा किलो गहू मिळाले नाही, दहा किलो तांदूळ मिळाले नाही, दहा लिटर केरोसीन मिळाले नाही, रु. ५ हजार मिळाले नाही. शासनाचें धोरण होते. त्या धोरणाप्रमाणे माणसी रु १ हजार आणि जास्तीत जास्त रु. ५ हजार देण्याचा प्रयत्न होता. ही मदत मिरा भाईंदरमध्ये दिली पाहिजे यासाठी सर्वांनी पोटतिडकीने प्रयत्न केला. आपण पुढचे प्रयत्न करणार आहोत ते तुम्हाला सांगितले आहे. असे झाले तर आपल्या सगळ्यांच्याच हिताची बाब आहे कारण प्रत्येकाला कोणाला काय उत्तर द्यायचे हा प्रश्न पडलेला आहे. आणि ह्या सदनाचे असे मत आहे की जेवढ्या कोणाला काही करता येण्यासारखे आहे ते केले पाहिजे. आपण प्रत्येक सन्मा सदस्यांच्या भावना समजून घेऊ शकतो. इथे कोणाचे काही काळे-गोरे असण्याचे कारण नाही. किंवा त्याच्यामध्ये कोणाचे राजकारण असण्याचे कारण नाही. मदत देऊ नये असे कुठल्याही सन्मा. सदस्यांना वाटत नाही. असे कोणाचेही मत नाही. त्यामुळे आपण जोरात बोललो. आपण दोन वेळा बोललो की पाच वेळा हे महत्वाचे नाही. तुम्ही जेवढ्या वेळा उठलात म्हणून त्याची समाधानाने नोंद घेतली असे होणार नाही. कायदेशीररित्या कशाप्रकारे हा प्रश्न सोडवता येईल मा. आयुक्त साहेबांनी व लेखापरिक्षकांनी आपल्याला सुचना केलेल्या होत्या. आपल्याला मार्गदर्शन केले. सन्मा. सदस्य मॉरस रॉड्रीक्स यांनी सांगितले की आपल्याला प्रत्येकाने नगरसेवक मानधन प्रत्येक महिन्याचे आहे. ते दिले तर आपण तो निधी जमवू. जेव्हा १७१८ लोकांना रु. ४३ लाख ८३ हजार वाटले जातात तेव्हा आपल्या सर्वांचे नुसते नगरसेवक मानधन नाही तर नगरसेवक निधीसुध्दा जाहिर करायचा आपण प्रयत्न केला. तरीही या सर्वसाधारणपणे नऊ हजार लोकांना आपण पुरवू शकत नाही. मागणा-यांच्या मागण्या फार मोठ्या आहेत. मागणा-यांना, विविध संस्थांना, हितचिंतकांनी मदत केली. मागणारा हा वारंवार विविध लोकांकडे जातो. तो सांगतो की आम्हाला मिळाले पाहिजे. आम्हाला मिळत नाही. दुसरा प्रश्न सन्मा. सदस्य रोहीदास पाटील यांनी उपस्थित केलेला होता की आपण लेप्टोस्पायरसीसच्या मृतांना काय मदत करणार किंवा रुग्णांना काय मदत करणार? या संदर्भात शासनाकडून कुठलीही योजना आजपर्यंत निश्चित घोषीत झालेली नाही. मुंबई महानगरपालिकेने नेमके काय ठरवून केलेले आहे. आपण याबाबत थोडीशी माहिती घ्यायला पाहिजे. लेप्टोस्पायरसीसचे रुग्ण म्हणजे काय? जेव्हा रुग्ण पहिल्या दोन दिवसात सापडायला लागले तेव्हा कुठच्याही हॉस्पीटलमध्ये गेलात की, डॉक्टर आपल्या पोटतिडकीने सांगायचे की, लेप्टोस्पायरसीसचे सिम्टन्स आहेत. आम्ही कस्तुरी मेमोरीयलमध्ये गेलो त्यांनी सांगितले की, आमच्याकडे आतापर्यंत नऊ पेशन्ट दाखल आहेत. मृत्युमुखी कोणी नाही. सगळे बरे होऊन गेले. एक जेसलपार्कचा डॉक्टरसुध्दा तिथे ॲडमिट होता. मंगलमुर्ती हॉस्पीटलमध्ये गेलो तेव्हा त्यांनी तिथे दोन रुग्ण असल्याचे सांगितले. मिरारोडला साईकृपा हॉस्पीटलमध्ये तीन रुग्ण होते. त्यावेळेला वाघ आला रे वाघ आला रे अशी जी सुरुवात होते तसाप्रकार झाला. जरासा सर्दी, खोकल्याचा ताप आला की त्याला मोठा ताप आहे असे बोलतात. आपण सर्वसाधारणपणे १०२ चा ताप आहे असे बोलत होतो. परंतु १०३, १०४, १०५ असे डॉक्टर सांगत होते. ब-याच अंशी शहरामध्ये आरोग्यामध्ये झपाट्याने सुधार झाला. सर्व डॉक्टर त्या कामास लागले होते. महापालिकेची जी आरोग्य केंद्रे आहेत त्या आरोग्य केंद्रातुन ११४०० लोकांनी गोळ्या घेतल्या आहेत. शहरामध्ये विविध ठिकाणी जे कॅम्प्स सुरु होते. त्या माध्यमातुन ३४००० लोकांना गोळ्यांच्या मोफत वितरण करण्यांत आलेले आहे. सन्मा. सदस्य रोहीदास पाटील यांनी प्रश्न उपस्थित केलेला होता की जे लेप्टोस्पायरसीसचे रुग्ण आहेत आपण त्या रुग्णांना मदत करणार आहोत का?

**रोहीदास पाटील :-**

रुग्णांना आणि मृतांसाठी काय मदत करायची आहे.

**मा. उपमहापौर :-**

हे दोन्ही प्रश्न होते परंतु लेप्टोस्पायरसीसचे टेस्टही पुण्याला होत असते. आता त्या संदर्भात प्रत्यक्ष सन्मा. सदस्य प्रकाश दुबोले साहेबांनी सुचना उपस्थित केलेली होती की आपण गटनेत्यांच्या मिटींगमध्ये मा. आयुक्त साहेब, मा. महापौर आणि लेखापाल आहेत. याबाबत त्यांच्याशी सर्व चर्चा केली तर निश्चित धोरणापर्यंत जाऊ जर त्याला महासभेचा ठराव लागत असेल तर आपण पुढच्या आठवड्यात एक महासभा घेतो त्याच्यामध्ये तसा ठराव घेऊ आपण आज मोघम काहीतरी बोलायचे, घोषणा करायच्या त्यापेक्षा आपण तसा ठराव देऊ शकलो नाही. किंवा तशी मदत करु शकलो नाही तर आपण त्याच्यावर सन्मा. सदस्य रोहीदास पाटील परत बोलण्याची, तयारी करण्याची काहीही गरज नाही. आपल्या सगळ्या सुचना विचारात घेण्यांत येतील. आपण सगळेजण त्या मताशी निश्चितच आहोत कारण आपल्या सगळ्यांचा एकच मुद्दा आहे. कोणाला मदत करता येणार नाही. त्या मताचे कोणीच असायचे कारण नाही. तुम्ही आपल्या सगळ्या सुचनांचा विचार सांगा. उद्या बैठक घ्यायची तर उद्या २:०० वाजताची बैठक ठरवा. आणि कमिशनर साहेब आपणही ह्या सभेला संबोधीत करावे. ह्या विषयावर खुप चर्चा झालेली आहे. अजूनपर्यंत सगळ्यांच्या भावना उचंबळून येत आहेत. या सदनामध्ये असे कित्येक सन्मा. सदस्य बसलेले आहेत की त्यांनी आपल्याकडचे रु. १ लाख, रु. २ लाख, रु. ५ लाख, रु. १० लाख देखील खर्च केलेले आहेत. शहराच्या विविध ठिकाणी जेवणापासून अन्नधान्य

वाटप करणे, कपडे देणे, औषध देणे, रक्कम देणे हे या शहरात नाहीतर शहराच्या बाहेर जाऊन केलेले आहे. प्रत्येकजणाने आपआपल्या परीने सहकार्य करण्याचा प्रयत्न केलेला आहे. दुखते कुठे? की शासन सगळीकडे देते आणि आम्हाला देत नाही. ते आपल्याला दिसते. या भावनेतुन कलेक्टर साहेबांकडे गेलो होतो ह्या आपल्या भावना घेऊन आपण मा. महापौर मॅडमच्या सहकार्याने मंत्रालयात देखील जाऊन आपला आवाज त्यांना देऊ आणि आपले अजूनही प्रयत्न चालु आहेत. जी जी मदत शक्य होईल ती ती करुन घेऊ.

**प्रकरण क्र. २४ :-**

दि. १३/०४/२००५ व दि. ०५/०५/२००५ (दि. १३/०४/२००५ रोजीची तहकुब सभा) रोजीचे मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. २६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या महासभा ज्या दि. १३/०४/२००५ व दि. ०५/०५/२००५ रोजी झाल्या होत्या. त्या सभांची जी सभावृत्ते आता मा. महासभेपुढे कायम करण्यासाठी ठेवण्यात आली आहे. त्यांचे पृष्ठनिहाय वाचन झाले असून सदरच्या दोन्ही सभावृत्तांत उपस्थित सदस्यांनी सूचविलेल्या दुरुस्तीसह दि. १३/०४/२००५ व दि. ०५/०५/२००५ ह्या सभांची सभावृत्ते कायम करण्यांस ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.** **अनुमोदन :- श्री. हंसुकुमार पांडे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सहि/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते. महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख व उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील साहेब, यांनी पुढाकार घेऊन जे लेडीज बार बंद केले त्याच्याबद्दल मी जनता दलातर्फे त्यांचे आभार मानते. मी अभिनंदनाचा ठराव मांडते.

**अभिनंदन ठराव क्र. २६(अ) :-**

महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री श्री. विलासरावजी देशमुख साहेब व उपमुख्यमंत्रीजी श्री. आर. आर. पाटील साहेब यांनी जो पुढाकार घेतला आणि लेडीज डान्स बार जे बंद केले त्याच्याबद्दल आम्ही जनता दलातर्फे त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. नयना म्हात्रे.** **अनुमोदन :- श्री. मिलन म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सहि/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २५ चे वाचन केले.)

**जेन्वी अल्मेडा :-**

(ठरावाचे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. २५ :-**

श्रीम. गिता भरत जैन ह्यांनी महिला बालकल्याण समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या एका जागेवर पोटनियम २ अन्वये एका महिला सदस्याची या रिक्त जागी ठरावाद्वारे नेमणुक करणे.

**ठराव क्र. २७ :-**

आपल्या महापालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सन्मा. सदस्या सौ. गिता भरत जैन ह्यांनी समितीचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर पोटनियम २ अन्वये सन्मा. सदस्या सौ. सुनिता कैलास पाटील ह्यांची नेमणुक करण्यांत येत आहे. त्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्रीम. जेन्वी आल्मेडा.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सहि/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २६ चे वाचन केले.)

**प्र. सचिव :-**

या प्रकरणाचा गोषवारा दिलेला नाही. त्याच्यामुळे कलम ३० ची माहिती वाचून दाखवतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

या विषयाची टिपणी देखील दिलेली नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

या ठिकाणी अजेंडा दिलेला नाही.

**रोहित सुवर्णा :-**

आम्हाला गोषवारा दिलेला नाही. तुम्ही कुठल्या कुठल्या कमिटीवर कुठली कुठली कमिटी नेमणार आहात. मा. आयुत साहेबांच्या याच्यावर गोषवारा नाही.

**महेंद्रसिंग चौव्हाण :-**

सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा, आप कॉप के सदस्य है। आपको बोलने की जरुरत नही है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सभागृहमे ताकद है तो निकालके बताओ।

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही माझा विषय काढलेला आहे म्हणून मला बोलणे गरजेचे आहे. स्नमा. सदस्य महेंद्रसिंग चव्हाण हेसुध्दा एकदा स्वतः कॉपमध्ये निवडून आलेले आहेत. हे कदाचीत त्यांना माहिती नाही. सन १९९२ मध्ये ७४ अमेन्डमेन्ट आला त्याच्यामध्ये कुठली कुठली कमिटी नेमण्यांत आली. त्या कमिटीची नांवे मी त्यांना सांगतो. कदाचित ती नांवे त्यांना महिती नसतील मार्केट ॲन्ड गार्डन कमिटी, स्लम इम्प्रुव्हमेन्ट कमिटी, सॅनिटेशन वॉटर सप्लाय कमिटी, युथ कल्चरल कमिटी, वुमेन ॲन्ड चिल्ड्रन वेल्फेअर कमिटी, प्लॅनिंग डेव्हलपमेन्ट कमिटी, एज्युकेशन ॲन्ड हेल्थ कमिटी, ट्रान्सपोर्ट कमिटी ह्यांना माहिती आहे का? कल्पना आहे का?

**प्रेमनाथ पाटील :-**

सचिव साहेब, आपल्याकडून जो विषय यायला पाहिजे तो सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा यांनी काढलेला आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

इन सारी कमिटीके चेअरमन इनको बनालो। बाकी हम लोग इस समितीयोंपर डिस्कस करेंगे। इन समितीयोंका सब कुछ इनको दे डालो।

**रोहित सुवर्णा :-**

या ठिकाणी मा. आयुक्त साहेबांनी गोषवारा दिलेला नाही.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. आयुक्त साहबने क्या क्या किया। यह कमसे कम चार कमिटीयॉ है। इधर उधर बाटेंगे। आपको क्या जरुरत है।

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहामध्ये गोषवारा नसल्यामुळे तुम्ही कुठली समिती नेमणार आहात. ते आम्हाला माहिती नाही. किंवा एखादी जागा खाली असते म्हणून तुम्ही जागा क्लेम करता का?

**प्र. सचिव :-**

कलम ३० प्रमाणे जी कार्यवाही आहे ती मी वाचून दाखवतो.

(कलम ३० चे वाचन केले.)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, कामकाजाचे वाटप जास्तीत जास्त पध्दतीने व्हायला पाहिजे. समित्या होणे आवश्यक आहे. परंतु आत्ताच सभागृहामध्ये एक विषय निघाला की, बंदरवाडी शाळेवर प्रभाग अधिकारी अतिक्रमण करतात म्हणून शाळेतल्या मुलांना बसायला जागा नाही. ह्या सर्व विशेष समित्या स्थापन करण्यासाठी महापालिकेची तेवढी पुरेशी जागा आहे का? त्या समित्या स्थापन झाल्यानंतर ते बसतील कुठे? आज हा प्रश्न गंभीर झालेला आहे. आपण इकडे बसतो परंतु प्रभाग कार्यालय तिकडे आहे. टॅक्सचा अधिकारी इकडे बसतो, मा. आयुक्त साहेब दुस-या माळ्यावर बसतात कुठल्याही नागरिकाला कुठलीही गोष्ट करायला आता तर फक्त त्याला या बिल्डींगमधुन त्या बिल्डींगमध्ये आणि त्या बिल्डींगमधुन या बिल्डींगमध्ये फिरायला वेळ जातो. अशी समिती स्थापन करण्यापूर्वी महापालिकेने त्या समितीला बसण्याची व्यवस्था करावी. जेणेकरुन

त्यांचे काम चांगल्या पध्दतीने होईल. आपण त्याचे गांभीर्य लक्षात घेतले पाहिजे. म्हणून तुम्ही हा विषय तात्पुरता स्थगीत करुन महापालिकेच्यावतीने सर्व समित्या स्थापन केल्यानंतर कुठे बसता येईल, काय धोरण करता येईल याचा विचार करुन निर्णय घ्यावा अशी आमची सुचना आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलतो की, सत्ताधारी पक्षाने नियमातील तरतुदीप्रमाणे कलम ३० खाली विविध समित्या असाव्यात अशा स्वरुपाची भुमीका घेऊन आजच्या सभेपुढे प्रस्ताव आणलेला आहे. हा प्रस्ताव आणताना निश्चितच जेव्हा प्रशासनाची टिपणी असते त्यावेळेला सभासदांमध्ये एक प्रकारचा पूर्ण विश्वास असतो. कामकाजाबद्दल खात्री असते. परंतु सभागृहाला टिपणी न दिल्यामुळे निश्चित्तच सत्ताधारी पक्षाखेरीज अन्य सदस्यांच्या मनामध्ये चलबिचल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सन्मा. सदस्य ओमप्रकाश गाडोदिया यांनी एक मुद्दा उपस्थित केलेला आहे. आमच्या वतीने हा प्रस्ताव आणताना काही घाई झालेली आहे असे मला वाटते. तर खरोखरच सत्तेचे विकेंद्रीकरण हे आवश्यक आहे. ही महापालिका नव्याने स्थापन झालेली असल्यामुळे केवळ स्थायी समिती आणि केवळ महिला व बालकल्याण समिती यांच्या माध्यमातुन महापालिकेचे कामकाज करीत आहोत. परंतु या विविध स्वरुपी सर्व समित्या या सभागृहाला आवश्यक वाटतात त्याच्यामध्ये कोणाचे दुमत असण्याचे कारण नाही. म्हणून सन्मा. सदस्य ओमप्रकाश गाडोदिया यांनी फक्त केल्याप्रमाणे इतर सन्मा. सदस्यांनी सभागृहामध्ये येताना व्यक्त केलेले आहे की, पहिल्यांदा बसण्याची व्यवस्था करा. याच्याबद्दल मी मुद्दाम सभागृहाच्या माहितीसाठी सांगेन की आऊट गोईंग आयुक्त यांच्याशी चर्चा होऊन या सर्व कमिट्यासाठी नगर भवन कार्यालयामध्ये बसण्याची व्यवस्था करायची का? अशा स्वरुपाचा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. नगरभवनमध्ये जे बॅडमिंटन कोर्ट आहे ते स्क्रॅप करुन त्या ठिकाणी अजून काही करता येईल का? अशाही सुचना आलेल्या होत्या परंतु सभागृहाची ही तन्मयता लक्षात घेऊन सन्मा. सदस्य ओमप्रकाश गाडोदिया यांनी असे सजेस्ट केलेले आहे की, परिपूर्ण व्यवस्था करुनच हा विषय पुढे घ्यावा. आम्ही त्याला सहमत आहोत.

**मा. महापौर :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ नियम ३० अन्वये विशेष समित्या स्थापन करणे हा विषय सध्या स्थगीत करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. २६ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ नियम ३० अन्वये विशेष समित्या स्थापन करणेबाबत.

**ठराव क्र. २८ :-**

मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**सहि/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(लंच टाईम २:३० ते ३:३० वा.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २७ चे वाचन केले.)

**मिलन पाटील :-**

(ठरावाचे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

एवढी दुरुस्ती आली तर असा रिपोर्ट कसा पाठवणार? रिपोर्ट सेवाशर्तीमध्ये दुरुस्ती करुन पाठवायचा होता.

**रोहित सुवर्णा :-**

काय तरतुद आहे ते तुम्ही वाचून दाखवत नाही. तुमची सुचना आहे.

**मिलन पाटील :-**

मी दुरुस्ती वाचून दाखवितो.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, पान क्र. २४ वर काय दुरुस्ती आहे? सन्मा. सदस्य मिलन पाटील साहेब, पान क्र. २४ वर आपण जे वाचून दाखविले की मनपा, नपा, स्थानिक स्वराज्य संस्था त्या पॅरेग्राफमधील नेमकी काय दुरुस्ती आहे.

**मिलन पाटील :-**

तीन वर्षे

**रोहित सुवर्णा :-**

ते तीन वर्षे कुठे आहे.

**मिलन पाटील :-**

त्याच्यामध्ये आहे ते तुम्ही बघा.

**रतन पाटील :-**

ह्या सेवाशर्तीसाठी हे सुचक आहेत आणि हेच दुरुस्त्या सुचवित आहेत. हा कुठला न्याय आहे. दुरुस्ती पूर्ण करुन तिथे पाठवायचे होते. हे सभागृहाचा वेळ वाया घालवत आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, ज्यावेळेला बजेटवर चर्चा होत होती तेव्हा तुमचे लोक म्हणायचे तुमच्या त्या चर्चेत होते मग आता गोंधळ कशाला घालता. आता हा स्वतंत्र ठराव आहे याचा त्यांनी विचार केला पाहिजे. त्यांनी ठराव कशाला मांडायचा. स्थायी समितीमध्ये ते होते त्यांना ठराव मांडायची काय गरज आहे. स्थायी समितीमध्ये त्यांनीच ठराव मांडलेला होता.

**रतन पाटील :-**

मी जे बोलतो ते चुकीचे बोलतो का? ह्या ठरावाचे सुचक सन्मा. सदस्य मिलन पाटील आहेत. खरे म्हणजे त्यांना कळायला पाहिजे होते की आता सभागृहात दुरुस्ती कशी केली जाते.

**रोहित सुवर्णा :-**

मॅडम, ते ठराव वाचत आहेत.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ह्या मा. महापौरांनी ज्या दुरुस्त्या केलेल्या आहेत त्या दुस-यांना करायला सांगा. ते काय वाचतात ते त्यांना समजत नाही. आम्ही काय समजायचे.

**मा. महापौर :-**

त्यांचे बोलणे पूर्ण होऊ द्या.

**शरद पाटील :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील काय बोलतात ते कळत नाही.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील यांनी दुरुस्ती सुचवायची आहे का? आमच्याकडून दुरुस्ती घ्या. त्यांना खाली बसवा.

**गजानन भोईर :-**

दुसऱ्या कोणातरी वाचायला द्या. सन्मा. सदस्य मिलन पाटील यांना व्यवस्थित वाचता येत नाही.

**मा. महापौर :-**

सर्वांनी शांतता पाळा.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मा. महापौर मॅडम, स्थायी समितीचा ठराव आहे. दुरुस्तीसहित पाठवा.

**रतन पाटील :-**

सुचक हेच आहेत. परत त्याच्यावर रिपेरिंग करुन हेच सेवाशर्ती देत आहेत आणि स्वतःच दुरुस्त्या देत आहेत का?

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर, सन्मा. सदस्य मिलन पाटील भगवद्गीता पढ रहे हे क्या?

**मा. महापौर:-**

तुम्ही तुमच्या दुरुस्त्या नंतर बघा. त्यांना त्याच्यावर बोलू द्या.

**कैलासबेन जानी :-**

मॅडम, ते काय वाचतात ते समजायला पाहिजे. ते काय वाचतात ते समजत नाही. सचिवांना वाचायला सांगा.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, स्थायी समितीचे सन्मा सदस्य मिलन पाटील यांचा ठराव आहे आणि दुरुस्तीसुध्दा तेच वाचत आहेत.

**गजानन भोईर :-**

स्थायी समितीने मांडलेल्या ठरावाशी ते सहमत आहेत की नाही. ती सुचनासह आम्हाला द्या.

**रतन पाटील :-**

स्थायी समितीमध्ये ठराव झालेला आहे. त्याचे सुचक सन्मा. सदस्य मिलन पाटील आहेत आणि अनुमोदन सन्मा सदस्य गजानन भोईर यांचे आहे.

**रोहित सुवर्णा :-**

आम्हाला २४ नंबरचे काय समजत नाही.

**कैलासबेन जानी :-**

काय बोलतात काय समजत नाही. सर्वांना ठरावाची कॉपी पाठवा.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की ज्यांनी सेवाशर्ती तयार करायची, सुचक, अनुमोदन द्यायचे त्यांना सभागृहात परत दुरुस्ती करायच्या का? त्यांनी हे दुरुस्ती करुन पाठवायला पाहिजे होते तसे पाठविले नाही आणि सभागृहाच्या दुरुस्त्या सूचवून सभागृहाचा, मा. महापौर, मा. आयुक्तांचा वेळ खर्च करतात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण आम्हाला सुधारीत प्रस्तावली पुन्हा द्या. आम्ही सविस्तर बघू नंतर चर्चा करा. एवढी सुधारणा दिलेली आहे. आम्ही काय चर्चा करणार?

**रतन पाटील :-**

ह्या सेवाशर्ती दिल्याबद्दल ह्याला सभागृहातील कोणाचा विरोध नाही. ज्या सुचना असतील त्या सुचना द्या.

**गजानन भोईर :-**

ठरावामध्ये आणि ह्याच्यामध्ये बरेच गांभीर्य आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील यांनी सेवाशर्ती बाबत ज्या दुरुस्त्या सुचविलेल्या आहे. सर्व सन्मा सदस्यांच्या दुरुस्त्याचा आपण विचार करुन सेवा नियम मंजूर करा. त्यांच्या दुरुस्त्या विचारात घ्या.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ह्यांच्या दुरुस्त्या समजल्या नाही. त्या काय दुरुस्त्या आहेत त्या द्या.

**रतन पाटील :-**

स्थायी समितीला करायला पाहिजे होत्या. महासभेचा वेळ का घालवता? सन्मा. सदस्य दुरुस्त्या सुचवतील त्याच्याबरोबर मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासकिय ठराव क्र. ७१ दि. २९/४/२००२ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर पदनिर्मिती करणेबाबतचा ठराव शासनाला गेला होता. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व पदांसाठी महापालिकेने सेवा प्रवेश नियम तात्काल करुन शासन मान्यतेसाठी सादर करावेत. महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार या नांवाने महाराष्ट्र शासनाचे उपसचिव श्री. प्र. बा. माळवदकर यांच्याकडे हा ठराव गेला होता ह्या तीन वर्षाच्या कालावधीत सेवाशर्ती तयार करण्यासाठी का घेतला गेला याचे मला उत्तर पाहिजे आहे. हे सेवाशर्ती नियम एवढ्या उशीरा झाले आणि कर्मचाऱ्यांच्या नुकसानाला जबाबदार कोण? हेसुध्दा सुचित करायचे आहे. मा. महापौरांनी उत्तर द्यावे.

**मा. उपमहापौर :-**

या सभागृहात खुप वर्षांनी सेवाशर्ती ह्या स्थायी कर्मचाऱ्यांसाठी त्यांच्या आयुष्यभराच्या नोकरीत त्यांना पदोन्नतीने सन्मान देण्यांत यावा. ही मागणी सन्मा. सदस्यांकडून वारंवार होत होती, अधिकारीदेखील मागणी करीत होते. पूर्वी ग्रामपंचायती होत्या, नंतर नगरपालिका, नंतर महानगरपालिका झालेली आहे. सन्मा. सदस्य तुळशीदास म्हात्रे, सन्मा. सदस्य शशिकांत शाह, सन्मा, सदस्य अनंत पाटील हे माजी सरपंच आहेत. या सभागृहाचे गटनेते श्री. रविंद्र माळी यांचे वडील सरपंच होते. प्रथम महापौर आणि माजी नगराध्यक्ष श्री. गिल्बर्ट मेन्डोसा हेदेखील सरपंच होते. सन्मा. सदस्य मिलन पाटील हे ग्रामपंचायत सदस्य होते. सन्मा. सदस्य परशुराम पाटील हे ही सरपंच होते काही लोकांची नांवे राहीली असतील परंतु ह्या सगळ्यांच्या कारकिर्दीपासून या शहरात ग्रामपंचायतचे कर्मचारी ग्रामसेवक म्हणून काम करणारे, तात्कालीन जो हुद्दा होता त्या हुद्यावर काम करणारी लोक नगरपालिकेमध्ये समाविष्ट झाली त्यांना नगरपालिकेतुन पदोन्नती मिळाली पाहिजे असा सगळ्यांचा प्रयास होता. आता हा ठराव वाचताना सगळीकडून ज्या पध्दतीने ओरड होत होती मला काहीतरी सांगायचे आहे, सुचना द्यायच्या आहेत हे स्पष्ट होत होते. सेवाशर्तीला विरोध करण्याचे कारण नाही. आपण सेवाशर्ती बनवतो, श्री. रतन पाटील पोटतिडकीने बोलत होते. याच्यापूर्वी सेवाशर्ती केलेल्या आहेत अशी यांना सुचना करायची होती. तो प्रशासकीय ठराव होता. तो प्रशासकीय ठराव तात्कालीन आयुक्त श्री. शिवमुर्ती नाईक साहेबांनी पाठविलेला होता. त्याच्याबरोबर आकृतीबंध मंजूरीसाठी पाठविलेला होता. आपल्याकडे सेवाशर्ती देणार म्हणजे काय? त्याची सर्वांना जाणीव आहे. आपले काही कर्मचारी ग्रामपंचायत काळापासून कार्यरत होते आणि अजून काही लोक दोन-तीन-पाच वर्षात निवृत्त होणार आहे. त्याच्यापूर्वी त्यांना कुठे तरी सन्मानाची जागा मिळावी, सन्मानाची वेतन श्रेणी मिळावी म्हणून आपण प्रयत्न करीत आहोत. आपण बनविलेल्या सेवाशर्ती शासनाच्या मान्यतेला पाठविण्याचे सुरुवातीलाच स्पष्ट लिहलेले आहे. आपण महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठवत असली तरी तात्काल हे सेवानियम आपल्या कर्मचाऱ्यांना लागू व्हावेत. आपण बऱ्याच वेळेला बघतो जूना अधिकारी जाऊन नविन अधिकारी येतो आणि तो अधिकारी आपला अधिकार

गाजवत असतो, किंबहूना त्याला तो अधिकार असतो. आपल्या अधिकाऱ्यांना सन्माननीय स्थान मिळू नये असे कुणाला वाटत नाही. स्थायी समितीमध्ये श्री. राजपाठक यांच्या सुचनांवर विचार केला गेला स्थायी समितीमध्ये उपलब्ध असलेल्या सदस्यांनी आपल्या परिपूर्ण माहितीनुसार हा ठराव पारित केला. परंतु नंतर सेवाशर्तीमध्ये सदस्यांना ज्या सुचना कराव्याशा वाटल्या त्या त्यांनी ठेवल्या. आपला जो पदोन्नती क्रम सुरु होईल तर त्या कर्मचाऱ्यांना पुढे येण्याची संधी आपण उपलब्ध करुन दिली तर त्याचा उत्साह वाढेल त्यामुळे सदस्यांना ह्याबाबत सुचना करायच्या असतील किंवा उपसुचना असतील तर त्या सांगाव्या. त्याचा आपण स्विकार करु. सन्मा सदस्य गजानन भोईर बोलले की, श्री. मिलन पाटील यांनी उपसुचना केल्या त्याच्यासहित आमच्याकडे ठराव द्या. श्री. गजानन भोईर साहेब आपण या सदनाचे आभ्यासू सदस्य आहात. सदनामध्ये दिलेल्या कागदपत्रावर आपण आपल्या सुचना करावयाच्या असतात हे आपल्याला माहित आहे. त्या सुचना परत पाठवून विषय घ्यायचा असे करु नका ह्या सुचना सभागृहात होत असतात. तुम्ही तुमची सुचना नंतर मांडा.

**गजानन भोईर :-**

सुचना दिल्या तर काय फरक पडतो. एवढी मोठी अमाउन्ट ठरवायची मग या चार शब्दांनी काय फरक पडतो.

**मा. उपमहापौर :-**

बाकी ठिकाणी फरक पडत नसेल इकडे फरक पडेल. दोन तीन वेळा हा विषय आला आणि मागे गेला. ह्या विषयाला अंतिम स्वरुप मिळाले पाहिजे म्हणून आपण सुचना द्याव्यात.

**सुरेखा गायकवाड :-**

मागसवर्गीय समाजाचे लिपिक आहेत, श्री. नरेंद्र चव्हाण, श्री. चंद्रकांत बोरसे, श्री. अविनाश जाधव यांनासुध्दा पदोन्नती द्यावी. अशी मी विनंती करीत आहे.

**रतन पाटील :-**

मा. उपमहापौरांनी एक चांगली बाजू मांडली. त्यांच्या चातुर्याबद्दल मी आदर करतो. परंतु त्या तीन वर्षाच्या कालावधीमध्ये कर्मचाऱ्यांचे जे नुकसान झालेले आहे त्यांना तीन वर्षापूर्वीची सेवाजेष्ठता मिळायला पाहिजे होती. ती अजूनपर्यंत मिळालेली नाही. त्यांचे झालेले नुकसान आपण कसे भरुन देणार? किंवा आपण ज्या दिवसापासून ठराव पाठविला होता, आपण आजही सेवाजेष्ठता आधी मंजूर करीत आहोत. आपण त्यांची सेवाजेष्ठता तीन वर्षाची लावणार आहात. किती आणि कोणाचे नुकसान करता, आपल्याच कर्मचाऱ्यांचे नुकसान करतो. आपण तीन वर्षापासून काय करीत होतात. सन्मा. सदस्य मिलन पाटील बोलतात की तत्काळ पदोन्नती द्या. त्यांनी तसे लिहलेले आहे. आपण तीन वर्ष झोपा काढत होतात का? आपण पदोन्नती का दिली नाही? हा विषय तीन वर्षापूर्वी घ्यायला पाहिजे होता. तुम्ही आमच्या कर्मचाऱ्यांचे फार मोठे नुकसान केलेले आहे. ह्याला सत्ताधारी पक्ष जबाबदार आहे असे म्हणावे लागेल. आपल्या कर्मचाऱ्यांना कुठली सेवाजेष्ठता लावणार आहात याचा ठोस निर्णय द्या. किती नुकसान करणार, आपल्या कर्मचाऱ्यांकडून किती काम करुन घेणार आम्हीच त्यांच्या भावनांची कदर करायची का? आपणसुध्दा त्यांच्या भावनांची कदर करा.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील यांनी जो ठराव वाचून दाखविलेला आहे त्याच्यामध्ये त्यांनी वगळले आहे की ग्रामपंचायत, नगरपालिका कालावधीपासून कार्यक्षमरित्या, सचोटीने व प्रामाणिकपणे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीपासून वंचित रहावे लागत आहे. त्याच्यामध्ये मी अशी दुरुस्ती सुचविलेली होती की, त्यांना प्रथम पदोन्नती देण्यांत यावी. त्यांनी हा शब्द ठरावातुन वगळलेला आहे.

**गजानन भोईर :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील २६ तारखेला असे बोललेले नव्हते. त्यांनी आता ह्या ठरावात कबुल केले. ग्रामपंचायत वगैरे बोलले नव्हते.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, एका वेळेला स्थायी समितीमध्ये ठराव मंजूर करुन ठराव लेखी मागे घेतलेला आहे. मी असे बोललोच नाही असे ते म्हणाले.

**नयना म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील तुमच्याकडे लेखी ठराव आहे का?

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील यांनी सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा यांचे ज्ञान घेतले तर बिघडले कुठे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, ह्या विषयावर आमच्या पक्षाचे गटनेते मत मांडणार आहे. या सभागृहात या सभागृहाचे विरोधी पक्ष नेते, काँग्रेसचे जेष्ठ नेते, सभागृह नेते, शिवसेनेचे नेते श्री. रतन पाटील या सर्वांनी वेळोवेळी स्थानिक लोकांना प्राधान्य देऊन त्यांना नोकरी द्या असा विषय अनेक वेळेला सभागृहात चर्चेला आणलेला आहे व ठरावही आलेला आहे. आज जेव्हा सेवाशर्तीचे नियम आपल्या सभागृहापुढे येत आहेत. श्री.

रोहीदास पाटील ठराव मांडणार आहेत. परंतु आमची एकच सुचना आहे की कुठल्याही ग्रामपंचायत काळापासून असलेली माणसे त्यांचे शिक्षण किती आहे. अशी त्याची योग्यता बघून त्याला न्याय दिला पाहिजे. आपण जो ठराव केलेला आहे तो आपल्या तोंडावर आपणच काळे पुसणार आहे असा लोकांसमोर आदेश जाणार आहे. याच्यावर आपण गांभीर्याने विचार करा. आता मा. उपमहापौर साहेब बोलले की त्यांची सुचना द्यायची तुम्हाला काय गरज आहे? खरे म्हणजे गरज नाही परंतु, त्यांनी सभागृहाचा आभ्यास केला पाहिजे जेव्हा ते त्या ठरावाचे सुचक आहेत आणि सुचक जेव्हा एवढी दुरुस्ती सुचवतो तेव्हा ती अनुमोदकाला माहित पडली पाहिजे. म्हणून त्यांनी मागणी केलेली आहे. समजा आमच्या लोकांनी मागणी केलेली असती आणि तुमचे लोक बोलले असते तर वेगळी गोष्ट होती. परंतु सुचक आणि अनुमोदक आपसात मागतात. त्याच्यामध्ये सभागृहाने दुमत न बघता दिले पाहिजे. श्री. रोहीदास पाटील तो विषय मांडणार आहेत. परंतु, या शहरातील कुठलाही ग्रामपंचायत काळातील अधिकरी किंवा कर्मचारी वर्ग या ठरावामुळे वंचित राहणार नाही. आपण याची नोंद घ्यावी. ही सुचना मांडतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर मॅडम, दिर्घ कालावधीनंतर राष्ट्रवादीला आपल्या कर्मचा-यांबद्दल आपुलकी वाटली याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजे. तीन वर्षाची कुंभकर्णाची झोप पूर्ण केल्यानंतर आपला कर्मचारी पदोन्नतीसाठी कुठेतरी वणवण फिरतो याची त्यांना थोडीशी भनक लागली असेल म्हणून त्यांनी हा विषय घाईघाईने आणलेला आहे. पुरग्रस्तांना घाई करण्यासाठी किंवा अतिवृष्टीमुळे गांजलेल्या लोकांसाठी घाई केली असती तर एवढा वेळ चर्चा करण्यासाठी गेला नसत. टीका करण्यापेक्षा यांच्या काम करण्याच्या पध्दतीबाबत बोललेले मला जास्त आवडेल. जर त्यांनी ठराव मांडला असेल तर त्या ठरावाची प्रत त्यांनी ती कायम केली असे समजून पहिल्यांदा सचिवांच्या ताब्यात द्यावी. मग आम्ही असे समजू की ते तो ठराव कायम करु इच्छीतात. मग त्याच्यापुढे मला या सभागृहाला निवेदन करावेसे वाटते. मा. महापौर मॅडम, हा विषय कर्मचाऱ्यांच्या भवितव्याचा आहे. हा प्रश्न सत्ताधारी किंवा विरोधी पक्षाचा नाही. त्याच्यामुळे कुठलाही निर्णय घेताना कुठल्या कर्मचा-यावर कुठल्या प्रकारचा अन्याय होऊ शकतो याचा सुक्ष्मपणे अभ्यास केल्याशिवाय या ठरावाला किंवा धोरणाला आपण अंतिम स्वरुप देता कामा नये. अशा प्रकारची कार्यवाही जी स्थायी समितीने प्रस्तृत केलेली आहे. मी ह्याच्यावर कलमानुसार बोलणार आहे की कुठल्या पध्दतीने स्थायी समितीने हे निर्णय घेतलेले आहेत. मॅडम, त्याच्यासाठी तो ठराव त्यांनी कायम केला असेल तर तो ठराव मागवून घ्यावा. त्यांना पुन्हा एकदा सांगतो, ह्याच्यावर दुरुस्ती करायची आहे असे त्यांनी नंतर सांगायचे नाही. मॅडम, कृपया तो ठराव मागवून घ्या आणि सचिवांनी त्याचे वाचन करावे लागेल. श्री. मिलन पाटील यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांमध्ये वेळ वाया जायला नको. आम्हाला ठराव ऐकायला आला नाही तरी त्यांनी तो ठराव मांडला असे मी गृहीत धरतो. परंतु, त्यांनी तो सुरुवातीलाच ठराव मांडलेला आहे. कृपया सचिवांनी त्याचे वाचन करावे आणि त्याच्यानंतर निवेदन करायला तुम्ही मला परवानगी द्या.

**प्र. सचिव :-**

सुचक सन्मा. सदस्य मिलन पाटील आणि अनुमोदन सन्मा. सदस्या सुरेखा गायकवाड यांच्या ठरावाचे मी वाचन करतो. (ठरावाचे वाचन केले.)

**रोहीदास पाटील :-**

संख्या वाचण्यापूर्वी स्थायी समितीने केलेल्या शिफारशीनुसार असे लिहलेले आहे. स्थायी समितीने ज्या शिफारशी केल्या म्हणजे ज्यांनी सही केल्या त्या दोघांना माहित नाही. त्यामुळे सभागृहाला माहिती असण्याचे कारण नाही. हे तीनवेळा स्थायी समितीमध्ये आणून दुरुस्त्या करत करत इथपर्यंत पोहचलात. ज्या दुरुस्त्या केलेल्या आहेत तेवढ्याच आम्हाला सांगितल्या. तर त्यात राष्ट्रवादी पक्षाचा काय दृष्टीकोन आहे. कोणाला पुढे न्यायचे कोणाला मागे न्यायचे ते कळेल.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. सदस्य रोहीदास पाटील हे राष्ट्रवादीचा काय उद्देश आहे वगैरे बोलले आहे. तसे नाही. राष्ट्रवादीचा उद्देश स्पष्ट आणि स्वच्छ आहे. जो पात्र आहेत त्यांच्यावर अन्याय होणार नाही. अशा लोकांना या प्रस्तावात समाविष्ट करुन प्रमोशन द्यायचे आहे. अपग्रेडेशन करायचे आहे. एवढाच सत्ताधारी पक्षाचा दृष्टीकोन आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

या विषयाला स्थायी समितीने जो गोषवारा जोडलेला आहे. आपण तो गोषवारा स्पष्टपणे पहा. मा. आयुक्त साहेब, आपल्या माहितीसाठी बोलतो. कारण ह्यांच्या ठरावामध्ये नेमणुकीसाठी अर्हता सेवाभरती नियम आणि विनियम असे म्हटलेले आहे. म्हणजे त्यांनी केलेली कार्यवाही किती स्पष्टपणे ते म्हटले ना, आम्ही काय घेतले नाही ते बरोबर आहे आणि तसा आरोपही नाही. त्यांचे किती प्रांजलपणे त्यांना काम करायचे होते म्हणून त्यांनी हा विषय तीन वेळा आणला. हा विषय आणल्यानंतर जो गोषवारा दिलेला आहे. त्या गोषवाऱ्यावर आपण विषय पहा. मा. आयुक्त साहेबांची गोषवाऱ्यावर सही आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका

नेमणुकीसाठी अर्हता आणि सेवा भरती नियम सन २००५ मिरा भाईंदर महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी अर्हताकारी विभागीय परिक्षा विनियम सन २००५, या गोषवाऱ्याच्या अनुषंगाने स्थायी समितीच्या सन्मा. सदस्यांनी हा ठराव केला. मी त्या ठरावाचा थोडक्यात समाचार घेतो. सन २००२ मध्ये प्रशासनाने प्रस्ताव पाठविलेला होता. त्याच्यानंतर शासनाने पदे मंजुर करुन पाठविली. त्यानुसार प्रथम पदे उर्वरित पदे भरण्यासाठी सेवा शर्ती नियम तयार केले पाहिजेत असे स्वप्न अचानक स्थायी समितीला पडले. त्याला सन २००२ मध्ये शासनाचा जो आदेश आलेला होता. त्याचा विसर पडला. दोन-तीन मिटींगपूर्वी मी बोललो होतो की तुमचे सेवा प्रवेश नियम नाहीत. ते तात्काळ करा. नाही केले तर मी तयार करुन आणतो. माझ्याकडे तयार आहेत. या भीतीने त्यांनी पटापट कपडे घालताना नेमके उलटे कपडे घातले. शर्ट खाली आणि पॅन्ट वर अशी परिस्थिती झाली. तुम्ही जेव्हा या ठरावात स्वतः म्हणता की, ग्रामपंचायत, नगरपालिका कालावधीपासून सक्षमरित्या, सचोटीने आणि प्रामाणिकरित्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीपासून वंचित रहावे लागत आहे. तीन वर्षे गेली. आमचे कर्मचारी गेली पंधरा वर्षे वंचित आहेत. महानगरपालिकेने आस्थापनेची अमुक-अमुक पदे कर्मचाऱ्यांमधूनच भरण्याचे धोरण निश्चित कलेले आहे. सोबत जोडलेल्या यादीनुसार सेवा शर्ती नियम तयार करुन प्रत्येक पदास संवर्ग निहाय शैक्षणिक पात्रता, अनुभव, सेवा ज्येष्ठता निश्चित कलेली आहे. हे तयार करतांना स्थायी समितीने ४५, ४५(३), ४५७ चा (३), ५१(१) चा सखोल अभ्यास केला. एवढा सखोल अभ्यास केल्यानंतर त्यांनी ठराव किती सुंदर केला असेल मग त्यांनी हा खालचा ठराव केला की, आस्थापनेवरील कर्मचारी आणि अधिकारी ह्यांच्याकडे असलेले अनुभव, क्षेत्रीय कामकाज वगैरे हे सगळे विचारात घेउन त्यांना या सर्व बाबींचा विचार करुन सोबत परिशिष्टामधील सेवाशर्ती, नियम, विनियम यांस मंजुरी देण्यात येत आहे असा ठराव त्यांनी केला. सखोल अभ्यास केला आणि सखोल अभ्यास केल्यानंतर सखोल दुरुस्त्या आजच्या सभेत लावल्या. हया दुरुस्त्या सांगताना मला असे वाटते की मागच्या तीन सभांमध्ये जेवढा वेळ चर्चेला गेला नसेल तेवढा वेळ गेला. कशी दुरुस्ती केली ही त्यांनाच माहिती नाही. सेवा शर्ती नियमांमध्ये सुचविलेल्या कुठल्याही दुरुस्त्या जर तुम्ही स्थायी समितीमध्ये कॅरिआउट केल्या असत्या तर स्थायी समितीच्या सगळया सन्मा. सदस्यांना त्या कळल्या असत्या. तुम्ही दुरुस्त्या करित असाल. आमचा काही वैयक्तिक कुठल्याही फायदयासाठी आमचे काहीही म्हणणे नाही. तुम्ही चांगली गोष्ट करतात. सन्मा. सदस्य मिलन पाटील हे नियम चांगल्यासाठी करतात. परंतु, काय झाले की हे घाईघाईने जातात आणि मारुतीच्याऐवजी माकडाला शेंदुर लावून येतात. तो प्रॉब्लेम होतो. मागच्या वेळेलासुध्दा असेच झाले. मी कायदेशीर त्रुटी सांगतो. तुम्हाला त्याच्यातून हा ठराव पुढे न्यायचा झाले तर न्या. प्रश्न असा आहे की जेवढा विनियमाचा गोषवारा आहे. तेव्हा स्थायी समितीचा काय ठराव आहे की, अर्हताकारी सेवा भरती नियम आणि तुम्ही जेवढे ठराव करता तेवढे तुम्ही स्वतःच म्हणता की ४५४ खाली गव्हर्नमेन्टची मंजुरी घेण्याची गरज नाही. अधिसुचना काढायची गरज नाही. मा. आयुक्त साहेब, तुम्ही या ठिकाणी स्पष्ट करा की विनियम म्हणजे काय? विनियम करण्याचे अधिकार कोणाला आहेत? सेवाशर्ती नियम करण्याचे अधिकार कोणाला आहेत? स्थायी समितीला रु. ५० लाखाच्या पॉवर्स मिळाल्यानंतर त्यांना आकाशसुध्दा ठेंगणे वाटायला लागलेले आहे. उदया सांगतील की तुम्ही घरच्या गोष्टी करतानासुध्दा आमच्या स्थायी समितीची मंजुरी घ्या. मुळात स्थायी समितीला सेवा शर्ती नियम तयार करण्याचा कुठलाही अधिकार नाही. ही पहिली बाब आहे. दुसरी बाब म्हणजे त्यांनी जे विनियम तयार केलेले आहेत. ते मा. आयुक्त साहेबांनी गोषवारा दिलेला आहे, त्यानुसार आहेत. त्या गोषवाऱ्यामध्ये त्यांनी स्पष्टपणे म्हटलेले आहे की, श्री. राजपाठक यांना हे काम देण्यात आलेले होते. श्री. राजपाठक हे काय दानशुर आहेत का? त्यांनी फुकट काम केले का? मी श्री. राजपाठक यांनी दिलेल्या नियमामध्ये जर तुम्ही दुरुस्ती सुचवित असाल तर मग तुम्ही श्री. राजपाठकपेक्षा तुम्ही वेधपाठक आहात. तुम्ही हुशार आहात. तुम्ही श्री. राजपाठक यांना कशाला काम दयायचे? मग त्यांना पैसे देउन एवढया तिजोरीला खर्च कशाला दयायचा. श्री. राजपाठक यांनी तयार केलेली कुठलीही कॉपी या सभागृहामध्ये कुठल्याही सन्मा. सदस्याला देण्यात आलेली नाही. त्याच्यापुढे यांनी केलेले नियम हया श्री. राजपाठक यांच्या नियमांवर सुधारित नियम असेदेखील आम्ही त्याला म्हणून मंजुरी देऊ. परंतु, हा एकूण सगळा प्रकार विनियमांचा आहे. स्थायी समितीला असे कुठलेही सेवा प्रवेश नियम तयार करण्याचे अधिकार नाहीत हे मी दुसऱ्यांदा सांगतोय. तिसरी बाब अशी आहे की, जे अधिकार आहेत ते कलम ४५६ आपण वाचा. आपण स्पष्टपणे हे विनियम तयार करण्याचे अधिकार आहेत आणि विनियम आणि सेवाशर्ती नियम हयाच्यामध्ये जमीन आसमानाचा फरक आहे. तुम्ही विनियम केले. म्हणून तुम्ही कलम ४५४ लिहिलेले आहे. मा. उपमहापौर साहेब, आपण स्पष्टपणे तरतुदी बघा. कलम ४६५ खाली विनियम तयार केले. ते तयार करित असताना त्यांनी तो विषय तीन वेळा आणला. त्या विषयावर मा. आयुक्त साहेबांनी योग्य गोषवारा दिलेला आहे की, विनियम आहे आणि प्रारुप विनियम त्यांनी त्याच्या सोबत जोडलेली आहे. विनियम मंजुर केले आणि ठरावाला नांव काय देतात. गाढवाला बाशिंग बांधून घोडा होत नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील, तुमच्या ज्या काही सुचना आहेत. त्या विषयाला धरुन आहेत. तुम्ही त्या सुचना मांडा. तुम्हाला ज्या दुरुस्त्या सुचवायच्या आहेत. त्या तुम्ही सांगा.

**प्रफुल्ल पाटील :-**

माझी सुचना हीच आहे की कायदेशीर बाबी बघा. सुचना एवढीच आहे की, त्यांनी मांडलेला ठराव हा बेकायदेशीर आहे. मी प्रथम माझी सुचना मांडतो की, ४५४ खाली अशा प्रकारचे कुठलेही सेवा शर्तीचे नियम शासनाकडे पाठवायचे नसतात. ते विनियम पाठवायचे असतात. म्हणून हे विनियम केले असतील. आम्ही त्याला मंजुरी देत आहोत. आता तुम्ही मला सांगता की सुचना मांडतो. मी सुचना न मांडता ठराव मांडतो. थोडेसे विचारले असते तर बरे झाले असते. आम्ही तुमच्या मनाने ठराव केला असता. मागच्या सभेत बोलले होते की आपण मिळून ठराव मांडुया. मी त्यांना बोललो होतो की तुम्हीच ठराव मांडा. सुचक तुम्ही आणि अनुमोदकसुध्दा तुम्हीच रहा. तुम्ही सत्ताधारी आहात. तुम्ही त्याचे क्रेडिट घ्या. मी या ठिकाणी ठराव मांडत आहे.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब, आपण ठराव मांडत आहात. परंतु, कर्मचाऱ्यांच्या हिताचा विषय घेतो. आपणही त्या बाजूने आहात. कोणी विरोधात नाही. परंतु, आपण त्याच्यामध्ये पुन्हा २/३ चा निकष धरुया. तेव्हा त्या कर्मचाऱ्यांच्या सेवा शर्तीला पुन्हा सुरुंग आपल्यामुळे लागेल. म्हणून कृपया आपण सुचना करावी. काही फेरबदल असेल ते करु. परंतु, तुम्ही विषय मतदानाला घेउन संख्याबळाचा जेवढा प्रश्न येईल. आमच्याकडे मतदानाला सदस्य संख्या आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

आम्ही ठराव जिंकण्यासाठी मांडत नाही. आम्ही ठराव कर्मचाऱ्यांच्या हितासाठी मांडतो.

**मा. उपमहापौर :-**

कृपा करुन आपण कर्मचाऱ्यांच्या स्वप्नांना सुरुंग लावू नका.

**प्रफुल्ल पाटील :-**

आम्ही कर्मचाऱ्यांच्या स्वप्नांना सुरुंग लावलेला नाही. तुम्ही अगोदरच त्या ठिकाणी दरी करुन टाकलेली आहे. मागच्या सभेलासुध्दा आम्ही हयाच्यावर बोललेलो आहोत.

**मा. उपमहापौर :-**

मी सन्मा. सदस्यांना आव्हान करतो की, आपण असे केल्यानंतर मतदानाला येईल.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुमच्या बाजूने मतदान होईल. आमच्या बाजूने तुम्ही घेउ नका.

**मा. उपमहापौर :-**

आमच्या बाजूने मतदान होईल.

**प्रफुल्ल पाटील :-**

आम्हाला कायदेशीर बाब मांडू दया.

**मा. उपमहापौर :-**

जे बहुमत त्यांना लागते ते मिळणार नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

मी जो ठराव मांडतो. त्याच्यामध्ये त्यांना कुठलेही लाभ मिळणार नाहीत असे नाही. उलट तुम्ही जे काही ठराविक लोकांना जो काही जास्त लाभ दयायला बघता. तो आम्हाला द्यायचे नाही. आम्हाला ओरिजनल आमचे कर्मचारी आहेत. जे अनेक वर्षापासून पदोन्नतीपासून वंचित आहेत. आता ही अनुभवाची अट का शिथिल केली. ही अट शिथिल केल्यामुळे आमचे जे जुने कर्मचारी आहेत. मा. उपमहापौरसाहेब, तुम्हाला काहीही माहिती नाही. हे लोक तुमची कुठेतरी दिशाभुल करतात. हा माझा आरोप नाही. मी तुम्हाला वस्तुस्थिती सांगतो. जेव्हा त्यांना सेवा प्रवेश नियमांमध्ये अशा प्रकारचा बदल करायचा सुचवितो तेव्हा एखादयाला तीन वर्षाचा अनुभव लावायचा आणि एखादयाला दहा वर्षाचा अनुभव लावायचा. जर तुम्ही तीन वर्षाचा अनुभव लावला तर काल आलेले लोक एका विशिष्ट जातीच्या सवलतीवर असलेल्या कर्मचाऱ्यांच्यापुढे निघून जातील. तुम्ही कर्मचाऱ्यांना न्याय कसला दयायला निघाले. उलट हे जे नियमात बदल केलेले आहेत. हे संपूर्णपणे आमच्या जुन्या कर्मचाऱ्यांवर, जुन्या अधिकाऱ्यांवर गदा आणण्यासाठी आणलेले आहेत. म्हणून ते हेतूपुरस्पर इतक्या उशीरा श्री. राजपाठकांनी तयार केले. तेव्हा त्यांना बदल करावेसे वाटले नाही. तीन वेळा स्थायी समितीची सभा झाली. तेव्हा कधी बदल केलेले नाहीत आणि आता बदल करा. बदल करायचे तर करा. परंतु, ते बदल विनियमामध्ये करा. तुम्ही सेवाप्रवेश नियम तुम्ही तयार केलेले नाहीत. तुम्ही या ठिकाणी सेवा प्रवेश नियमांवर ठराव मांडलेला नाही. माझे कन्टेन्शन असे आहे की यु गो थ्रु दॅट रिझोल्युशन प्लीज ऑब्झर्व्ह दॅट हया ठरावामध्ये सेवा शर्तीच्या नियमांचा कुठेही उल्लेख केलेला नाही. म्हणून या ठिकाणी सेवा प्रवेश नियमांचा

जो ठराव आहे. ते तुमचा विनियमाचा ठराव आहे आणि मी जो ठराव मांडत आहे तो सेवाप्रवेश नियमांचा ठराव आहे आणि हया नियमाद्वारे त्या कर्मचाऱ्यांना सर्व सुविधा प्राप्त होणार आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका दि. २८.०२.२००२ रोजी अस्तित्वात आली. तत्कालीन आस्थापना सचिव यापूर्वी वर्ग - १ चे पद, वर्ग-२ ची ९ पदे, वर्ग-३ ची २८६ पदे व वर्ग - ४ ची, १५१३ पदे अशा एकुण १८०९ पदोना महानगरपालिका आस्थापना सुचीवर वर्ग करण्यास व महानगरपालिकेकरीता नव्याने वर्ग-१ ची १८ पदे, वर्ग-२ ची ४५ पदे, वर्ग-३ ची ३२५ पदे, वर्ग-४ ची ४३२ पदे अशी एकुण ८२० अतिरीक्त पदे तातडीने मंजूर करण्यासाठी नविन कर्मचारी आकृतीबंध मंजूरी प्रस्ताव दिनांक २९.४.२००२ रोजी प्रशासकीय ठराव क्र. ७१ अन्वये मंजूर करुन शासनाच्या मान्यतेस पाठविला होता. सदर प्रस्तावात वर्ग-१ ची सर्व पदे प्रतिनियुक्तीवर भरण्यास शिफारस केली होती. महाराष्ट्र शासनाने नगरविकास विभाग मंत्रालय शासन निर्णय क्र. एमबीएमसी-२००२/१७७३/प्र क्र १६३ /न.वि. - २५, दि. ३१.१०.२००२ अन्वये वर्ग-१ ची ११ पदे, वर्ग-२ ची २९ पदे, वर्ग-३ ची २५ पदे, व वर्ग-४ ची ५ पदे या सर्व पदांना मान्यता दिली. परंतु शासनाने आयुक्त, शहर अभियंता, नगर सचिव, व मुख्य लेखा परीक्षक ही पदे संविधानिक असल्याने शासनाच्या मान्यतेच्या अधीन राहून योग्य उमेंदवारांची नियुक्ती करण्यास मंजुरी दिली. व वर्ग-१ मधील इतर पदे प्रतिनियुक्तीवर घेण्याचे कोणतेही आदेश पारीत केले नाहीत. तसेच सदर शासन निर्णयाद्वारे महानगरपालिकेने आस्थापनेवरील सर्व पदांसाठी सेवा प्रवेश नियम तात्काळ तयार करुन शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणे बाबत आदेश दिले होते.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने दिनांक ३१.१०.२००२ ते आजतागायत मंजुर पदांवर व आकृतीबंधातील उर्वरीत तसेच महानगरपालिकेने सुरु केलेल्या परिवहन सेवेत व शिक्षण विभागात भरावयाच्या पदांसाठी सेवा प्रवेश नियम तयार केले नव्हते.

मंजुर पदांवर तसेच मंजुरी व मान्यवेच्या अधीन असलेल्या नवीन अतिरीक्त पदांवर सरळसेवा व पदोन्नतीद्वारे नेमणुका आहेत. विविध संवर्गातील वर्ग-१, वर्ग-२ ची पदे न भरल्याने ग्रामपंचायत व नगरपालिका कालावधीपासून आस्थापनेमध्ये शैक्षणिक पात्रता व अर्हता तसेच अनुभव धारण करणा-या तसेच सचोटीने व प्रामाणिकपणे कार्यरत असलेल्या कार्यक्षम कर्मचा-यांना पदोन्नतीपासून वंचित रहावे लागत आहे.

शासनाच्या आदेशानुसार मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम, १९४९ चे कलम (१), (२), (३), व ५४(५) व ४५७ (३)(अ) व (ब) मध्ये विहीत केलेल्या सर्व अधिकारांचा वापर करून मिरा भाईंदर महानगरपालिकेने 'मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम - २००५' तयार केलेले आहेत. सदर नियमांद्वारे नेमणुकीच्या पध्दती निश्चित करुन प्रत्येक पदास संवर्गनिहाय शैक्षणिक पात्रता व अर्हता, अनुभव व सेवा जेष्ठता निश्चित केली आहे. सदर मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम २००५ या नियमांना ही सभा मंजुरी देत असून सदर नियम दिनांक १२.०८.२००५ पासून अंमलात आणण्यास व सदर नियमाद्वारे २ उपायुक्त, १ मुख्य लेखा परिक्षक, १ वैद्यकीय अधिकारी, १ सहाय्यक संचालक (नगररचना) ही पदे प्रतिनियुक्तीवर भरण्यात यावी व उर्वरीत पदांवर मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत असलेल्या, शैक्षणिक पात्रता, अर्हता, अनुभव व सेवा जेष्ठता नुसार पात्र ठरणा-या अधिकारी व कर्मचा-यांस पदोन्नती देण्यात यावी. व सदरचे सेवा प्रवेश / सेवा भरती नियम शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात यावेत.

मा. स्थायी समिती सभा दि. २६/७/२००५ - प्रकरण क्र. ६६ सेवाप्रवेश नियम तयार करुन मा. महासभेस मान्यतेसाठी सादर करणे बाबतचा ठराव केलेला आहे. त्या ठरावास काही अति आवश्यक अशा पूरक सूचना करुन हा ठराव मांडत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र.MBMC /२००२/१७७३/प्र.क्र.१६३/नवि - २५ दि. ३१/१०/२००२ अन्वये वर्ग - १, ची ११, वर्ग - २ ची २९ पदे मंजूर झालेली आहेत त्या मंजूर पदापैकी काही तांत्रीक व ज्या पदाची शैक्षणीक पात्रता या पूर्वी शासनाकडून ठरवून दिलेली होती ती पदे आस्थापनेवर सरळसेवा व प्रती नियुक्तीने भरण्यांत आलेली आहेत. उर्वरीत पदे सेवा शर्ती नियम मंजूर नसल्यामुळे आद्याप पर्यंत पदे भरण्याची कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे ग्रामपंचायत व नगरपालिका कालावधीपासून कार्यक्षमरित्या व सचोटीने प्रामाणिकपणे कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना पदोन्नतीपासुन वंचीत रहावे लागत आहे. त्यांना प्रथम पदोन्नोती देण्यांत यावी. ग्रामपंचायत व नगरपालिका कालावधी पासुन जे कर्मचारी काम करत आहेत हे बहुसंख्य स्थानिक रहिवासी व मागील २० ते २५ वर्ष सेवेत कार्यरत असल्यामुळे साहजिकच ह्या शहराबद्दल जास्त आत्मीयता आहे. त्यामुळे ते चांगल्याप्रकारे सेवा देऊ शकतात. तसेच नैसर्गिक आपत्ती, रेल्वे सेवा खंडीत झाल्यास किंवा आणीबाणीची परिस्थीती उद्‌भवल्यास ते २४ तास महानगरपालिकेच्या सेवेत कार्यरत राहू शकतात तसेच पदोन्नती देताना कर्मचारी थेट भरती सेवेतून आला आहे की बढती घेऊन आला आहे याचा विचार न करता सेवाजेष्ठता निकष लावावा असा निर्धय मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेला आहे.

महानगरपालिकेने आस्थापनेसाठी वर्ग-१ ची ४ पदे, वर्ग-२ ची २३ पदे ही कर्मचा-यांमधूनच भरण्याचे धोरण निश्चित केले आहे त्या अनुषंगाने २७ पदे ही रिक्त होणार आहेत. ह्या रिक्त पदांवर स्वातंत्रसैनिकांची मुले अथवा नातवंडे व सध्या महापालिकेत कार्यरत असणारे वर्ग-३ व वर्ग-४ चे कर्मचारी व त्यांची मुले व

महापालिका हद्दीतील सहिवासी आवश्यक असलेल्या पदाची शैक्षणीक पात्रता पूर्ण करत असतील तर त्यांना प्रामुख्याने प्राधान्य देण्यांत यावे. त्याप्रमाणे सोबत जोडलेल्या यादी नुसार सेवा शर्ती नियम तयार करुन प्रत्येक पदास सवर्ग निहाय शैक्षणिक पात्रता अनुभव सेवा जेष्ठता निश्चित केलेली आहे हे तयार करताना मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५,४५(३),५३(१),४५७(३) या कलमाचा सखोल आभ्यास करुन सेवाशर्ती नियम व विनिमय तयार केलेले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी यांचे जवळ प्रशासकीय कामकाजाचा असलेला अनुभव व क्षेत्रीय कामकाज प्रभावीपणे वेळच्यावेळी निपटारा करण्याची पध्दत तसेच त्यांनी ग्रामपंचायत, नगरपालिका कालावधीपासून दिर्घकाळ सेवा केली आहे अशा कर्मचा-यांना सेवाकाळ त्यांची सक्षमपणे काम करण्याची पध्दत विचारात घेता अशा कर्मचा-यांना देखील पदोन्नती देणे आवश्यक आहे. शासन शासकीय कर्मचा-यांची/अधिका-यांची सेवाजेष्ठता/सेवाकाळ ध्यानी घेवून (जरी पदवीधर नसला तरी) पदोन्नती देत आहे. कर्मचा-यांची सेवाजेष्ठता व सेवाकाळ त्यचा कामाचा अनुभव हातोटी ह्या सर्व बाबींचा विचार करुन सोबतच्या परिशिष्ठा मधील सेवा शर्ती नियम विनिमय यांस मंजूरी देण्यांत येत असून या सभेत हा ठराव मंजूर व्हावा असा मी ठराव मांडत आहे.

हया लोकांनी परिवहन सेवेचा कुठेही विचार कलेला नाही. परिवहन सेवा तुमच्या पदामधून काढून टाकली. शासनाचा आदेश म्हणजे सेवा शर्ती नियम करावे म्हणजे तो आदेश आहे. तुम्ही कलम ४५४ च्या नियमाने विनियम बनविले. आम्ही सेवा प्रवेश नियम बनविले. आम्ही हे का अंमलात आणतो. कारण ४५७ केलेले आहे. जर ४५४ खाली विनियम केले असते तर अधिसुचना जाहिर करावी लागली असती. त्याच्यावर सुचना ऑब्जेक्शन घ्यावे लागले असते. याच्यावर सुनावणी दयावी लागली असती. पुन्हा ती महासभेपुढे अंतिम विचारासाठी आली असता आणि त्याच्यानंतर ती लागू झाली असती. हे गोड स्वप्न बघतात की आज ठराव केला तर उदयापासून पदोन्नती देणार अशा पध्दतीने तुम्हाला विनियमांचा अंमल लगेच देता येत नाही. सेवा प्रवेश नियम हे या ठिकाणी योग्य आहेत. आम्हाला सेवा प्रवेश नियम बनवायला शासनाने सांगितलेले आहे. त्याच्यापुढे जाऊन आम्ही विनियम बनवायचे होते. परंतु, पुढच्या मिटींगला परिवहनच्या स्टाफचा आकृतीबंध मंजुरीसाठी आणलेला आहे. सेवा प्रवेश नियम अगोदर होतील. नंतर आकृतीबंध येईल. पुन्हा शासन पत्र पाठवेल की, आपण परिवहनच्या सेवेसाठी पुन्हा सेवा प्रवेश नियम करा. म्हणजे पुन्हा ये रे माझ्या मागल्या. आम्ही पूर्वी जो आकृतीबंध पाठविला, आता आम्हाला ॲडिशनल कर्मचारी पाहिजेत म्हणून, अतिरिक्त कर्मचारी, नवीन कर्मचारी आकृतीबंध मंजुरी प्रस्ताव सादर करित आहे. आपल्याकडे पोलिस नव्हते. म्हणून पोलिस बंदोबस्त मिळत नसल्यामुळे आपल्याला पोलिस मिळावे म्हणून आपले स्वतःचे पोलिस असावेत अशा प्रकारचा ठराव पूर्वी केलेला आहे. त्याच्यानंतर कॉम्प्युटरचे सर्व्हिस सेन्टर चालू केले. सध्या त्याचा वाली वारस कोणी राहिला नाही. म्हणून आमच्याकडे कायमस्वरुपी चालविणारी यंत्रणा असावी. त्याच्यासाठी जी पदे पाहिजेत. बालवाडी शिक्षिकाबाबत प्रामुख्याने सांगावेसे वाटते की आज सत्ताधाऱ्यांनी 'ज' चा प्रस्ताव आणलेला आहे. बालवाडी शिक्षिकांचा तो प्रस्ताव आहे. तुमचा आकृतीबंधी नाही. मग तुम्ही बालवाडी शिक्षिकांना काय घेणार? त्या सकाळपासून बाहेर उभ्या आहेत. आम्हाला अप्वाईन्टमेन्ट लेटर मिळते का? मुळात तुम्ही आकृतीबंधामध्ये त्यांचा समावेश केला नाही तर बालवाडीच्या शिक्षिका तुमच्या शिक्षिका कशा होतील? म्हणून त्याच्यासाठी आम्ही बालवाडी शिक्षिकांना तीन पे-स्केल केलेला आहे. आम्ही ज्या-ज्या सुविधा चालू केलेल्या आहेत आणि करित आहोत. काही सुविधा सुरु झालेल्या आहेत. आमच्याकडे आकृतीबंध तयार नसल्यामुळे, पद निर्मितीचा प्रस्ताव तयार नसल्यामुळे आम्ही अशी पदे भरु शकत नाही आम्ही त्याच्यावर कुठल्याही कर्मचाऱ्यांवर, कुठल्याही प्रकारचा अन्याय केलेला नाही. त्यांनी ज्या शैक्षणिक अर्हता आणि पात्रता सुचवलेल्या आहे त्याच या ठिकाणी आम्ही ग्राहय धरलेल्या आहेत. परंतु, त्यांनी जे केलेले आहे. ते विनियम केलेले आहेत. आम्ही जे केलेले आहेत. ते सेवा प्रवेश केलेले आहेत. म्हणून त्यांचे विनियम हे शासनाकडे पाठवा. सजेशन, ऑब्जेक्शन मागवा. त्याच्यावर अधिसुचना जाहिर करा. त्याच्यावर हरकती आल्यानंतर सुनावणी दया आणि पुन्हा त्यांच्यावर नियमाप्रमाणे महासभेपुढे तो विषय चर्चेला आणा आणि आमच्या सेवाप्रवेश नियमांना आपण तात्काळ अंमलबजावणी करायला हरकत नाही. फक्त मान्यतेसाठी पाठवायचे. मान्यता मिळाली नाही तरी आमचे नियम लागू होतील. मी मा. महापौरांना विनंती करतो की हयाच्यामध्ये कायदयाचा भाग आहे. आम्हाला त्यांना काही दुखवायचे नाही. परंतु, मी त्यांना परवाच्या मिटींगमध्ये सांगितले होते की तुम्ही काय करु नका. तुमच्या कर्मचाऱ्यांचे हित बघायचे आहे. मी तुम्हाला ठराव देतो. तुम्ही असाच्या असा वाचा. तुम्ही त्याचे श्रेय घ्या. मग मी असा ठराव मांडलेला आहे की त्यांचे नाव घुसवले. सवय आहे ते काका आहेत ना, आमचे. तर त्यांना श्रेय मिळाले तर हरकत नाही. त्याच्यामध्ये त्यांचा वाईट हेतू आहे असे नाही. परंतु, आपण कर्मचाऱ्यांचे चांगले करतोय हे दाखविण्याचा खोटा प्रयत्न कोणीही करु नका. हयाच्यातून हे निष्पन्न होते की आपल्याला विनियमांचा आणि नियमांचा अभ्यास नसल्यामुळे आपण विनियम तयार कलेले आहेत. आपण विनियमांचासुध्दा ठराव दिलेला आहे. आम्ही बोलतो की हा सेवा प्रवेश नियमांचा ठराव

आपल्याला योग्य वाटला तर घ्या. वाटल्यास मतदानाला टाका. जर तुम्हाला कर्मचाऱ्यांचे हित साधायचे असेल तर आपल्याला जो काही सुवर्णमध्ये साधायचा असेल तर तो साधा.

**शशिकांत भोईर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो की हा विषय अनेक वर्षापासूनचा आहे. स्थायी समितीला हा विषय तीन वेळा येऊन गेला आणि आता हा विषय महासभेत पहिल्यांदा आलेला आहे. आपण साधारण प्रथा किंवा नियम असे भावनात्मक बघतो की ग्रामपंचायत काळापासून जे कर्मचारी काम करतात. मग तो कुठलाही ग्रामपंचायतीचा असला तरी त्याला न्याय मिळावा. या भुमिकेतून सभागृहाची भावना आहे. त्याच्यावर कोणाला संशय किंवा संदेह घ्यायचे कारण नाही. परंतु, आपण जे करतो ते क्रॉंक्रीट व्हावे. सगळ्यांच्या हिताचे व्हावे त्याहीपेक्षा त्याचा रिझल्ट लवकर मिळावा अशा दृष्टीकोन सत्ताधारी पक्षाने जर ठेवला असता तर ह्या विषयाला तीन वर्षे गेली नसती. ती गेल्या सहा महिन्यात म्हणजे आपली सत्ता आल्यावर बरोबर सहा महिन्यात तो आणू शकतो. जर तीन वर्षाचा कालावधी लागला असेल तर स्थायी समिती मध्ये चर्चा होऊन स्थायी समितीमधुन एका रात्रीत त्याच्यामध्ये दुरूस्ती अनुमोदन, सुचकाची कोणालाही कल्पना नसताना अनुमोदन सांगतात की मी दुरूस्ती केलेली आहे. ती काय वाचली ते त्यांना समजले की नाही हे माहित नाही. आम्हाला काही समजले नाही. परंतू त्या नंतर सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी जो ठराव मांडला. त्या ठरावातून त्यांचा कायद्याचा अभ्यास होण्याच्या दृष्टीकोनातून त्या जुन्या लोकांना त्याच्यामध्ये खरोखर प्रतिनीधत्व मिळाले. ते रिटायर होण्यापुर्वी त्यांना त्यांचा हक्क मिळावा असा सगळ्या सभागृहाचा उद्देश असला तरी असे मी समजते. तो कोणाच्याही प्रतिष्ठेचा विषय होता कामा नये. परंतु एक करायला गेलो आणि झाले दुसरे. भले करतेवेळी आणखी नुकसान केले किंवा मघाशी जसे म्हटले की, सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी स्पष्ट विचारले की, हा ठराव पद निर्मितीचा आहे ना. हा पदोन्नतीचा विषय आहे की ग्रामपंचायत काळापासून काम करत असलेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याचा विषय आहे ह्याचा त्यांच्या ठरावामध्ये कुठेही उलगडा झालेला नाही. त्याच्यासाठी त्यांनी त्यांना विचारले होते की हा पदनिमिर्तीचा ठराव आहे. पदनिमिर्ती करणे हा वेगळा विषय आहे. पदनिमिर्ती झालेल्या पदांवर जे अनेक वर्षे काम करतात. त्यांना पदोन्नती देणे हा विषय वेगळा आहे. ह्याच्यामध्ये पदोन्नती देते वेळी ज्या ज्या अटीशर्ती मी महापौरांना विनंती करेन की, मघाशी जसे मा. उपमहापौर साहेबांनी सांगितले की त्यांनी त्यांचा कायद्याचा अभ्यास करून काही गोष्टी आहेत. त्या कष्टाच्या असतात. कोणीतरी आपल्या हातामध्ये दिले आणि ते वाचले तर ते कष्ट असते असे नाही. ते कष्ट नसतात, ते फक्त वाचन असते. वाचन करतेवेळी ह्यांचा सुद्धा हेतु अशुद्ध असेल असे मला म्हणायचे नाही. परंतु, त्यांच्या वाचनामध्ये त्यांच्या लक्षात आले असेल की आपण अनेक त्रृटी ठेवुन कोणाच्या तरी सांगण्यावरून हा विषय आणतो. त्याला किती अडचणी येतील. त्या अडचणी ह्या सभागृहाच्या आणि व्यासपिठाच्या लक्षात आल्या असतील की, आपण पाठविलेला ठराव अनेक वर्षापर्यंत प्रलंबित राहिल. त्यांचा अनेक क्युरी निघतील त्याची दुरूस्ती होणार नाही. त्यामुळे तुम्ही जो हेतू बोलला की ग्रामपंचायतीपासून काम करणाऱ्या कर्मचाऱ्याला इथे न्याय किंवा पदोन्नती मिळायला पाहिजे. ती मिळणारच नाही. ह्या पदोन्नतीला मान्यता मिळण्यापुर्वी ते कर्मचारी रिटायर होतील. खरोखर आपली सद्‌भावना आहे. मघाशी जसा ठराव मांडला की आपल्या अधिकारामध्ये, महासभेच्या अधिकारामध्ये ज्यांना-ज्यांना ज्या-ज्या ठिकाणी देता येईल ते देणे गरजेचे आहे. स्थायी समितीमध्ये पाच वर्षाचा कालावधी सन्मा. सदस्य मिलन पाटील यांना का वाटले कोणास ठाऊक त्यांनी तीन वर्षाचा कालावधी केला. तिथे किती शंका येते. त्यांनी संगळ्यांसाठी केलेले नाही. आता त्यांना आठवत नाही की त्यांनी कशासाठी केले त्यांच्या हातामध्ये दिले तेव्हाच त्यांनी वाचले होते. परंतु ते कोणासाठी दुरूस्ती कोणासाठी केली, कशासाठी केली, कोणत्या पदासाठी केली त्याच्यामध्ये स्पष्ट हेतू नाही. आम्ही ह्याच्यामध्ये दुरूस्तीसाठी एवढेच सांगु की हो जो ठराव होईल तो सर्वांच्या हिताच्या दृष्टीने व्हावा. म्हणून भारतीय जनता पार्टी त्याच्यामध्ये थोडीशी सुचना करते की, तिथे असे स्पष्ट यावे की स्वातंत्र्य सैनिकांचे कारण हा अनुभव आहे असा अनुभव सभागृहाला आहे की, आम्ही अनेक वेळा सुचना दिल्या. ह्या सभागृहाचे काय होत आहे. या प्रशासनाचे काय हेतू आहे. आज एक वर्ष सात दिवस झाले. दि. ६/८/२००४ रोजी शासनाने आदेश काढला की, स्वातंत्र्य सैनिकांच्या नातवंडांना नोकरी देऊ शकता. या सभागृहातील ४२ कर्मचाऱ्यांना, स्वातंत्र्य सैनिकांच्या नातवंडांना नोकरी दिलेली होती. त्यांनी सात-सात दिवस काम केलेले होते. ४२ लोकांना म्हणजेच नोकरी दिलेल्या लोकांनी सात दिवस हजेरी पटावर सही करून सुद्धा घरी बसविलेले आहे. सगळी शुद्ध हेतुची लोक नाहीत. आम्ही ह्या सभागृहात सांगतो की ह्याचा हेतु स्पष्ट नसलातरी आम्हाला त्याबद्दल शंका येते. दि. ६/८/२००४ चा ठराव दि. १४/८/२००४ रोजी मी मा. आयुक्त साहेबांच्या हातामध्ये दिला की, तुम्हाला अधिकार आहेत. मा. आयक्त साहेबांची जशी शैक्षणिक पात्रता असेल तशा दृष्टीने तुमच्यामध्ये जी पदे रिक्त असतील मी जीव तोडुन विनंती करून सांगितले मा. आयुक्त साहेब आज असते तर उत्तर देऊ शकले असते. आज श्री. आर. डी. शिंदे साहेब असते तर ते उत्तर देऊ शकले असते. परंतु या ठिकाणी दुसरे

अधिकारी आहेत. माझी पत्रे आहेत.श्री. मनाळे या ठिकाणी बसलेले दिसत आहेत. एकही साधा कर्मचारी जो स्वातंत्र्य सैनिकांचा नातु शिकलाच नाही. त्या सफाई कर्मचारी २८३ रिक्त पदे आहेत. परंतु त्यांनी एकही स्वातंत्र्य सैनिकाचा नातु त्यांनी घेतलेला नाही. मा. आयुक्त साहेब, मी या सभागृहात तुम्हाला विनंती करतो की तुमचे कसब इथेच दाखवा की तुम्ही जर खरोखर येऊ शकता. जो स्वातंत्र्य सैनिक जीवंत असेल ती तुमच्या समोर नतमस्तक होईल. मी तर त्यापेक्षा अशी अपेक्षा करतो की तुम्ही त्या ऑर्डर त्यांना घरी घेऊन केली पाहिजे. की तुमच्या मुलगा अशिक्षीत आहे. शिकला नाही. तो शैक्षणिक पात्रतेमध्ये बसत नाही. परंतु तो माझ्या महापालिकेमध्ये नोकरी करू शकतो. मग आणखी कुठले काम देण्याऐवजी मी त्याला बगीच्यावर ठेवलेला आहे. शाळेवर शिपाई ठेवलेला आहे. असे तुम्ही कुठेतरी त्याला काम देऊ शकता. परंतु मा. आयुक्त साहेबांनी हे वर्षभर केलेले नाही. एक वेळा नाही मी त्यांना पधरावेळा विनंती केली की एकतरी कर्मचारी असावा एक स्वातंत्र्य सैनिक मेला. त्याचे निधन झाले ते आजारी आहेत ते बघा आपण आता जरी केले तर आपल्याला काहीतरी दुवा मिळेल तसे झालेले नाही. इतका गंभीर विषय आहे. त्याच्याबरोबर स्वातंत्र्य सैनिकांची तिथे दुरूस्ती करता येते, ती त्याच्यामध्ये घ्या. दुसरा विषय म्हणजे नगरपालिकेचे जे कर्मचारी आता अनेक निवृत्तीच्या मार्गावर आहेत. त्यांा पदोन्नती मिळेल परंतु नोकर भरती करते वेळी त्याच्या पाल्यांनी, मुलांने, नातवाने, नातीने किंवा त्याच्यावर जे अवलंबून पाल्य असेल त्यांना तर शैक्षणिक पात्रता असती. मघाशी सन्मा. सदस्य लिओ कोलासो साहेबांनी सांगितले की ह्या शहराचा शैक्षणिक दर्जा वाढत चाललेला आहे. मला त्या गोष्टीचा अभिमान आहे की ह्या महापालिकेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मुलांचाही शैक्षणिक दर्जा वाढत चाललेला आहे. जर त्यांनी डिप्लोमा घेतला, जर त्यांनी डिग्री घेतली तर त्यांच्यामध्ये ते वाक्य यावे ह्या महापालिकेतील कर्मचाऱ्यांच्या मुलाला शैक्षणिक पात्रता असेल तर आम्हाला इकडून तिकडून घाटावरून शोधायचे काही कारण नाही. आम्ही सांगतो स्पष्ट मत मांडतो. असु दे जेव्हा आम्ही स्थानिकांच्या नेतृत्वासाठी भांडतो तेव्हा आम्ही स्पष्ट मुद्दा मांडतो की जर मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील कर्मचाऱ्यांचा मुलांची शैक्षणिक पात्रता मिळावी तर त्याला निश्चित प्राधान्य दिले जाईल अशी नोंद होणे गरजेचे आहे. मा. महापौरांनी, मा. उपमहापौरांनी, मा. आयुक्त साहेबांनी दोघांचे ठराव आणलेले आहेत. त्याचा नीट अभ्यास करावा. ग्रामपंचायतीपासून अनेक वर्षे काम करणारे स्वाभाविकच आहेत. मी ठराव आणला आहे. पाहिजे तर त्याचीही कॉपी देतो. स्वाभाविक आहे की, ही स्थानिक माणसे कशासाठी असावित आता हे टिकात्मक नाही. परंतु ते लगेच बोलायला उठतील जेव्हा इथे राहत नाही मग अतिप्रसंगाच्या वेळी त्यांना सर्व्हिस कशी मिळेल. पाऊस पडला त्यावेळेला ह्या जागेत ह्या हद्दीमध्ये किती कर्मचारी होते आणि जे रात्रीचे गेले, ते किती दिवसाने आले. तुम्ही पट बघा हजेरी पट बघा कारण सत्य होते. कोणालाही शिक्षा करण्याचे कारण नाही. जो माणूस शहराच्या बाहेर गेला तो माणुस शहरात येऊ शकत नाही. त्याच्यामुळे मी हा विषय शिक्षा देण्यासाठी मांडत नाही. हा विषय असा आहे की, जो माणूस ह्या शहरात राहतो. ह्या शहरातील नागरिक आहे. तो अतिप्रसंगाच्या वेळी रात्री बेरात्री महापालिकेच्या सेवेत तुम्हांला उपलब्ध होईल. म्हणून स्थानिक लोकांना प्राधान्य द्या असा आमचा आग्रह आहे. धन्यवाद.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम सेवा भरती नियम २००५ ला मान्यता देण्याच्या अनुषंगाने या ठिकाणी विषय आलेला आहे. मघापासून बऱ्याच सन्मा. सदस्यांनी आपले मते मांडलेले आहेत. या ठिकाणी सन्मा. रोहिदास पाटील यांनी जो विषय मांडला मघाशी त्यांनी राष्ट्रवादीवर आरोप केला. त्या सन्मा. सदस्यांनी स्वतःच्या पक्षाचे नगरसेवक म्हणून त्यांनी त्यांचा मुद्दा मांडला कुठेही राष्ट्रवादीचा उल्लेख केलेला नव्हता. परंतू सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांना पक्षाला घेऊन पडण्याची खुप सवय झालेली आहे. आणि या सभागृहात वादविवाद वाढविण्याचे नेहमी प्रसंग उद्‌भवतात. कारण त्यांनी कोणत्याही पक्षाचा उल्लेख केलेला नव्हता. त्याचप्रमाणे या ठिकाणी जी नियमावली करण्यात आलेली आहे ही सेवा शर्ती नियम, पदोन्नती साठी आणि भविष्यात जी नोकर भरती होणार आहे. त्यांना हे नियम लागू होतील. या अनुषंगाने आपण या ठिकाणी विषय आणलेला आहे. ह्याच्यामध्ये काही पदांवर पदोन्नती देण्यासाठी निवड पद्धत ठेवलेली आहे. ती निवड पद्धत एक-दोन पदांसाठी ठेवलेली आहे. ती ठेवायची असेल तर सर्व पदांना पदोन्नतीसाठी ठेवा. प्रत्येक पदाला नाहीतर कोणत्याही पदांना ठेवू नये ही एक सुचना आणि दुसरी सुचना म्हणजे शासनाच्या नियमानुसार प्रत्येक पदाला ज्या पदावर आहे. त्यांनतर पुढील पदावर जाण्यासाठी त्या पदाचा कमीतकमी तीन वर्षाचा अनुभव असणे हा शासनाचा नियम आहे. परंतु आपण काही ठिकाणी तीन वर्षे काही ठिकाणी दोन वर्षे काही ठिकाणी पाच वर्षे पदोन्नती आपल्या सोयीनुसार केलेली आहे. ह्या सर्वांना समान वर्षे पदोन्नतीसाठी ठेवावी. एका पदावरून दुसऱ्या पदावर जाण्यासाठी कमीत कमी तीन वर्षे त्या पदावर काम केलेला कर्मचारी असावा. परंतु या ठिकाणी सोयीनुसार वर्ष केलेले आहे. त्याची पाहणी करून नियमानुसार त्यांची नियुक्ती करावी. त्याचप्रमाणे पदोन्नतीसाठी जी वयाची अट ठेवलेली आहे. माझ्या मते वयाची कोणतीही अट ठेवू नये कारण ती अट नसते. कारण त्यांचा अनुभव, त्यांची शैक्षणिक पात्रता ह्याच्यावरच पदोन्नती दिली जाते. त्यामुळे वयाची अट ठेवू नये आणि सरळ सेवेतून जी भरती करण्यात येणार आहे. त्याच्यासाठी शासन सेवेतुन जी भरती

करण्यात येणार आहे. त्याच्यासाठी शासन निर्णय क्र. एस.आर.व्ही./२००४ प्रशासकीय क्र.१९/२००४/१२ मंत्रालय मुंबई ३२ दि. १७ ऑगस्ट २००४ ह्याच्या मध्ये शासन सेवा प्रवेशाची कमल वयोमर्यादा वाढविण्याबाबत शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्याच्यामध्ये ओपन गटास म्हणजेच खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी ३३ वर्षे केलेले आहेत. पुर्वी ३० वर्ष वयोमर्यादा होती. मागासवर्गीयांसाठी ३५ वर्षे वयोमर्यादा हाती ती आता ३८ वर्षे केलेली आहे. त्याच्यामुळे सरळ सेवा भरतीमध्ये वयाची अट टाकू नये.  जो शासनाचा निर्णय आहे त्याप्रमाणे वयाची अट ठेवण्यात यावी त्याचप्रमाणे दुसरा विषय असा आहे की पान क्र. ३ मध्ये जो परिक्षेचा अभ्यासक्रम दिलेला आहे. त्याच्यामध्ये 'अ' मध्ये (२) अग्निशमन महाविद्यालय नागपूर, चेन्नई, बडोदा असा अंतर्भाव करण्यात यावा. त्याचप्रमाणे पान क्र. ५ मध्ये वरिष्ठ लिपीक कार्यालय, अधिकक्षक आणि विभाग अधिक्षक तसेच लिपीकाचा वरिष्ठ लिपीक होण्यासाठी या अगोदरच्या ज्या पदोन्नती दिलेल्या आहेत त्यांना एल.एस.जी.डी. कंम्प्लसरी ठेवलेले आहे आणि त्याप्रमाणे पदोन्नती दिलेली आहे. त्यामुळे जर आता क्लार्कचा वरिष्ठ क्लार्क करायचा असेल, लिपीक करायचा असेल तर एल.एस.जी.डी. परिक्षेची अट ठेवावी. त्यापेक्षा वरची पदे दयायची असतील तर त्यांना एल.जी.एस. कम्प्लसरी करावे. त्याचप्रमाणे पान. क्र. ६ जो उपस्थानक अधिकार आहे. अग्निशमन विभाग परिक्षा घेणारा प्राधिकरण अग्नीशमन महावद्यिालय नागपूर आणि अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेची मान्यता असलेले अग्नीशमन महापाविद्यालय किंवा संस्था असा त्याच्यामध्ये उल्लेख असावा. त्याचप्रमाणे पान क्र. २१ मध्ये उपायुक्त त्यामध्ये दोन पदोन्नती, ५० टक्के पदोन्नती ठेवलेली आहे ती तशीच असावी आणि सरळ सेवेतून ५० टक्के करावे. ह्याच्यामध्ये शैक्षणिक पात्रतेबद्दल उल्लेख केलेला आहे. त्याचासुध्दा विचार करावा. पान. क्र. २४ वर अधिक्षक ह्याच्यामध्ये वरिष्ठ लिपीक पदाचा किमान पाच वर्षाचा अनुभव म्हटलेले आहे. त्या ठिकाणी त्यांची शैक्षणिक पात्रतेचा उल्लेख केलेला नाही. फक्त आस्थापनेवरील लिपीक कर्मचारी असे म्हटलेले आहे. जर त्या ठिकाणी मान्यता प्राप्त विद्यापीठाचा पदवीधर असावा.  तर त्याला देखील पाच वर्षाचा अनुभव असेल तर त्याचादेखील पदोन्नतीसाठी ज्येष्ठता यादी पाहून विचार व्हावा. पान. क्र. २७ मध्ये शिपाई, उद्वाहनचालक, निलमुद्रक, सायक्लोस्टाईल झेरॉक्स आणि नाईक ह्यासाठी पदोन्नती आणि नामनिर्देशन म्हटलेले आहे. शिपाई नामनिर्देशन आहे त्याच्यामध्ये पदोन्नती म्हणावे. कारण आपण सफाई कामगार स्थानिक म्हणून भरलेले आहेत आणि विशेष बाब म्हणून शासनाकडे पाठपुरावा करून त्यांना कायम केलेले आहे. परंतु आपल्याकडे त्यांच्या पदोन्नतीसाठी नियम नाही. त्याच्यासाठी त्या सफाई कामगारांना या ठिकाणी वरील पदावर येण्यासाठी देखील पदोन्नती ठेवण्यात यावी. त्याचप्रमाणे पान क्र. ३७ वर सचिव किंवा असे म्हटलेले आहे त्याच्यामध्ये पुन्हा एकदा किंवा टाकून मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या कोणत्या शाखेची पदवी परिक्षा उत्तीर्ण किंवा एल.एल.बी. पदवी आवश्यक किंवा टाकून तो देखील उल्लेख करावा. पान क्र. ४० वर विधी अधिकारीमध्ये सरळ सेवा असे म्हटललेले आहे. त्याच्यामध्ये पदोन्नती ठेवावी. पदोन्नतीमध्ये जी टिप टाकलेली आहे. सरळ सेवा नियुक्त केलेल्या उमेदवाराला महापालिका कर्मचारी आहे. त्याच्यामध्ये महापालिका आस्थापनेवर शैक्षणिक पात्रता झालेला उमेदवार असेल तर त्यास जी २ नंबरची अट टाकलेली आहे. जिल्हा न्यायालय, कनिष्ठ न्यायालय आणि स्वतंत्र वकिलीचा किमान पाच वर्षाचा अनुभव ती अट शिथील करून त्यांना एल. एल. बी आवश्यकता ठेवावी. मा. महापौर मॅडम, विधी अधिकारी २ नंबरची अट आहे. जिल्हा न्यायालय, कनिष्ठ न्यायालय, स्वतंत्र वकिली किमान पाच वर्षाचा अनुभव, ती अट शिथिल करु त्याला पाच वर्षांचा अनुभव आणि मिरा भाईंदर महानगरपालिकेचा कर्मचारी एल.एल.बी. झालेला असेल तर त्याला त्या ठिकाणी पदोन्नती द्यावी. सरळ सेवेमध्ये पदोन्नती द्यावी पान क्र. ४३ मध्ये अन्न निरीक्षक हे पदोन्नतीने घेतलेले आहे. त्याच्यामध्ये केंद्र शासनाने मान्यता दिलेली आहे.  संस्थेचे अन्न निरीक्षक म्हणून नमुने घेण्याबाबतचे तीन महिन्याचे प्रशिक्षण.  हे प्रशिक्षण आपण नगरपालिकेने त्याची नियुक्ती केल्यानंतर आपण त्यांना प्रशिक्षणाला पाठवतो त्यामुळे आपल्याला तो अनुभव कॅन्डिडेटकडून मिळणार नाही.  त्याच्यासाठी त्याला नियुक्त करून पदोन्नतीसाठी पाठवावे. त्यानंतर मुख्य अन्न निरीक्षक पदाच्या अन्न निरीक्षक पदावर तीन वर्षे काम केल्यानंतर त्यांना मुख्य अन्न निरीक्षक पदासाठी नियुक्ती द्यावी. या ठिकाणी आठ वर्षे म्हटलेले आहे. त्या ठिकाणी तीन वर्षे करावे. पान क्र. ४६ कक्ष सेविका, कक्ष सेवक याच्यामध्ये इयत्ता सातवी पास, मराठी लिहीता, वाचता यावे. पंचवीस खाटयाचे रूग्णालय कक्ष सेविका हे जे म्हटलेले आहे. ह्याच्यामध्ये अशी टिप बधता महापालिकेच्या आरोग्य केंद्रावर काम करीत असल्यामुळे कर्मचाऱ्यांना वयाची अट शिथिल करून प्राधान्य देण्यात यावे. जे कक्षसेविका आणि कक्षसेवक आहेत. महापालिकेच्या ठेक्यावर काम करताना त्यांना वयाची अट शिथील करून त्यांना सामावून घ्यावे. पान. क्र. ४७ वर जे प्रदूषण नियंत्रण अधिकारी आहेत. आता जे ठराव झाले त्याच्यामध्ये जी पदे दिलेली आहेत. त्याच्यामध्ये प्रदूषण नियंत्रण अधिकारी ह्या पदाचा उल्लेख नाही असे मला वाटते नसल्यास त्याचा उल्लेख करावा. जी शैक्षणिक पात्रता लिहीलेली आहे मान्यता प्राप्त विद्यापीठाची परिसर अभियांत्रिकीमधील पदवी प्रथम श्रेणीत त्याच्यामध्ये ऑर टाकून मान्यता प्राप्त विद्यापिठाच्या परिसर अभियांत्रिकीमधील पदविका प्रथम श्रेणीत उत्तीर्ण.  मिरा-भाईंदर शहरातील रहिवासी असल्यास प्राधान्य देण्यात येईल आणि त्याला पाच वर्षाचा कोणत्याही प्रायव्हेट कंपनी आणि लिमिटेड कंपनीचा अनुभव असणे आवश्यक आहे. पान क्र. ५० पदोन्नतीची जी टक्केवारी दिलेली आहे त्याच्यामध्ये

स्वच्छता निरीक्षक पदोन्नती ७५ टक्के ठेवावी आणि सरळ सेवेने २५ टक्के ठेवावी. त्याचप्रमाणे स्वच्छता उपनिरीक्षक सरळ सेवेतून २५ टक्के आणि पदोन्नती ७५ टक्के ठेवावी. पान क्र. ५१ मध्ये मिरा-भाईंदर महापालिकेत भविष्यात जर मुकादम, सफाई कामगार घेण्याची वेळ आली तर मिरा-भाईंदर महापालिकेत जे सध्या ठेक्यावर सफाई कामगार म्हणून काम करतात त्यांना प्राधान्य देण्यात यावे. पान क्र. ५४ वर उपनगर अभियंता, स्थापत्य पाणीपुरवठा सरळ सेवा पदोन्नती निवड पध्दत असे याठिकाणी म्हटलेले आहे ते ५०-५० टक्के ठेवावे. त्याच्यासाठी टक्केवारी लिहीलेली नाही. पदोन्नतीने ५० टक्के आणि सरळ सेवेन ५० टक्के आणि पदोन्नती निवड पध्दतीबरोबर ज्येष्ठता शैक्षणिक अर्हता आवश्यकत आहे.

**रतन पाटील :-**

त्याच्यामध्ये महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना वयाची अट शिथिल करा.

**प्रकाश दुबोले :-**

उपअभियंता या पदामध्ये ७५ टक्के पदोन्नती असताना उपअभियंता, कार्यकारी अभियंता याच्यामध्ये ७५ टक्के पदोन्नती असताना त्यात मिरा-भाईंदर कर्मचाऱ्यांना वयाची अट शिथील असा मुद्दा टाकलेला आहे. जर ७५ टक्के पदोन्नती ठेवलेली आहे. तर सरळ सेवेतून कोण कर्मचारी येत असेल तर त्याच्यामध्ये आपल्याला कर्मचाऱ्याला प्राधान्य देण्याची आवश्यकता काय? त्यासाठी आपण ७५ टक्के पदोन्नती ठेवलेली आहे. उपअभियंता पदोन्नतीमध्ये शाखा अभियंता ५० टक्के असे म्हटलेले आहे आणि पदविकाधारक शाखा अभियंता ५० टक्के असे म्हटलेले आहे. त्याच्यामध्ये मिरा-भाईंदरच्या कर्मचारी पदवीधर असेल तर आपण त्याला ७५ टक्के द्यावे. कारण पदवीधारांना प्राधान्य द्या. जर पदवीधर आणि पदवीधारक हे दोघे एकाच वेळेला सर्व्हिसला लागले असतील तर पदवीधर वयाच्या हिशेबाने मागे जाईल. त्याच्यामुळे पदवीधराला प्राधान्य द्यावे. त्यांना ७५ टक्के रिझर्व्हेशन द्यावे. पदाविकाधारकाला २५ टक्के ठेवा. पान क्र. ६५ वर नगररचनाकार, सहाय्यक नगररचनाकार याच्यामध्ये सरळ सेवेने पदोन्नती असे म्हटलेले आहे. त्याच्यामध्ये ५०-५० टक्के राखीव ठेवावे. कारण त्याच्यामध्ये टक्केवारी ठेवलेली नाही आणि वयाच्या अटीबद्दल शासनाने जे नियम आहेत त्याप्रमाणे ठेवाव्या पान क्र. ६७ उद्यान अधिक्षक याच्यासाठी सरळ सेवा आणि नामनिर्देशन म्हटलेले आहे. जर मिरा भाईंदरचे कर्मचारी शैक्षणिक पात्रतेत बसत असेल तर त्याला पदोन्नती दयावी, त्याच्यामध्ये पदोन्नती ठेवावी अशी मी या ठिकाणी सुचना मांडतो. मिरा-भाईंदर नगरपालिकेच्या आस्थापनेवर शैक्षणिक पात्रता धारण करणाचा कर्मचाऱ्याला पदोन्नती द्यावी. उद्यान विद्या अधिक्षक आहे. त्यांच्यामध्ये ऑर ठिकाणी महारष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शालांत परिक्षा उतीर्ण कृषी पदाविका उत्तीर्ण आणि शेतकरी असल्यास प्राधान्य असे या उद्यान विद्या सहाय्यकमध्ये ऑर टाकावे आणि सरळ सेवा ५० टक्के आणि पदोन्नती ५० टक्के करावी अशी मी या ठिकाणी सुचना मांडतो.

**मोहन पाटील :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतो की सदर नियमावलीचा हा जो ड्राफ्ट दिलेला आहे. आम्हाला फार महत्वाच्या डॉक्युमेन्टस फार कमी वेळात मिळाली आणि या ज्या अटीशर्ती वगैरे दिलेल्या आहेत. त्याच्यामध्ये पान क्र. ४ मध्ये आयुक्त मिरा-भाईंदर महाननगरपालिका हेच फक्त लिहीलेले आहे. अजूनपर्यंत मा. आयुक्त साहेबांनी सही केलेली नाही, हे महत्वाचे आहे. नं. ८ चे नं. ४ वर मा. आयुक्तांच्या निर्वाचनाच्या सक्ती नं. ८ चा क्लॉज शेवटचा आहे. पंरतु आपण ह्या सेवा शर्ती टाकल्या बऱ्याच चर्चा झाल्या. स्थानिक पदाधिकारी पदवीधर त्यानंतर शहरातील, शहराच्या बाहेरचे पंरतु मी ह्या सभागृहाला सांगु इच्छितो की, ही महापालिकात मी नुसता या गावचा आहे म्हणून चालणार अशातली बाब नाही. एक छोटीसी गोष्ट आहे. आपल्या इकडच्या कर अधिक्षकांच्या ऑफिसमध्ये मी गेलो त्यांना एका महिलेने जी गव्हर्नमेन्टमध्ये सर्व्हिस करत होती तिने सांगितले की माझे नांव चेन्ज करायचे आहे तर त्या बाईने नांव सांगितले. प्रथम तोंडी सांगितले ते त्याला कळले नाही. त्यांनी त्या बाईला लेखी देण्यास सांगितले. ती बाईसुध्दा सर्व्हिस करीत होती. आपले स्थानिक वरिष्ठ अधिकारी जे होते त्या बाईने तीन वेळा नांव दिले. तीन वेळा त्या क्लार्कच्या चुका झाल्या. आपल्या इकडच्या सिनियर क्लार्क कॅपिटलमध्ये इंग्लिशमध्ये नांव लिहू शकत नाही. ही आपली लायकी आहे. जे सत्य आहे ते सत्य आहे. हे कुठेतरी सुधारायचे असेल तर तो माणूस कुठला आहे, काय आहे, तो काय करत होता तो कोणाचा नातलग हे महत्वाचे नाही. त्याला आपल्या आकडयाची बेरीज समजते का? एखादी व्यक्ती आपल्या पदावर इंग्लिश बोलायला आली तर उद्या जे काही डी. एम. सी. किंवा कर अधिक्षक होणार आहे तो साधे इंग्लिशसुध्दा बोलु शकत नाही. बाकीचे तर सोडून द्या. या ठिकाणी हा जो नं. ८ चा क्लॉज टाकलेला आहे त्या ठिकाणी हे प्रकरण संपलेले आहे. ह्याच्या इकडे नं. ८ चा क्लॉज सेवा ज्येष्ठता लागु करताना पाळावयाच्या शर्ती असे पाहिजे होते. परंतु हे जाणून बुजुन मॅनिप्लेट करून टाकले गेलेले नाही. कारण आता आपल्या पुढे वाचणार आहेत. त्याच्यामध्ये आपल्या इकडचे स्थानिक, आपल्या इकडचे ग्रामपंचायतीचे क्लार्क वगैरे जे कोणी कर्मचारी असतील ते या आपल्या महापालिकेमध्ये ज्यांना ३०-३५

वर्षे सेवा झाली. अशातले जुनी लोक जास्तीत जास्त पनिशमेंटमुळे आतमध्ये आहेत. हा माझा दावा आहे. आपण कोणाची बाजु कशाला करायची? ज्या कर्मचाऱ्याला हे माझे गाव आहे. ही माझी महापालिका आहे. जर हे समजुन काम करायचे नसेल तर आम्हाला त्यांची काहीही गरज नाही. त्यांना घरी बसावे. जमिनीचे पैसे भरपुर आलेले आहेत. त्याला काहीही कमी नाही. जेव्हा आपल्या इकडच्या या कर्मचाऱ्यांना निलंबित केले गेले अशातले बहुतेक स्थानिक आहेत. हे मी आज या मिटिंगमध्ये सांगू इच्छितो. त्यांना कोर्टाने घरी बसविलेले होते. आज ज्या सन्मा. सदस्य मिलन पाटील यांनी हे सगळे वाचून दाखविले त्या स्थायी समितीने जो ठराव केला. त्याच्या वर सुद्धा ह्या मॅट कोर्टाने ऑर्डर दिलेली आहे. ती आपल्या महापालिकेच्या स्थायी समितीच्या निर्णयाच्या विरोधात आहे. ह्याच्यातील ज्या काही त्रृटी आहेत. त्या म्हणजे कर्मचारी उशीरा १-२-३ यांच्या गोपनीय अहवाल, बढती रोखणे इत्यादी शेऱ्यांचा विचार करून निर्देष असलेल्या कर्मचाऱ्यांनाच वरिल विषयी पात्र ठरवून ह्या पान क्र. ८ वर आपण घ्यावे. म्हणजे नं. ८ जे काही आहे ते आयुक्तांच्या निर्वाचनाच्या सक्ती आहे. त्याला नं.९ देऊन नं. ८ हा मी सांगितलेल्या सुचनेला द्यावा. सगळ्याचे मुळ ते आहे. कारण त्याच्यामुळे बरेच अडकणार आहेत. आपण जर तसे केले नाहीतर उद्या तो मॅटमध्ये गेले तर त्या ग्राऊंडवर त्याला ती स्थगिती मिळणार आहे. पान क्र. २१ याच्यामध्ये वर्ग-२ पदावरील पाच वर्षाचा प्रशासकीय अनुभव असलेल्या अधिकऱ्यामधून पदोन्नती अधिकाऱ्यामध्ये आपल्याला ही पोस्ट म्हणजे सध्या कोण आहे? माझ्या माहिती नुसार या ठिकाणी कोणीही अधिकारी या पदावर नाही सहाय्यक आयुक्त खाली आले किंवा, किंवा, किंवा पान क्र. २१ मध्ये मान्यताप्राप्त कुठल्याही शाखेची पदवी परिक्षा उत्तीर्ण व सहाय्यक आयुक्त यापेक्षा मुख्य लिपीक व वरिष्ठ लिपीक यांचा समावेश या पान क्र. २१ वर करावा. पान क्र. २२ याच्यामध्ये नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांसाठी कमाल वयोमर्यादा हा जो कॉलम आहे. या ठिकाणी नील दाखविलेले आहे. परंतु ही जी संपुर्ण पदोन्नती द्यायची आहे. त्याच्यामध्ये त्यांना ५०-५० टक्के आरक्षण म्हणजे संधी द्यावी जशी सिनिऑरिटी आणि कॉलीफिकेशन त्यानंतर पान क्र. ३५ मध्ये चार लेखापाल आणि पाच उपलेखापाल यांच्यामध्ये नं. १ जो लिहिलेला आहे की वरिष्ठ लेखा लिपीक हे पद आपल्या महापालिकेत नाही. असे माझ्या माहितीनुसार मला माहिती आहे. त्यापेक्षा लेखा ऐवजी वरिष्ठ लिपीक लेखा हे कट झाले पाहिजे नं. ५ मध्ये वरिष्ठ लेखा परत आलेले आहे. तिकडे वरिष्ठ लिपीक आले पाहिजे. पान क्र. ६७ मध्ये उद्यान अधिक्षक त्याच्यामध्ये सरळ सेवा आणि सरळ सेवाऐवजी (१) नामनिर्देशन (२) पदोन्नती (३) बी.एस.इ. हॉर्टिकल्चर परिक्षा उत्तीर्ण, दोन वर्षाचा अनुभव असावा आणि एम.एस.सी.आय.टी परिक्षा उत्तीर्ण त्यानंतर पदोन्नती. परिशिष्ट ५-६ कॉलमच्या ह्या साईडला मान्यता प्राप्त कृषी विद्यापिठाची बी.एस.सी. हॉर्टिकल्चर परिक्षा उत्तीर्ण विशिष्ट शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतर झाडे, उद्याने संवर्ग, करण्याचा दोन वर्षाचा अनुभव एम.सी.आय.टी. इत्यादीचा समावेश असावा.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेब, पान क्र. ६७ मध्ये ५ आणि ६ नाही. तो आकडा परत वाचा.

**मिलन म्हात्रे :-**

मी कोष्टक वाचतो.

**मा. उपमहापौर :-**

कोष्टकामध्येच पान क्र. ६७ वर परत वाचा. त्याच्यामध्ये ५ आणि ६ चा उल्लेख केला.

**मिलन म्हात्रे :-**

५ आहे साईडला मी से वाचतो. आपण असे बघत आहात. शेवटचा कॉलम या संपुर्ण ह्याच्यामध्ये शेवटी जे सुचक आणि अनुमोदन दिलेले आहेत. मी स्वतः दोन वर्षे स्थायी समितीला काम केलेले आहे. मा. उपमहापौर, आपण माझ्याबरोबर होतात. या ठिकाणी संपुर्ण हा जो कच्चा ड्राफ्ट आहे. ह्याच्यावर कुठलेही गोल सील नाही. त्यानंतर सभापतीच्या स्वाक्षऱ्या जरी असल्या तरी किती तारखेला स्वाक्षरी केलेली आहे. ते काही दिलेले नाही. त्यानंतर प्रशासनाच्या वतीने ह्याच्यावर कोणाचीही सिग्नेचर नाही. आपण ह्या टेक्निकल बाजू नोंद करून घ्याव्यात, सिग्नेचर का झालेली नाही ते जरा बघा. त्यानुसार मला ह्याच्यामध्ये सचिवांची सिग्नेचर दिसत नाही. म्हणजे शेवटी फायनल पेजवर मा. सभापती, मा. आयुक्त ब्लॅक आहे. सचिवांची कुठेही सही नाही. सुचक अनुमोदनने घाईघाईने सही केलेली आहे. कारण सन्मा. सदस्य मिलन पाटील यांची सही लांब पळालेली आहे. लवकर लवकर सही केलेली आहे. या ठिकाणी सचिवांची सिग्नेचर नाही. ह्या टेक्निकल बाबी आहेत. तुम्हाला ह्याच्याबद्दल ऑबजेक्शन मध्ये जाता येईल आमचा ह्याच्यावर एक ठराव आहे. सेवा नियमांची मंजुरी देण्याबाबतचा माझा ठराव आहे.

महानगरपालिकेने आज दि. १७/८/२००५ च्या महासभेमध्ये मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेले प्रकरण म्हणजेच सेवा प्रवेश नियमांना मंजूरी देणे करीता ठेवले असून त्याचा विस्तृत मसुदा सभागृहापुढे देण्यांत आलेला आहे. या मसुद्यात राहिलेल्या त्रुटी व सदर मंजूर पदे पदोन्नतीने भरतेवेळी प्रामुख्याने कोणत्याही कर्मचा-यावर कोणत्याही प्रकारचा अन्याय न होण्याकरिता किंवा भविष्यात ही पदोन्नती तसेच सेवा जेष्ठता यामध्ये महाराष्ट्र प्रशासकीय लवाद (MAT) औद्योगिक न्यायालय/उच्च न्यायालय यामध्ये कोणतेही प्रकरण वाद निर्माण होऊन जाऊ नये. याकरीता सदर पदोन्नतीची सेवा प्रवेया नियम मंजमर करते वेळी

महानगरपालिका आस्थापनेवरील कार्यरत असलेल्या अनुभवी व शैक्षणिक आर्हता धारण करणा-या कर्मचा-यांचा प्राधान्याने विचार करण्याकरिता या परिशिष्ठ १ मध्ये ज्या ठिकाणी ही मंजूर पदे पदोन्नतीने भरावायाची आहेत. ती पदे अनुभवी कर्मचा-यांतुन ५०% व शैक्षणिक पात्रता धारण करणा-या पात्र कर्मचा-याकडून ५०% या प्रमाणात भरण्यांत यावी.

तसेच या सेवा प्रवेश नियमावलीत सरळ सेवेने दर्शविण्यात आलेल्या पदांबाबत आस्थापनेवरील कार्यरत असलेला कर्मचारी जर त्या पदाची शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यास अशा कर्मचा-यांतुन ते पदे पदोन्नतीनेच भरण्यांत यावे.

असा मी ठराव मांडत आहे.

**नयना म्हात्रे :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सचिवजी मी आपल्याकडे ठराव पाठवतो.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, या ठिकाणी माझी एक सुचना मांडण्यासाठी आपण मला परवानगी द्यावी असे माझी नम्र विनंती आहे. आपली परवानगी असेल तर मी बोलेन. मा महापौर मॅडम मी परवानगी मागुनच बोलेन. पान क्र. १२ वर वयोमर्यादेचे पान क्र. १ मध्ये अनुसुचित जाती. अनुसुचित जमाती, भटक्या जाती इतर मागासवर्गीय असे लिहिलेले आहे. त्याच्यापुढे एस.बी.सी. सुद्धा आले पाहिजे अशी माझी सुचना आहे. स्पेशल बॅकवर्ड क्लास त्याच्यानंतर ज्या वर्षात जागा भरण्यासाठी स्थानिक वृत्तपत्रांमध्ये त्या ठिकाणी रिजनल डेली मराठी असे पेपरदेखील अशी माझी एक सुचना आहे. पान क्र. १३ वर अपंग, माजी सैनिक आणि स्वातंत्र्य सैनिकांचे वारस ह्या शब्दात थोडीशी स्पेलिंग मिस्टेक आहे. परंतू आपण जी वयोमर्यादा ४५ वर्षे घेतलेली आहे. ती जी शिथिल केलेली आहे. ती आपल्या शासनाच्या जी. आर. च्या बरोबर नाही. विसंगत आहे. त्याच्यामध्ये कुठेतरी डिफरन्स आहे. तसेच खाली परत अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व भटक्या जातीतील उमेदवारीसाठी नेमणुकीच्या अर्हतेच्या अटी शिथिल करणे. आपण त्या ठिकाणी पुन्हा ओ.बी.सी. आणि एस.बी.सी. या दोन्ही प्रवर्गा बद्दल इन्क्ल्युड केलेले नाही. मा. महापौर मॅडम मी विशेष करून आपले लक्ष वेधु इच्छितो की या ठिकाणी जे स्थानिक लोक राहतात. त्याच्यापैकी मोठ्या प्रमाणात आग्री समाजाचे कोळी समाजाचे लोक आहेत. जे विशेष करून ओ.बी.सी. मध्ये येतात किंवा एस.बी.सी. मध्ये येतात. त्यांनादेखील या ठिकाणी प्राधान्य मिळणार नाही. तेसच पान क्र. १७ वर पुन्हा राज्य शासनाचा आदेशन्वये एस.सी./एस.टी या ठिकाणी अनुसुचित जमीतीचा उल्लेख केलेला नाही. पुन्हा अनुसुचित जाती, जमाती, भटक्या विमुक्त जाती आणि मागासवर्गीय लिहिलेले आहे. मागासवर्गीयामध्ये कोण ? तो परत कधी तरी टेक्निकल मुद्दा येईल. म्हणून मागासवर्गीय म्हणजे ओ.बी.सी. आणि एस.बी.सी. हेच त्याच्यामध्ये पान क्र. १७ वर फक्त हे बाकी राहिलेले आहे. महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त आणि आपले नियम १९७९ महाराष्ट्र नागरी सेंवा शिस्त व आपले नियम, १९७९ महाराष्ट्र नागरी सेवा पदग्रहण अवधी, परकिय सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढून टाकणे या काळातील प्रदाने यासाठी देखील नियम १९८१ चे नियम आहेत. महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८१ महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन नियम १९८२ हे सगळे जे कायदे शासनाने बनविलेले आहेत. जे अधिनियम आहेत ज्याला मंजुरी मिळालेली आहे. हे सगळे अधिनियम, अटीशर्ती आपण समाविष्ट करून ह्या नेमणुकीसाठी अर्हता आणि सेवा भरती नियम आज मंजुरीसाठी ठेवलेला आहे. ह्याच्यामध्ये बऱ्याच त्रृटी आहेत. मी संपूर्णपणे हे वाचू शकलो नाही. याला कारण म्हणजे आता आलेली अतिवृष्टी हे आहे. मी १९ पाने शांतपणे वाचु शकलो. मी प्रामाणिकपणे आपल्यासमोर बोलतो की ह्या अख्ख्या अटीशर्ती मी वाचु शकलो नाही. तरी मला असे वाटते की काही ठिकाणी अन्याय होत आहे. आपल्या सभागृहातील जे जुने कर्मचारी ग्रामपंचायत आण नगरपालिकेमध्ये कामाला होते. परंतु आपण सगळ्या गोष्टी आणि त्याच्याबद्दलचा विचार करत राहिलो तर ज्याप्रमाणे सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे बोलले की जुन्या कर्मचाऱ्यांनी त्याच्यामध्ये सन १९९४ ला ॲन्टी करप्शनची ट्रप झाली या ठिकाणी शिक्षा झाली. कितीतरी वर्षे लोक सभागृहाच्या बाहेर होते. कर्मचारी देखील आज काही कार्मी करतात ते सगळे स्थानिक लोक त्यामध्ये मोठ्या संख्येने आहे. तो विषय फार मोठा आहे. तरी मी आपल्याला सांगु इच्छितो की मागासवर्गीय शासकीय व निमशासकीय ह्याच्यामध्ये म्युनिसिपल कार्पोरेशन येते त्यांची सेवा इत्यादीमध्ये आरक्षण मिळावे याबाबतीत पुर्व पिटीका त्या सबंधी शासनाने वेळोवेळी काही निर्गमित केलेले काही नियम आहेत. काही आदेश आहेत. त्यापैकी टक्केवारीवरून किमान रिक्त पदे दर्शविणे हे ह्याच्यामध्ये नाही, व्यवस्थीतपणे नाही. मागासवर्गीय अनुशेष म्हणजे बॅकलॉग असेल तर त्यांना सेवामुक्त न करणेबाबत शासनाचा जी.आर. आहे. मागासवर्गीयांना सेवामुक्त करण्याची अट गुणवत्तेवर निवड झालेल्या मागासवर्गीयांच्या बिन राखीव पदावर भरती करणे. शासकीय सेवेतील मागासवर्गीयासाठी राखीव पदे ठेवणे. सेवा भरती वर्षातील एकुण रिक्त पदांच्या संबंधीत नवीन आणि मागील राखीव पदे ही महत्वाची लाईन आहे. शासकीय सेवेत मागासवर्गीय राखीव पदे ठेवावीत. सेवाभरती एकुण

वर्षातील रिक्त पदांच्या संबंधित नवीन व मागील राखीव पदे पुढे चालु ठेवणे यासाठी ५० टक्क्याची मर्यादा आहे. ते ह्याच्यामध्ये दाखविण्यात आलेले नाही. शासकीय सेवेमध्ये मागासवर्गीय आरक्षण पुढे चालु ठेवणे बाबत एक हायकोर्ट आणि सुप्रिमकोर्टाचा एक जजमेन्ट आहे. त्यासंबंधी मी आपल्याला बोलु इच्छितो की, मुळ कार्यालयाचे विभाजन केल्यानंतर मागासवर्गीयांचे अनुशेष नवीन कार्यालयामध्ये वर्ग करण्याबाबत मागासवर्गीयांची आरक्षित पदे पुर्वी मंजुरीने तात्पुरती बिगर आरक्षीत करून खुल्या प्रवर्गामध्ये भरण्याची सुधारित पद्धतीदेखील त्याबद्दल देखील सन्मा. सदस्य मिलन पाटील साहेबांनी काही सांगितलेले नाही काटकसरीने उपाययोजना म्हणून रिक्त पदे भरण्याची मागासवर्गीयांना वगळण्याबाबतदेखील शासनाचा जी. आर. आहे. त्या बद्दलदेखील सन्मा. सदस्य मिलन पाटील साहेब काहीच बोलत नाहीत. अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती विमुक्त जाती आणि भटक्या जाती जमाती बाबतच्या सेवा प्रवेशाचे बंधदेखील शिथिल करण्याबाबतदेखील शासनाचा जी. आर. आहे. त्याबद्दल देखील सेवा शर्ती काहीच बोलत नाही. याच्यावर बिहार राज्याचे एक जजमेन्ट आहे. त्याच्यावर सर्वोच्च न्यायालयाने दिलेली एक ॲथोरिटी आहे. त्याचा मी फक्त केसचा उल्लेख करीन. नंतर मी तुम्हाला या जजमेन्टची कॉपी देईन. श्री.डॉ. चक्रधर पासवान विरुध्द बिहार राज्य व इतर या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयीन दिलेल्या निवाड्या संदर्भात काही स्पष्टीकरण आहे. मी आपल्याला ती सगळी माहिती या सभागृहानंतर देईन. मागासवर्गीयाचे आरक्षण ठेवलेल्या पदाची १०० टक्के बिन्दु. मा. महापौर मॅडम हा विषय मोठ्या संस्थेने मागासवर्गीयांबाबतचा आहे. ह्याच्यामध्ये शासनाची काही माहिती आहे. ती सगळी डावलेली गेलेली आहे. शासकीय आणि निमशासकीय सोबत आरक्षीत पदांचा मागासवर्गीय सरळ सेवा भरतीत अनुशेष भरून काढण्यासाठी अनुशेषाची पदे १०० टक्के बिन्दु नामावली अनुसार मोजणे पदे भरण्याची जाहिरात देणे बाबत आपले सेवा शर्ती नियम काहीच बोलत नाही. शासकीय आणि निमशासकीय पदावर मागासवर्गीय भरती करण्याबाबत सरळ सेवा भरतीत अनुशेष भरून काढण्यासाठी बिगर मागासवर्गीयांना सेवामुक्त न करणे म्हणजे इकडच्या स्थानिक लोकांना सेवामुक्त न करणे संदर्भात देखील शासनाचा जी.आर. आहे. त्याच्या वर देखील आपला ठराव काहीच बोलत नाही. मा. महापौर मॅडम, सेवा भरतीसाठी जो सेवा प्रवेश नियम असावा म्हणजे सेवा भरतीची जी समिती नेमली जाते. त्या समितीमध्ये जाणूनबुजून ओ.बी.सी. आणि एस.बी.सी.ला. घेतलेले नाही. त्याचा देखील एक प्रतिनिधी त्या कमिटीवर असतो. त्यांना का डावलेले गेले. हे कदाचित सन्मा. सदस्य मिलन पाटील यांना माहिती नसेल ते स्वतः ओ.बी.सी. आहेत.

**महेंद्रसिंग चौहान :-**

अभी सन्मा. सदस्य रतन पाटीलने कहा था की तीन बरस हो गये इस तरह से लोग बात करते रहेंगे तो और दो साल चले जायेंगे। कमसे कम कर्मचारीयोंके लिए जो काम कर रहे है वह करने दिजिए।

**रतन पाटील :-**

मैने जो बोला वह सही बोला है। वह आपको इतना लग गया।

**महेंन्द्रसिंग चौहान :-**

इसलिऐ ऐसे लोगोंको बैठना चाहिऐ आप कमसे कम बोलने का लिमिट दिजिए।

**रतन पाटील :-**

यह तो आपकी मेहरबानी से तीन साल हो गये है। हम लोग बैठते तो तीन मिनिटने पास कर देते थे। मा. महापौर मॅडम, इतना टाईम नही लगाते है।

**महेंद्र सिंग चौहान :-**

बिहारका और यु.पी. के सेवा शर्ती का यहाँपर क्या मतलब है । बिहार का आदेश निकला है । उसका आपकी नगरपालिका को क्या लेना देना है । आपको बंबई का देखना है । भाईंदर का देखना है। मेरे कहने का तात्पर्य यह है की सेवा शर्ती के जो नियम है उसपर आप सुचना किजीए ।

**रोहित सुवर्णा :-**

मै सुचना ही कर रहा हुँ। इनको मालुम नही है। मा. महापौर मॅडम मी सुचना करीत होतो आता हे सुप्रिम कोर्टाबाबत बोलले काय ॲथोरिटी आहे. मी तुम्हाला त्याबाबत माहिती देतो. सन्मा. सदस्य मिलन पाटील साहेब स्वतः सुप्रिम कोर्टाच्या जजमेन्टमध्ये निवडून आले. माधुरी पाटील व्हर्सेस ट्रायबल डेव्हलपमेंट डिपार्टमेंटच्या ओदशावरुन स्वतः नगरसेवक झालेले आहेत.

**मिलन पाटील :-**

माझ्याकडे पक्की डॉक्युमेट होती. सुप्रिम कोर्टाची नाही तर माझ्या वडिलांची डॉक्युमेंट होती. मी निवडुण आलेलो आहे. तो शिक्का बसलेला आहे. मला जजमेन्टची आवश्यकता नव्हती.

**रोहिदास पाटील :-**

जात प्रमाण पडताळणी समितीची नेमणुक कधी झाली हे माधुरी पाटीलच्या केसच्या नंतरच हे मी या ठिकाणी सांगु इच्छितो.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेब, थोडेसे मला बोलायचे आहे. ह्या विषयावर एकुण चार ठराव आलेले आहेत. कर्मचाऱ्यांच्या हिताचा विषय सुरु असताना प्रत्येकाने ते अधिकाधिक चांगल्या पद्धतीने मला कशी भुमिका मांडता येईल अशा पद्धतीने ठराव मांडलेले आहेत.

**रोहित सुवर्णा :-**

मी सत्य बोलतो.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा, आपला अभ्यास सर्व क्षेत्रात उत्तम आहे. परंतु, आपणही सेवा भरती करतो म्हणजे नवीन कर्मचारी घेतो आणि त्याच्यासाठी असं असते की ह्या ज्या सेवा शर्ती आहेत. जे सेवक आहेत. आपण त्यांना जेवढे निकष आहे. रिझर्वेशनच्या बॅकलॉगचे ते सगळे लावुनच करीत असतो. त्याच्यामुळे ह्याच्यासाठी नवीन रिझर्वेशनची नोंदणी केली पाहिजे असे मला वाटत नाही. आज बनलेल्या सेवा शर्ती आहेत. उद्या आपल्याला असे वाटले की आपल्या कर्मचाऱ्यांना काहीतरी अन्यायकारक आहे किंवा ही गोष्ट केल्याने आपण त्यांना अधिक सक्षम बनवु शकतो. तर आपण त्या त्यावेळेला तशी सुचना करुन तसा विषय सभागृहासमोर आणु शकता. मला फक्त एवढेच सांगायचे आहे की आज सदनासमोर तो विषय आल्यानंतर दोन ठरावामध्ये मी फार मोठे साम्य पाहिले. भाजपाकडुन आलेला ठराव आहे. त्याच्यामध्ये स्वातंत्र्यसैनिकांच्या मुलांना नोकरी देण्याचा एक विषय होता. या विषयाव्यतिरिक्त बाकी सगळे मुद्दे आपले विषयपत्रिकेप्रमाणेच आहेत. कर्मचाऱ्यांचे हिताचे जे मुद्दे आहेत सदनामध्ये जो पहिला ठराव आला. त्याच्यानंतर दुसरा भाजपाचा आला त्याच्यावर माजी नगराध्यक्ष प्रफुल्ल पाटील साहेब, आपणही अतिशय अभ्यासपुर्ण हे विषय मांडला. परंतु, मी पुर्वीदेखील सांगितले की, कुठेतरी मतदानाच्या ह्याच्याप्रमाणे ह्या कर्मचाऱ्यांच्या सेवा शर्तींना पुन्हा एकदा सुरुंग लागेल सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांचा ५० टक्केचा ठराव आहे की ५० पदवीधर आणि ५० टक्के सेवा ज्येष्ठता अशा पद्धतीचा निकष लावलेला आहे. मी सर्वांना पुन्हा एकदा विनंती करतो की, आपण एकमताने ह्या सेवाशर्तींना पाठिंबा द्यावा. जर तसे होत असेल तर अधिक चांगल्या पद्धतीने ह्या कर्मचाऱ्यांसोबत, ह्या अधिकाऱ्यांसोबत आपण सक्षमतेने उभे राहिलो असे स्पष्ट चित्र होईल. तसे होत नसेल तर मा. सचिवांनी ठरावाचे वाचन करुन पुढील कार्यवाहीला सुरुवात करावी. परंतु, मी सर्वांना विनंती करतो की, जर आपण एक ठराव ठेवला काही सुचना केल्या तर त्याचे नक्कीच स्वागत होईल.

**रोहित सुवर्णा :-**

मॅडम, घंगाळेच्या प्रकरणात सुद्धा असेच झाले होते.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, सन्मा. सदस्य मिलन पाटील यांनी जो ठराव मांडला त्या ठरावामध्ये परिशिष्ट बनविलेले आहे. त्याच्यामध्ये वेतन श्रेणी निश्चित केलेली नाही हा पहिला मुद्दा आहे. आपण ती वेतनश्रेणी ठरवुन द्यायची आहे की, शासन ठरवुन देणार आहे. आपण तोही विचार करावा. कारण आपण ती वेतनश्रेणी ठरवुन द्यायचे आणि आपण निश्चित त्यांचा विचार करावा. तसेच आपल्या महापालिकेने प्रधान सचिवांना जे पत्र दिले, संदर्भ मा. प्रशसकीय ठराव क्र. ७१ दि. २९/४/२००४ हे पत्र दि. ११.०२.०५ चे आहे. आपण जेव्हा ७१ च्या प्रशासकीय ठरावानुसार पदे निर्माण केली. त्याच्यानंतर अजुन नविन पदे निर्माण केली. क्रिडा अधिकरी, कार्यालयीन अधिक्षक, वरिष्ठ सर्वेअर, वरिष्ठ स्वच्छता निरिक्षक, वसुली निरिक्षक, वरिष्ठ लिपिक, लघुलेखक (मराठी, इंग्लिश), तांत्रिक सहाय्यक आणि लिपिक, वाहन चालक, शिपाई आपण एवढी पदे निर्मिती करुन शासनाच्या मंजूरीला पाठविली. आपण त्याअगोदर महासभेत का आणली नाही. कारण महासभेचे सर्व अधिकारी असताना आपण ही पद निर्मिती करताना महासभेत का आणली नाही. हा माझा मुद्दा आहे. त्याचप्रमाणे मा. स्थायी समिती दि. ३.३.०५ रोजी आस्थापना विभागातील कामकाजाबाबत विचार विनिमय हा १५३ चा विषय होता. त्याचा ठराव क्र. १६६(अ) आपण ज्या तीन कर्मचाऱ्यांची महापालिकेत भरती केलेली आहे. त्या तीन कर्मचाऱ्यांना ते जेव्हा ठेका पद्धतीने महापालिकेत होते. ते ठेका पद्धतीने असताना पासुन त्यांना सेवेत रुजु करुन घेतलेले आहे. त्यांची त्यावेळी ठेका पद्धतीने नेमणुक झाली. तेव्हापासुन त्यांना सेवा ज्येष्ठता देण्यांत आलेली आहे. ते चुकीचे आहे. हा ठराव आहे. ती स्थायी समितीने घाईघाईने केलेला आहे. त्याच्यावर सुचक सन्मा. सदस्य मिलन पाटील आहेत व सन्मा. सदस्या रिटा शाह ह्या अनुमोदक आहेत. याबाबत जेव्हा त्यांना विचारणा केली. तेव्हा माझी सही नाही असे त्यांनी वक्तव्य केले. आता ह्या प्रकरणी हा ठराव घेऊन कोर्टात जाऊन आपल्या विरुद्ध महापालिकेच्या विरुद्ध हा ठराव रद्द करुन संबंधित कर्मचारी या केसमध्ये जिंकलेले आहेत. म्हणजे असे कर्मचारी आपला ठराव घेऊन आपल्या विरोधात, महापालिकेच्या विरोधात जर कोर्टात जाऊन अशी कारवाई करीत असेल तर योग्य आहे का? याचे मला निवेदन करावे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, सुचना आणि अनुमोदन दिलेले आहे. किती वेळ एक सभासद बोलणार?

**शशिकांत भोईर :-**

मी सेवा भरतीबद्दल बोलतो. सेवा भरती आहे. मी त्याच्याबद्दल बोलतो. याबाबत निवेदन करावे.

**मा. महापौर :-**

आपल्या सुचना समजलेल्या आहेत. आपण बसुन घ्या. सचिवजी आपण मतदान घ्या.

**मिलन पाटील :-**

ठराव लिहुन दिलेला आहे. मतदान घ्या. आपण सुचक पण असाल आणि दुसरा ठराव पण मांडाल व बोलालसुद्धा. तुमचे कोणते घ्यायचे?

**मा. महापौर :-**

सचिवजी ठराव मतदानाला घ्या.

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य पाटीलजी, मी. मा. महापौरांना उद्देशुन बोलतो. तुम्ही मला उद्देशुन बोलु नका. मा. महापौरांना बोला. तुम्ही माझ्याकडे बोट दाखवुन बोलु नका.

**मिलन पाटील :-**

मी मा. महापौरांना बोलतो.

**शशिकांत भोईर :-**

आम्हांलाही बोलता येते. माझाही मोठा आवाज आहे.

**मा. महापौर :-**

सचिवजी, ठराव मतदानाला घ्यावा. सगळ्यांना बोलण्याची संधी दिलेली आहे. दहा मिनिटापेक्षा जास्त वेळ दिलेला आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आता या भाषणामध्ये उल्लेख झाला की सन्मा. सदस्या रिटा शाह यांची खोटी सही आहे. तर त्याची शहानिशा करा. उद्या जर काही मोठे प्रकरण झाले तर सन्मा. सदस्या रिटा शाह स्वतः या सभागृहात उपस्थित नाहीत.

**शशिकांत भोईर :-**

मी ले दिलेले आहे, त्याच्यावर निवेदन होणार की नाही?

**मा. उपमहापौर :-**

तुमच्याकडे ठराव आहे. ठरावावर मतदान घ्या.

**शशिकांत भोईर :-**

महापालिकेची मंजुरी नसताना आपण पद निर्मितीसाठी शासनाकडे पाठविले ते योग्य आहे का? तुम्ही याच्याबद्दल खुलासा करावा. महापालिकेची संमती न घेता. तुम्ही ठराव कसा केला. तुम्ही अधिनियम बाजुला सारुन तुमचे नियम काढा. तुम्ही नियम बनवा.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांना विचारुन सांगा.

**जयंत पाटील :-**

मी एवढा वेळ बोललो नाही. कारण बऱ्याच लोकांनी एवढी अभ्यासपुर्ण माहिती दिल्यानंतर मला फक्त एक असा प्रश्न पडलेला आहे की, मा. आयुक्त साहेब मला वाटते की आपल्याला ह्या विषयावर सांगायला लागेल. माजी नगराध्यक्ष आणि सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी अतिशय चांगली माहिती दिली. त्यांनी असा एक प्रश्न टाकलेला आहे की, स्थायी समितीला सेवा शर्ती, अटी तयार करण्याचे अधिकार नाहीत. ह्याच्यामध्ये नक्की काय आहे? तरी अधिकार आहेत की नाहीत? याची मला माहिती नाही म्हणून विचारतो.

**मा. उपमहापौर :-**

आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

कुठल्या कलमाद्वारे.

**मा. उपमहापौर :-**

४६५ द्वारे

**प्रफुल्ल पाटील :-**

४६५ द्वारे विनिमय करण्याचे अधिकार आहेत. मा. उपमहापौर साहेब, तुम्ही विनिमय तयार केलेले आहेत. हे सेवा प्रवेश नियम आहेत. मा. आयुक्त साहेब, आपण कृपया या ठिकाणी स्पष्टीकरण करावे की विनिमय आणि नियम ह्याच्यामध्ये काय फरक आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, मी आता जे काही वक्तव्य बेले त्याबाबत आपण निवेदन करावे नाहीतर प्रशासनाला करायला लावावे की, आपण जे प्रस्ताव शासनाजवळ पद निर्मितीसाठी पाठविलेले आहेत ते योग्य आहे की अयोग्य आहेत. याबद्दल निवेदन करोव. त्याचप्रमाणे जे तीन कर्मचारी आहेत. आपल्या मिरा भाईंदर महानगरपलिकेच्या विरुद्ध कोर्टात जाऊन कोर्टामध्ये केस जिंकुन आलेले आहेत आणि घाईघाईने मा. स्थायी समितीने ठराव करुन दिलेला आहे. त्या ठरावाविरुद्ध गेलेले आहेत. ते योग्य आहेत का? ह्याच्याबद्दल खुलासा करावा. मा. महापौर साहेब आपल्याला जर उत्तर माहिती नसेल तर आपण शासनाच्यावतीने खुलासा करुन घ्यावा. मा. महापौर मॅडम, मी तुम्हाला निवेदन करायला सांगितले होते. जर तुम्हाला माहिती नसेल तर प्रशासनाला सांगा. मी जो प्रश्न विचारला आपण त्याच्यावर निवेदन करावे. मा. महापौर साहेब, मी आपल्याला निवेदन करायला सांगितले आहे. जर  आपल्याला माहिती नसेल तर प्रशासनातर्फे निवेदन करावे. माझे तीन प्रश्न आहेत. त्याच्यावर निवेदन करावे. ते तीन कर्मचारी आहेत त्यांना तात्पुरत्या सेवेत रुजु करुन घेतले त्यापासुन त्यांची सेवा ज्येष्ठता दिलेली आहे. ती योग्य आहे की अयोग्य आहे. त्यानंतर जो ठराव सन्मा. सदस्य मिलन पाटील यांनी मांडला त्याच्यामध्ये वेतन श्रेणी निश्चित केलेली नाही. ती शासन ठरवेल की आपण ठरवुन द्यायची आहे. आपण त्याचासुद्धा खुलासा करावा. जो प्रशासकीय ठराव ७१ त्याच्यानुसार आपण पदनिर्मिती करण्यासाठी शासनाची मंजुरीसाठी दिलेले आहे. त्याचा महापालिकेला अधिकार असताना महापालिकेने पुर्वमंजुरी न घेता तो ठराव पाठविलेला आहे. तो योग्य आहे की अयोग्य आहे. आता प्रशासनाने म्हणजे मा. आयुक्तसाहेबांनी खुलासा करावा. आज जो विषय सेवा भरती नियमांचा आहे. त्याला अनुसरुन हा ठराव आहे. ह्याच्यामध्ये सेवा ज्येष्ठता आहे.

**मा. महापौर :-**

आता फक्त सेवा शर्ती नियमांचा विषय आहे. आपल्या दुरुस्त्या नोंदवा. आपल्याला काय दुरुस्ती अपेक्षित आहेत.

**शशिकांत भोईर :-**

ह्याच्यामध्ये सेवा ज्येष्ठता आहे. आता जे तीन कर्मचारी भरलेले आहत. ते योग्य आहेत की अयोग्य आहेत. तुम्ही सेवा ज्येष्ठता बघणार की जे तात्पुरत्या स्वरुपात होते, तेव्हापासुन घेणार की, जेव्हा कार्यरत झाले. तेव्हापासुन घेणार. प्रशासनाने ह्याचा खुलासा करावा. मा. आयुक्त साहेब, आपण याच्याबद्दल खुलासा करावा. आपल्याजवळ विधी सल्लागार आहेत. त्यांना बोलवा की, आपण फक्त विधींना निधी देतो आणि गप्प बसतो. नाहीतर त्यांना ही पाठवा. त्यांना सल्ला द्यायचा नसेल, सभागृहातील विषय हा सभागृहातच झाला पाहिजे. प्रश्न समजला नसेल तर मी तुम्हाला पुन्हा सांगतो. स्थायी समिती दि. ३.३.०५ रोजी प्रकरण क्र. १५३ आस्थापना विभागातील कामकाजाबाबत विचार विनिमय करणे. ठराव क्र. १६६ (अ) या ठरावात जे तीन कर्मचारी आहेत. मे तात्पुरत्या स्वरुपात नगरपालिकेमध्ये, महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झाले होते त्यांना आपण नंतर मंजूरी दिली, कायम स्वरुपी म्हणून त्यांची सेवा ज्येष्ठता ही त्यांची तात्पुरती जेव्हा नेमणुक केल्यापासुन पकडतात ते योग्य आहे की अयोग्य आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

मी तुम्हाला सविस्तर माहिती घेऊन सांगतो.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, दुसरा एक प्रश्न असा आहे की, आपण प्रधान सचिवांना एक पत्र दिलेले होते. दि. ११.२.०५ रोजीचे

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

हे जे तुमचे प्रश्न आहेत, ह्याच्यबद्दलची डिटेल फाईल बघून तुम्हाला ताबडतोब सांगतो. कारण ते सगळं पाठ नसतात ह्याची डिटेल नंतर सांगतो कारण जर तारीख वगैरे सांगण्यात जर चुक झाली तर.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, ठराव १६६(अ) बद्दल कोर्टामध्ये केस चाललेली होती. ते समोरचे केस जिंकले आहेत, कोर्टाचा निकाल आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

ह्याच्याबद्दलची संपुर्ण माहिती महानगरपालिकेच्या प्रशासनाकडे आहे. एक थोडावेळ द्या. मी डिटेल माहिती देतो.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, तुम्हाला महासभेत माहिती द्यावी लागेल.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

महासभेतच माहिती देतो.

**शशिकांत भोईर :-**

तिन्ही प्रश्नांची ना?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

होय.

**प्र. सचिव :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, प्रकरण क्र. २७ करीता एकुण चार ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक सन्मा. सदस्य मिलन पाटील आणि अनुमोदक सन्मा. सदस्य सुरेखा गायकवाड दुसरा ठराव सुचक सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील आणि अनुमोदक सन्मा. सदस्य शशिकांत भोईर तिसरा ठराव सुचक सन्मा. सदस्य रोहिदास शंकर पाटील आणि अनुमोदक सन्मा. सदस्य गजानन भोईर चौथा ठराव सुचक - मिलन म्हात्रे आणि अनुमोदक नयना ग. म्हात्रे. एकूण चार ठराव आलेले आहेत आणि नियमानुसार शेवटचा ठराव प्रथम मतदानाला टाकायचा आहे. एकुण चार ठराव आलेले आहेत. मतदानाची प्रक्रिया सुरु होत आहे. सर्व सन्मा. सदस्यांना विनंती आहे की, कोणीही सभागृह सोडू नये.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, आम्ही दिलेला ठराव म्हणुन आताच्या घटकेला तो काऊन्ट करण्याची गरज नाही. आम्ही जी पुरक सुचना दिलेली आहे. त्याच्यामध्ये जे ठराव होईल. जर महापालिका कर्मचाऱ्यांच्या मुलांची शैक्षणिक पात्रता असेल जसे डिप्लोमा, डिग्री आहे. त्याला प्राधान्य मिळावे असा एक मांडलेला आहे. स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांना नोकरीत प्राधान्य राहावे. असे दिलेले आहे. तो आमचा ठराव मतदानाला टाकण्याची काही गरज नाही. आमची दुरुस्ती आहे. जर दोन्ही ठराव पडले तरी ती दुरुस्ती होणे गरजेचे आहे.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, जरी सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांच्या ज्या काही सुचना असतील त्या दुरुस्ती म्हणुन आपल्या ठरावात घ्याव्यात. ठराव करताना दुरुस्त्या घेण्यात याव्यात. अशा पद्धतीचा ठराव आम्ही मांडलेला आहे. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांच्या ज्या दुरुस्त्या आहे. आपण त्या दुरुस्त्या घ्याव्यात.

**प्र. सचिव :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांचा ठराव दुरुस्ती म्हणुन घेतलेला आहे. आता तीन ठराव झालेले आहेत. तिसरा ठराव सुचक सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे आहेत. अनुमोदक नयना म्हात्रे यांचा ठराव मतदानाला घेत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आमचा ठराव सुद्धा दुरुस्ती म्हणुन ॲड करुन घ्यावा. जो ठराव मंजुर होईल. त्या ठरावामध्ये, येणार ना.

**प्र. सचिव :-**

होय. आता दोन ठराव राहिलेले आहेत. पहिल्या ठरावाचे सुचक सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे आणि अनुमोदन सन्मा. सदस्या सुरेखा गायकवाड आहेत. दुसऱ्या ठरावाचे सुचक सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील आणि अनुमोदन सन्मा. सदस्य शशिकांत भोईर आहेत. मी नियमानुसार दुसरा ठराव मताला टाकतो.

**रोहिदास पाटील :-**

तो ठराव हा ठराव रद्द करुन ........

**रतन पाटील :-**

सुचना, अटीशर्ती एकत्रित मंजुर करुन दोन्ही ठराव एकत्र करा. कारण सगळेजण कर्मचाऱ्यांचे हित बघत आहेत.

**रोहिदास पाटील :-**

असे प्रयत्न का करीत नाही? मी हा विषय चेष्टेवर नेत नाही. तांत्रिकदृष्ट्या जिथे कायदेशीर बाबींचा अभ्यास असेल. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी ठराव मांडलेला आहे. त्यांनी त्यांचे निवेदन कायदेशीर केले असे नाही. आमचे मत मांडलेले आहे. जर त्यांच्यावतीने कोणी निवेदन केले असेल. तर सन्मा. सदस्य मिलन पाटील यांनी ते वाचुन दाखविलेले आहे. ज्यांना त्याच्यामधले समजते त्यांनी पाच मिनिटे बसा. वीस वर्षे नोकरी केलेल्या कर्मचाऱ्यांच्या हिताचा विषय आहे. हा पक्ष दृष्टिकोनातुन आम्ही त्याला कोणतेही महत्त्व देत नाही.

**मोहन पाटील :-**

आम्ही आवश्यक त्या दुरुस्त्या घेत आहोत.

**रोहिदास पाटील :-**

मग त्यांनी दिलेल्या सुचना घ्या ना.

**गजानन भोईर :-**

त्यांनी दिलेल्या सुचना स्विकारा.

**मिलन पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी आपल्या सुचना द्याव्यात. त्या आम्ही स्विकारतोय ना.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, दोन ठराव राहिलेले आहेत. त्याच्यापैकी सेवाप्रवेश नियमांना मंजूरी देणे स्थायी समितीने शिफारस केलेले प्रकरण अशा पद्धतीचा एक ठराव होता. या ठरावाला सन्मा. सदस्य मिलन पाटील यांनी ठराव मांडला होता. सन्मा. सदस्या सुरेखा गायकवाड यांनी त्याला अनुमोदन दिलेले होते. दुसरा ठराव सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी मांडलेला आहे. सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेबांनी अनुमोदन दिलेले आहे. या दोन ठरावामध्ये एक गोष्ट नक्की आहे की, सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी जी नवीन सुचना केलेली होती की, त्याच्यामध्ये जो नवीन पदाचा उल्लेख केलेला होता. पैकी परिवहन समितीमध्ये आणि इतर ह्याच्यासाठी त्यांनी सुचना केलेल्या होत्या. जर आपल्याकडुन तसे सहकार्य होत असेल तर काही सुचना आपल्याही स्विकारल्या जातील. परंतु, मी ही गोष्ट तिसऱ्यांदा बोलत आहे. सर्वांनी एकमताने कर्मचाऱ्यांच्या हितामध्ये करुन ह्याच्यामध्ये कोणाला काही पार्टीचे नाही. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, आपण उल्लेख केलेला आहे की, कर्मचाऱ्यांच्या हिताचा विषय चर्चेत आहे आणि सगळ्यांनी सांगोपांग चर्चा केलली आहे.

**रोहिदास पाटील :-**

एकमताचा ठराव होणे गरजेचे आहे.

**मा. उपमहापौर :-**

त्याच्यामध्ये एकमताने ठराव केला तर आपल्या सुचना असतील याला सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब पुरक सुचना असतील तर आपण त्या कराव्यात.

**रोहिदास पाटील :-**

मघाशी चर्चा करतेवेळी सचिवांना विचारले गेले की हा आणलेला ठराव पदनिर्मितीचा आहे. पदोन्नतीचा नाही. पद निर्मिती आणि पदोन्नती असा जो शब्दांचा खेळ आहे. त्या खेळामधुन कुठेतरी जास्त कमी वय शैक्षणिक पात्रता आहे. ५-१० मिनिटे जाऊ द्या. आपण एवढ्या कर्मचाऱ्यांसाठी एक तास गेला तर काही फरक होणार नाही. आमचे स्पष्ट मत आहे की त्यांचे भले करण्यासाठी म्हणतो आपण आपल्याच माणसांचे भले करतो. त्याच्यासाठी अर्धा तास गेला तरी काहीही फरक पडत नाही. आमच्या समोर बसायचे नसेल तर बाजुला जाऊन बसा. परंतु, जे चांगले आहे. आम्ही त्याला होय म्हणु.

**प्रभात पाटील :-**

मी सभागृहाच्यावतीने म्हणणार नाही. मी सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांना एक पर्सनल विनंती राहील की आपण ह्या विषयातील तज्ञ आहात. आपण काही सुचना मांडल्या. त्या अतिशय चांगल्या होतील. सगळ्यांचा एकच हेतु आहे की इथे कर्मचाऱ्यांचे भले व्हावे. त्यांचा काहीतरी फायदा व्हावा. आपली सुचना रास्त आहे. परंतु, त्या सुचना एका ठरावामध्ये अंर्तभाव केला तर कदाचित मतदानाचा विषय मागे पडेल. आणि एका फेरीमध्ये सगळ्यांचे काम होऊन जाईल. आपण या विषयातील अतिशय जाणकार आहात. कृपया, मोठ्या मनाने सहकार्य करावे. अशी मी माझ्यावतीने एक विनंती करते आणि सभागृहानेसुद्धा तशी विनंती केली तर मला वाटते की, सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब मोठ्या मनाचे आहेत. ती निश्चितपणे मानतील.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, सेवाजेष्ठतेच्या नियमावरती बरीचशी सांगोपांग चर्चा झालेली आहे. सन्मा. उपमहापौर साहेबांनी जवळ जवळ तीन वेळा विनंती केलेली आहे. जेष्ठ सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब यांनासुध्दा विनंती केलेली आहे. पुन्हा एकदा सभागृहाच्यावतीने मी आपणाला विनंती करतो की, सभा पाचऱ्दहा मिनिटाकरीता तहकूब करा. त्यांच्यांशी चर्चा करा आणि ह्याच्यावर तुम्ही निर्णय घ्या.

**प्रफुल्ल पाटील :-**

परत सांगेन, तुम्हाला पटले तर घ्या. ४६५ खाली स्थायी समितीला फक्त विनियम करण्यांचे अधिकार आहेत. साहेब, आपल्यालासुद्धा माहिती आहे. तुम्ही जो ठराव केलेला आहे. तो विनियमाचा केलेला आहे. आम्हाला तुमचा जो गोषवारा मा. आयुक्त साहेबांनी दिलेला आहे. तो गोषवारासुद्धा विनियम दिलेला आहे. विनिमय म्हणजे काय? परीक्षा कशा घ्याव्यात, किती मार्काचे पेपर असावेत. हे विनियम झाले. तुमची सेवा प्रवेश नियमांचा ठराव नाही. तुमचा विषय सेवा प्रवेश नियमांचा आहे. तुम्ही कंसामध्ये स्थायी समितीने

शिफारस केलेले नियम असे लिहिलेले आहे. परंतु, प्रत्यक्षात तुमचे नियम काय सांगतात. विनियम तुम्ही ठरावसुद्धा तसाच मांडलेला आहे की अधिसुचना काढावी, हरकती, सुचना मागवाव्यात आणि त्याची वाट न पाहता मंजुरी करावी तर आपण कलम ४६५ खाली बघा, स्थायी समितीने केलेल्या विनियमांना तुम्हाला डायरेक्ट मंजुरी देता येत नाही. ती शासनाने पाठवावी लागेल. शासन त्याला प्रसिद्ध करील. सजेशन, ऑब्जेक्शन मागवेल. त्याच्यानंतर शासन त्याला मंजुरी देईल. तोपर्यंत तुम्ही आमच्या कर्मचाऱ्यांना तसेच ठेवणार आहात का? विनिमय करण्यालासुद्धा, मर्यादा असतात. सगळ्या देशामध्ये सगळ्यात मोठी कायद्याची संघटना म्हणजे घटना. या देशाची घटना सगळ्यात मोठी. त्याच्यानंतर आपण त्याला धरुन आपण नियम, अधिनियम बनवतो. अधिनियमाला आधारुन नियम बनवतो. नियमाला आधारुन विनियम बनवितो. तेव्हा विनियम बनविण्याचे अधिकार स्थायी समितीला आहेत. त्यांनी जरी नियम बनविले असे आपण गृहित धरले तरीसुद्धा ४६५ खाली केलेल्या विनियमांना मंजुरी घेण्यामध्ये तुमचे तीन-चार महिने जातील. त्याच्यावर ते शासनाच्या हातामध्ये जाईल. म्हणुन त्याच्यामध्ये असे घ्या की, तुम्ही केलेले विनियम मंजुर. आम्ही दिलेले सेवाप्रवेश नियम तेही मंजुर करा. आता तुमचा, आमचा लाभ कुठे असेल तर तुम्हाला जर कोणाला शिथिलता द्यायची असेल तर येऊन टाका. आम्हाला त्याच्याबद्दल काहीही वाद नाही. सन्मा. सदस्य मिलन पाटील यांचे अनेक दोस्त असतील. त्यांनी कोणाला शब्द दिलेला असेल तर काही हरकत नाही. मी मोठ्या मनाने सांगतो. मला या ठरावाला अट्टाहास करण्याचे काय कारण आहे? तर मी ह्याच्यामध्ये एवढ्या तांत्रिक आणि कायदेशीर बाबी सांगितल्या ज्याच्यामध्ये तुमच्या मनात जर चांगले आहे. परंतु, तुम्ही ते जर करु शकत नसाल तर कृपा करुन तुमचे विनियम आणि आमचे सेवाप्रवेश नियम दोन्ही मंजुर करा आणि त्यांनी त्या त्या शिथिल करायच्या अटीशर्ती सुचविलेल्या आहेत. त्याच्यावर चर्चा करण्यासाठी एकत्र साहेबांबरोबर बसा. कारण एक महत्त्वाचा निर्णय आहे की, आम्ही एखाद्या पदोन्नतीला ५० टक्केपेक्षा जर जास्त श्रेय दिले तर आम्हाला प्रॉब्लेम आहे. आम्ही ५० टक्केपेक्षा जास्त पदे पदोन्नतीने ठेवू शकत नाही. मॅक्झिमम ५०-५० टक्केची सरळ सेवेतुन ५० टक्के आणि डायरेक्ट पदोन्नतीतुन ५० टक्के. आम्ही काही ठिकाणी परसेन्टेज वाढविलेले आहेत. ज्या ठिकाणी शैक्षणिक पात्रता शिथिल करु शकतात. त्या पॉवर्स महासभेच्या आहेत. स्थायी समितीच्या सुद्धा आहे आणि सगळ्यात मोठी चुक तुम्ही काय केले. तुम्ही स्थायी समितीमध्ये वेतनश्रेणी लिहिलेली नाही. तुम्ही जो आकृतीबंध दिलेला आहे त्याच्यामध्ये कर्मचाऱ्यांच्या, अधिकारांच्या वेतनश्रेणी दिलेल्या नाही. तुम्ही जर त्याच्यामध्ये आमचा ठराव मतदानाला टाकला तर तुमचा ठराव १०० टक्के पास होणार. परंतु, त्याचा फायदा कुठल्याही कर्मचाऱ्याला मिळणार नाही एवढे मी तुम्हाला स्पष्ट सांगतो. ह्याच्यावर निर्णय घ्या. तुमचे विनियम आणि आमचे सेवाप्रवेश नियम दोन्ही मान्य करा. आणि तुम्ही ज्या सेवाशर्ती बदलल्या आहेत. ह्या तुमच्याप्रमाणे करा.

**मा. उपमहापौर :-**

काही चर्चा केल्यानंतर सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब आपण जे ठराव सुचविलेले आहेत. स्थायी समितीने ज्या सेवा शर्ती आपल्याकडे शिफारस केलेल्या आहेत. बरीच चर्चा झाली. परंतु, आपण काही ठिकाणी क्वॉलिफिकेशनचा उल्लेख करता कलम ४५७ चा आणि ४६५ चा आपण त्याच्यामध्ये दोघांचे एकत्रित करुन केले एकत्रितरित्या केले तर, आपल्याला त्याच्यामध्ये काही ठिकाणी माघार घ्यावी लागेल. मी तर म्हणतो की, पहिला ठराव जो सभागृहासमोर आला तो ठराव प्रमुख मानुन नंतर सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेबांचा ठराव होता. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांचा एक ठराव होता. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब आपला एक ठराव आहे. ह्यांनी जसे सांगितले की आमच्या उपसुचना म्हणुन घ्याव्या आणि त्याच्यामध्ये समाविष्ट कराव्यात. आपल्या तशा सुचना त्याच्यामध्ये समाविष्ट करुन जर आपण तो ठराव केला तर अधिक चांगले राहिल. कृपया आपण आपल्या सुचनांचा आदर करुन. जर आपण दोन्ही ठराव घेतले किंवा एक ठराव घेतला तर आपल्याला तसे करता येईल. ज्या आवश्यक बाबी आहेत. आपण सुचना केलेल्या आहेत. आपण त्या एकत्रितरित्या केल्या. आपण चारही ठराव एकत्र पाठवु. आपण एक ठराव पारित करुन आपल्या तीन ठरावाचे उपसुचना म्हणुन ठराव पाठवु. मा. आयुक्तसाहेबांनी त्याबाबत महिनाभरामध्ये योग्य ती कार्यवाही करुन आपल्याला ती दाखविता येईल. आपण त्याप्रमाणे पुढे प्रोसेसमध्ये घेऊ या. अशी मी आपल्याला विनंती करतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

चारही ठराव मंजुर केलेले आहेत का?

**मा. उपमहापौर :-**

चारही ठराव मंजुर नाहीत. एक ठराव मंजुर आपली उपसुचना म्हणुन हा ठराव घेत आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

सेवाप्रवेश आणि विनियम, सेवाप्रवेश नियम हे मोठे आहेत. विनियम हे छोटे आहेत. विनियमाला सेवाप्रवेश नियम जोडता येणार नाही. सेवाप्रवेश नियमांना विनियम जोडता येतील. म्हणुन तुम्ही एक वेळा आमच्या नियमांना तुमचे विनियम जोडा. त्यांनी ज्या अटीशर्ती सांगितल्या म्हणजे ह्यांच्या मनासारख्या पाहिजे.

त्या शिथिल करा. मला त्याच्याशी काहीही नाही. म्हणजे त्यांचा मुळ हेतु कुठे आहे. ज्या अटीशर्ती शिथिल केल्या. त्याच्यामध्ये त्यांचा हेतु आहे.

**रतन पाटील :-**

दोघांचा ठराव घ्या. त्यांनी सांगितलेल्या, शिथिल केलेल्या अटीशर्ती घ्या.

**प्रफुल्ल पाटील :-**

दोघांचे ठराव घ्या. त्यांचा विनियमाचा ठराव घ्या आणि आमचा सेवा प्रवेशाचा ठराव घ्या.

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की, सर्व सन्मा. सदस्य या विषयावर दोन ठराव बाकी राहिलेले होते. महापालिका कर्मचारी, अधिकारी यांचे सेवाशर्ती, सेवा नियम बनविताना दोन ठराव आलेले होते. एक ठराव सन्मा. सदस्य मिलन पाटील साहेब यांच्याकडुन आलेला होता. त्याला सन्मा. सदस्या सुरेखा गायकवाड यांनी अनुमोदन दिलेले होते. दुसरा ठराव सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब यांच्याकडुन आलेला होता. त्याला सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी अनुमोदन दिलेले होते. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांनी सांगितले की, सेवाशर्ती ह्या आपल्या आहेत. विनियम आपण केलेले आहे. माझा ठराव सेवाशर्तीचा आहे. मी त्यांना पुन्हा एकदा तिथे विनंती करुन आलो. त्यांनी सांगितले की, जर तो ठराव क्लबिंग होत असेल तर अधिक चांगले राहिल. सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब, मी आपल्याला विनंती केली. आपला जो ठराव आहे. पहिल्या ठरावाला असु द्या. आपल्या सभागृहात एवढ्या सन्मा. सदस्यांनी सुचना केल्या त्या साहजिकच आहेत. सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा यांच्या ओ.बी.सी.च्या बाबत ज्या सुचना होत्या. त्याचा समावेश करुन घेतल्या जातील. ह्यांच्यातून आजपर्यंत कर्मचा-यांनी जे कामकाज केलेले आहे. त्याला न्याय मिळावा आणि त्यांच्या कामाचा कुठेतरी गौरव व्हावा कार्याचा गौरव व्हावा. त्यांना वरिष्ठ श्रेणी लागावी, त्यांना त्या योंग्यतेचे पद मिळावे यासाठी एवढा सगळा खटाटोप. आपल्याला विनंती करतो की, आपण जर हा ठराव क्लबिंगसाठी मुळ ठरावाला आपला जो ठराव आला आहे तो समाविष्ट करायला परवानगी दिली तर हा सगळा विषय अगदी हसतखेळत एकमताने झाल्यासारखा होईल.

**प्रफुल्ल पाटील :-**

अधिकाऱ्यांना जी पदोन्नती द्यायची आहे, त्याच्यासाठी प्रामुख्याने मुळ सेवाप्रवेश नियमांची गरज आहे. आणि त्याच्यानंतर विनियमाची गरज आहे. आता विनियम तुम्ही आणले, सेवाप्रवेश मी आणले. कर्मचाऱ्याच्या शैक्षणिक अर्हताबाबत आपण ज्या काही शिथिलता दिली असतील त्याबद्दल माझा काही वाद नाही. तेव्हा त्या ज्या शिथिलता ज्या आहेत अर्हताकारी, शैक्षणिक पात्रता त्याबाबत माझे काही वाद नाही. ते आपण क्लब करावे आणि दोन्ही ठराव सेवाप्रवेश नियम तयार झाल्याचा ठराव ठेवा आणि एक विनियम तयार झाला ठराव ठेवा. सेवाप्रवेश नियमाप्रमाणे त्यांना पद्दोन्नती देता येईल आणि विनियम पुढे तुम्हाला शासनाच्या मंजुरीसाठी किंवा ज्या अधिसुचना आहेत. त्या काढण्यासाठी कामाला येतील. माझा कुठलाही इगा ठेवत नाही पण कर्मचाऱ्यांचे नुकसान होऊ नये. आपण जर नुसते विनियम केले तर कर्मचाऱ्यांना सेवाप्रवेश नियमाच्या अभावी पद्दोन्नती देता येणार नाही. विनिमय जेव्हा मंजुर होतील त्याच्यानंतर ते येतील तुम्ही सेवा प्रवेश नियम पुन्हा पुढच्या सभेला आणाल तेव्हा ते लागू होतील. आज तुम्ही सेवाप्रवेश नियम आमचे आणि तुमचे विनियम गेले तर तुम्ही ताबडतोब पदोन्नतीच्या बाबत निर्णय घेऊ शकाल. अर्थातच आपण लगेच पदोन्नती देऊ शकणार नाही. आयुक्तांची कमिटी आहे. निवड समिती आहे त्यानांच ते अधिकार आहेत. तेच निर्णय घेतील जरी आम्ही चुकीचा काही ठराव केला असेल दोघांनी समजा, मी काही कर्मचाऱ्यांच्या फायद्यासाठी केला असेल आणि मिलन पाटलांना काही दोन-चार लोक भेटले म्हणून त्यांनी त्याच्यासाठी केला असे जरी आपण ठरवले तरी मुळ आयुक्त साहेब व त्याच्या निवड समितीला जे अधिकार आहेत पदोन्नतीबाबत आणि नामनिर्देशनबाबत त्याप्रमाणे ते ठराव करणार आहेत, म्हणुन आमचे सेवाप्रवेश नियम घ्या आणि आपण जे सेवाशर्ती शिथिल करणेबाबत, शैक्षणिक पात्रतेच्या अटी शिथिल करणेबाबत जे आपण डिसीजन घेतले आहे ते त्याच्यांत लागू करा. आम्हाला त्याबाबत कुठलाही वाद नाही.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेब, आपले सर्व कर्मचारी आपल्याकडून न्यायाच्या प्रतिक्षेत आहेत. ते वाट बघतात की कधी लवकर निर्णय होतो आणि एकदाचा आम्ही निःश्वास टाकतो तर माझी आपणांस विनंती आहे की, तातडीने निर्णय घ्यायचा आहे ते पटकन घ्या कारण आता लवकरात लवकर सोक्षमोक्ष लावून टाका आणि ज्यांना आपण पदोन्नती देणार त्या सर्वांना पुर्वलक्षी प्रभावाने पदोन्नती द्यावी अशी माझी सुचना त्यामध्ये नमुद करुन घ्या.

**प्र. सचिव :**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतोय की, प्रकरण क्र. २७ करिता अजूनही दोन ठराव आहेत. दोन ठराव आल्यामुळे नियमानुसार पहिला सुचक ठराव मिलन पाटील व अनुमोदक सुरेखा गायकवाड आहेत. दुसरा ठराव प्रफुल्ल पाटील सुचक व अनुमोदक शशिकांत भोईर आहेत असे दोन ठराव राहिले आहेत.

निर्णयाकरिता मा. महापौरांच्या परवानगीने मतदान घेण्याची सुचना केलेली आहे. नियमानुसार दुसरा ठराव प्रथम मी मतदानास टाकत आहे.

**प्रफुल्ल पाटील** :-

सचिव साहेब, पहिल्यांदा ठराव वाचुन दाखववा. लागतो.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २७ चा जो ठराव सुचक सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील व अनुमोदक सन्मा. शशिकांत भोईर ह्यांनी मांडला त्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**शशिकांत भोईर** :-

सचिव साहेब, आपणांस मिरा भाईंदर महानगरपालिका सेवाप्रवेश नियम २००५ ह्यांचे बुकलेट दिलेले आहे. ह्याच्यात प्रारुप नियम बनवले आहे. त्याची वाटणी करा आणि त्याच्यात जी पदे दाखविली आहेत ती सरळसेवेने किती त्याचे ही वाचन करा. पुर्ण वाचु नका. फक्त पद कोणते, पदोन्नतीने आहे का सरळसेवेत किती आहे ते वाचा.

**लिओ कोलोसो (मा. सभागृह नेते सो.) :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतोय, आता ठराव उपसुचना वाचायला घेतली आहे. ती उपसुचना पुर्णपणे वाचायला पाहीजे.

**शशिकांत भोईर** :-

साहेब आम्ही ठराव आणला आहे. ती उपसुचना नाही.

**प्रफुल्ल पाटील** :-

सन्मा. सदस्य मिलन पाटील मघाशी बोलत होते तेव्हा तुम्ही बोलतात नाही. आमचे का एवढं हे आहे का? आम्ही जाऊ का सभागृह सोडून,तर जातो.

**महेंद्रसिंग चौहान** :-

ठराव दिया है, बार बार पढने मे क्या मतलब ?

**शशिकांत भोईर** :-

जी पद आहेत ती सरळ सेवेने भरायची की, पदोन्नतीने भरायची आहेत आणि पदोन्नतीने किती पद आहेत ती आपण वाचा.

**आसिफ शेख :-**

ठिक आहे, मा. महापौर साहेब संपुर्ण वाचुन घेऊ द्या.

**महेंद्रसिंग चौहान** :-

सचिवजी जो ठराव मे दिया है वही पढीए। यह क्यु पढ रहे हो? ठराव में जो लिखके दिया है वही पढीए।

**शशिकांत भोईर** :-

ठरावाच्या जोडीलाच बुकलेट दिले आहे.

**प्रफुल्ल पाटील** :-

आम्ही बुकलेट नंतर दिलेले नाही. ठरावाच्या जोडीलाच बुकलेट दिले आहे.

**शशिकांत भोईर :-**

ह्या बुकलेटमध्ये कोणती पदे आहेत व सरळ सेवेने किती पदे भरायची आहेत त्याची माहिती दिली आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

यह बुकलेट पढनेकी जरुरत क्या है?

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही जेव्हा वाचून दाखवले तेव्हा चालले का?

**महेंद्रसिंग चौहाण :-**

यह बुक सब के पास है?

**रोहित सुवर्णा :-**

नही है। सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहाणजी वह सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटीलजीने बनाके दिया हुआ है। वह हमारे पास नही है।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

ठिक है, मगर बुक सबके पास है। आपण उस तरहका ठराव दिजीए।

**रोहित सुवर्णा :-**

तो फिर सन्मा. सदस्य मिलन पाटीलजी क्या कर रहे थे, दुरुस्ती-दुरुस्ती।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

उनसे डबल पढवाया है।

**शशिकांत भोईर :-**

सचिव साहेब, आपण कृपया जे बुकलेट दिले आहे त्याचे वाचन करावे. आपण नियमाप्रमाणे काम करा.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईरजी आपला अभ्यास आणि कर्मचाऱ्यांबद्दल प्रेम याबाबत आम्हांला खुप माहिती आहे. हे सगळं जर ठरावाने मतदानाने पास झाले तर आपण ह्याच्या सर्वांनी प्रत देऊ. एवढे वाचण्यासाठी इथले सदस्य तयार आहेत का?

**महेंद्रसिंग चौहाण :-**

असे कशाला करता?

**शशिकांत भोईर :-**

आम्ही जे दिले आहे ते आपल्याला मंजुर आहे का? ते वाचायचे नाही, तर तुम्हाला ते मान्य आहे का?

**मा. उपमहापौर :-**

हे बरोबर नाही. आपण अशाप्रकारे कशाला वेठीस धरता? आणि वेठीस धरायचे कारण नाही. जेव्हा सदस्य सांगत आहे आणि तुम्ही जे लिहिले आहे ते सर्व योग्य असेल. पण मतदान होऊ दे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मघाशी सन्मा. सदस्य मिलन पाटील हे वाचत होते. आम्ही सांगत होतो हे वाचण्याची गरज नाही. आपण एवढंच सांगा की, पान क्र. १ ते इथपर्यंत आम्ही दुरुस्त्या दिलेल्या आहेत.

**मा. उपमहापौर :-**

एवढं सदस्यांना वेठीस धरतील असे वाटले नव्हते ना!

**प्रफुल्ल पाटील :-**

आम्ही असे सांगत नाही की, तुम्ही जे दिले आहे ते वाचा. उद्या आपण सांगाल की ठराव बरोबर प्रस्ताव कुठे दिला. म्हणून पान क्र. १ पासून अमुक पर्यंत मिळाले म्हणून द्या.

**मा. उपमहापौर :-**

तुमच्या आमच्या विषयामध्ये एकमत व्हावे. सुवर्णमध्य साधला जावा म्हणून आतापर्यंत आपण सगळे प्रयास केले. होत नाही. आम्हाला मान्य आहे तुम्ही दिले पण ते मतदानाला घ्या असा अट्टाहास आहे तर घेतो. पण ते वाचले पाहिजे आणि सर्व सदस्यांनी ऐकले पाहिजे असे काय करु नका.

**प्रफुल्ल पाटील :-**

कुठलाही ठराव हा वाचायचा असतो. नंतर मतदान घ्यायचे असते.

**मा. उपमहापौर :-**

ठराव वाचला आणि एवढे नको वाचायला. पाटील साहेब, हे बरोबर वाटत नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

मी तसा हट्ट धरीत नाही. तुमचा वेळ ही घालवत नाही. ,

**मा. उपमहापौर :-**

हट्ट नको, मध्य नको. मतदानाला सुरुवात होऊ दे.

**प्रफुल्ल पाटील :-**

हट्ट धरत नाही. पण तुम्ही मान्य करा की, पान क्रमांक अमुक अमुक ते अमुक पर्यंत हे त्यांनी आम्हांला नियम दिले आहेत.

**मा. उपमहापौर :-**

असा उल्लेख करा की, सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटीलली व सन्मा. सदस्य शशिकांत भोईरजी ह्यांनी जो ठराव मांडला आहे तो अमुक पानापासून अमुक पानापर्यंत आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

क्रमांक १ ते १६७ या पदनामाच्या शैक्षणिक अर्हता, सेवाभरती पद्धती, नेमणुक पद्धती निर्देश करणारे किंवा दाखवणारे परिशिष्ट तुम्हांला प्राप्त झाले असे तुम्ही ह्या ठिकाणी सांगा. मग उद्या सभागृहातील सदस्य बोलतील. आपण ठराव दिला पण परिशिष्ट कुठे दिले? परिशिष्ट मघाशी त्यांनी वाचून दाखवले तेव्हा काही वेळ गेला नव्हता, आम्ही काय बोललो का? आमच्या सगळ्याच अधिकाऱ्यांवर गदा आणता.

**प्र. सचिव :-**

१ ते १६७ पदांचे व १ ते १६ पानाचे परिशिष्ट सुचक प्रफुल्ल पाटील आणि अनुमोदन शशिकांत भोईर ह्यांनी सचिव कार्यालयाकडे दिलेले आहेत.

**ठराव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका दि. २८.०२.२००२ रोजी अस्तित्वात आली. तत्कालीन आस्थापना सचिव यापूर्वी वर्ग - १ चे पद, वर्ग-२ ची ९ पदे, वर्ग-३ ची २८६ पदे व वर्ग - ४ ची, १५१३ पदे अशा एकुण १८०९ पदोना महानगरपालिका आस्थापना सुचीवर वर्ग करण्यास व महानगरपालिकेकरीता नव्याने वर्ग-१ ची १८ पदे, वर्ग-२ ची ४५ पदे, वर्ग-३ ची ३२५ पदे, वर्ग-४ ची ४३२ पदे अशी एकुण ८२० अतिरीक्त पदे तातडीने मंजूर करण्यासाठी नविन कर्मचारी आकृतीबंध मंजूरी प्रस्ताव दिनांक २९.४.२००२ रोजी प्रशासकीय ठराव क्र. ७१ अन्वये मंजूर करुन शासनाच्या मान्यतेस पाठविला होता. सदर प्रस्तावात वर्ग-१ ची सर्व पदे प्रतिनियुक्तीवर भरण्यास शिफारस केली होती. महाराष्ट्र शासनाने नगरविकास विभाग मंत्रालय शासन निर्णय क्र. एमबीएमसी-२००२/१७७३/प्र क्र १६३ /न.वि. - २५, दि. ३१.१०.२००२ अन्वये वर्ग-१ ची ११ पदे, वर्ग-२ ची २९ पदे, वर्ग-३ ची २५ पदे, व वर्ग-४ ची ५ पदे या सर्व पदांना मान्यता दिली. परंतु शासनाने आयुक्त, शहर अभियंता, नगरसचिव व मुख्य लेखा परीक्षक ही पदे संविधानिक असल्याने शासनाच्या मान्यतेच्या अधीन राहून योग्य उमेंदवारांची नियुक्ती करण्यास मंजुरी दिली. व वर्ग-१ मधील इतर पदे प्रतिनियुक्तीवर घेण्याचे कोणतेही आदेश पारीत केले नाहीत. तसेच सदर शासन निर्णयाद्वारे महानगरपालिकेने आस्थापनेवरील सर्व पदांसाठी सेवा प्रवेश नियम तात्काळ तयार करुन शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणे बाबत आदेश दिले होते.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने दिनांक ३१.१०.२००२ ते आजतागायत मंजुर पदांवर व आकृतीबंधातील उर्वरीत तसेच महानगरपालिकेने सुरु केलेल्या परिवहन सेवेत व शिक्षण विभागात भरावयाच्या पदांसाठी सेवा प्रवेश नियम तयार केले नव्हते.

मंजुर पदांवर तसेच मंजुरी व मान्यवेच्या अधीन असलेल्या नवीन अतिरीक्त पदांवर सरळसेवा व पदोन्नतीद्वारे नेमणुका आहेत. विविध संवर्गातील वर्ग-१, वर्ग-२ ची पदे न भरल्याने ग्रामपंचायत व नगरपालिका कालावधीपासून आस्थापनेमध्ये शैक्षणिक पात्रता व अर्हता तसेच अनुभव धारण करणा-या तसेच सचोटीने व प्रामाणिकपणे कार्यरत असलेल्या कार्यक्षम कर्मचा-यांना पदोन्नतीपासून वंचित रहावे लागत आहे.

शासनाच्या आदेशानुसार मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम, १९४९ चे कलम (१), (२), (३), व ५४(५) व ४५७(३)(अ) व (ब) मध्ये विहीत केलेल्या सर्व अधिकारांचा वापर करून मिरा भाईंदर महानगरपालिकेने 'मिरा भाईंदर महानगरपालिका सेवाप्रवेश नियम - २००५' तयार केलेले आहेत. सदर नियमांद्वारे नेमणुकीच्या पध्दती निश्चित करुन प्रत्येक पदास संवर्गनिहाय शैक्षणिक पात्रता व अर्हता, अनुभव व सेवा जेष्ठता निश्चित केली आहे. सदर मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा प्रवेश नियम २००५ या नियमांना ही सभा मंजुरी देत असून सदर नियम दिनांक १२.०८.२००५ पासून अंमलात आणण्यास व सदर नियमाद्वारे २ उपायुक्त, १ मुख्य लेखा परिक्षक, १ वैद्यकीय अधिकारी, १ सहाय्यक संचालक (नगररचना) ही पदे प्रतिनियुक्तीवर भरण्यात यावी व उर्वरीत पदांवर मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत असलेल्या, शैक्षणिक पात्रता, अर्हता, अनुभव व सेवा जेष्ठता नुसार पात्र ठरणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांस पदोन्नती देण्यात यावी. व सदरचे सेवाप्रवेश / सेवा भरती नियम शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात यावेत.

**ठरावाच्या बाजूने असलेले सदस्य**

१) श्री. अनंत रामचंद्र पाटील
२) श्रीम. म्हात्रे संगीता विजय
३) श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर
४) श्रीम. म्हात्रे नयना गजानन
५) श्री. अग्रवाल धनराज नंदलाल
६) श्री. ओमप्रकाश गंगाधरजी अग्रवाल
७) श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश
८) श्री. सिंग मदन उदितनारायण
९) श्री. रोहिदास शंकर पाटील
१०) श्री. भोईर गजानन लक्ष्मण
११) श्रीम. पाटील लिला गुरुनाथ
१२) श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ
१३) श्री. पाटील अशोक पांडुरंग
१४) श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन
१५) श्री. जेम्स कोलासो इजिदोर
१६) श्री. पाटील रतन कृष्णा
१७) श्री. शरद केशव पाटील
१८) श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत
१९) श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर

२०) श्रीम. नाईक शुभांगी सिताराम
२१) श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र
२२) श्रीम. शाह रक्षा एस.
२३) श्री. रमेश धरमचंद जैन

**ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य**

१) श्रीम. निर्मला बाबुराव सावळे
२) श्री. चंद्रकांत सिताराम वैती
३) श्री. पाटील मोहन मधुकर
४) श्री. कोलासो लिओ इजिदोर
५) श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस
६) श्रीम. सपार उमा विश्वनाथ
७) श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी
८) श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज
९) श्री. चिंतामण कमलाकर पाटील
१०) श्रीम. ज्युडी थॉमस डिसोझा
११) श्री. शेख आसिफ गुलाब
१२) श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ
१३) श्रीम. प्रभात प्रकाश पाटील
१४) श्रीम. पाटील सुनिता कैलास
१५) श्री. पाटील जयंत महादेव
१६) श्रीम. वाडे जिवी हिरा
१७) श्रीम. अनिता जयवंत पाटील
१८) श्री. आसिफ गुलाम पटेल
१९) श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड
२०) श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी
२१) श्री. खान शफीक अहमद
२२) श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन
२३) श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन
२४) श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट
२५) श्री. कुरेशी याकुब इस्माईल
२६) श्रीम. उर्मिला कोमल भामरे
२७) श्रीम. चौहाण महेंद्रसिंग
२८) श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर
२९) श्री. प्रेमनाथ गजानन पाटील
३०) श्री. मेहता नरेंद्र
३१) श्री. म्हात्रे तुळशीदास दत्तू
३२) श्री. पाटील मिलन गोविंदराव

**प्र. सचिव :-**

प्रकरण क्र. २७ करिता सुचक प्रफुल्ल पाटील आणि अनुमोदन शशिकांत भोईर ह्यांचा मी ठराव वाचलेला आहे. ह्या ठरावाच्या बाजूने एकूण २३ सदस्य आहेत व ठरावाच्या विरोधात एकूण ३२ सदस्य आहेत व जो पहिला ठराव आला आहे त्याचे वाचन करतो.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य मिलनजी पाटील आणि सन्मा. सदस्या सुरेखाजी गायकवाड ह्यांनी जो ठराव आपल्याला दिलेला आहे त्याचे वाचन करण्याची आवश्यकता नाही. त्या ठरावाचे वाचन केलेले आहे.

**प्र. सचिव :-**

ठराव हे वाचायला पाहिजे.

**ठराव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर यापुर्वी प्रशासकिय ठराव क्र. ७१, दि. २९/०४/२००२ ने पदनिर्मिती प्रस्तावास मंजुरी दिली असून त्यानुसार नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई, शासन निर्णय क्र. एग्क/२००२/१७७३/प्र.क्र.१६३/नवि-२५, दि. ३१/१०/२००२ अन्वये वर्ग-१ ची ११, वर्ग-२ ची २९ पदे मंजुर

झालेली आहेत. त्या मंजुर पदांपैकी काही तांत्रिक व ज्या पदांची शैक्षणिक पात्रता यापुर्वी शासनाकडून ठरवून दिलेली होती ती पदे आस्थापनेवर सरळसेवा व प्रतिनियुक्तीने भरण्यांत आलेली आहेत. उर्वरीत पदे ''**मिरा भाईंदर महानगरपालिका नेमणुकीसाठी अर्हता आणि त्या जागांवर नेमणुक करण्याची पद्धती (सेवानियम)**'' तयार नसल्यामुळे अद्यापपर्यंत पदे भरण्याची कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे ग्रामपंचायत व नगरपालिका कालावधीपासून कार्यक्षमरित्या व सचोटिने प्रामाणिकपणे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीपासुन वंचीत रहावे लागत आहे. तसेच पदोन्नती देतांना कर्मचारी थेट भरती सेवेतून आला आहे की, बढती घेऊन आला आहे याचा विचार न करता सेवाजेष्ठतेचा निकष लावावा असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेला आहे.

महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उपलब्ध असलेल्या अधिकारी, कर्मचारी वर्गामधून वर्ग-१ ची ४ पदे व वर्ग-२ ची २३ पदे ही कर्मचाऱ्यांमधूनच भरण्यात यावीत. त्यानुसार सोबत जोडलेल्या यादीनुसार ''**मिरा भाईंदर महानगरपालिका नेमणुकीसाठी अर्हता आणि त्या जागांवर नेमणुक करण्याची पद्धती (सेवानियम)**'' तयार करुन प्रत्येक पदास संवर्ग निहाय शैक्षणिक पात्रता, अनुभव, सेवाजेष्ठता निश्चित केली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५, ४५(३), ५३(१), ४५७(३), ४६५(१)(अ) कलमानुसार ''**मिरा भाईंदर महानगरपालिका नेमणुकीसाठी अर्हता आणि त्या जागांवर नेमणुक करण्याची पद्धती (सेवानियम)**'' तयार केलेले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी यांचे जवळ प्रशासकीय कामकाजाचा असलेला अनुभव, प्रदिर्घ काळापासून करत असलेली सेवा, कर्मचाऱ्यांचा सेवाकाळ याचा विचार करता अशा कर्मचाऱ्यांना देखील पदोन्नती देणे आवश्यक आहे. शासनस्तरावर देखील कर्मचाऱ्यांची सेवाजेष्ठता, सेवाकाळ ध्यानी घेवून (जरी पदवीधर नसला तरीही) पदोन्नती दिली जाते. तसेच पदोन्नती देतांना थेट भरतीतून बढती घेऊन आला आहे किंवा कसे याचा विचार न करता सेवाजेष्ठता व अर्हता परिक्षा प्रथम उत्तीर्ण होणाऱ्या कर्मचाऱ्यांना परिशिष्ठ 'अ' व 'ब' प्रमाणे निकष लावावा. सेवाजेष्ठता यामध्ये कामगार न्यायालय व औद्योगिक न्यायालय यामध्ये कोणतेही वाद निर्माण होऊ नये. याकरिता सेवाप्रवेश मंजुर करतांना अनुभवी सेवाजेष्ठता व पात्रता कर्मचाऱ्यांचाच प्राधान्याने विचार करावा. या सर्व बाबींचा विचार करुन मा. स्थायी समिती सभा दि. २६/०७/२००५, ठराव क्र. ७१ अन्वये शिफारस करण्यांत आलेल्या ''**मिरा भाईंदर महानगरपालिका नेमणुकीसाठी अर्हता आणि त्या जागांवर नेमणुक करण्याची पद्धती (सेवानियम)**'' ह्यास सोबतच्या दुरुस्तीनुसार मान्यता देण्यांत येत आहे. कलम ४५(४) अन्वये सदरचे सेवानियम शासनाकडे मान्यतेसाठी पाठवावे. मा. महासभेने मंजुर केलेले नियमांचे अधिन राहून सेवाजेष्ठता निकष पाहून प्रशासनाने तात्काळ लायक उमेदवारांना पदोन्नती द्यावी व त्या पदांची नियमानुसार वेतनश्रेणी (अनुज्ञेय) तात्काळ देण्यात यावी. त्याचप्रमाणे सदर ठरावाची त्वरील अंमलबजावणी करुन महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचारी वर्गात पदोन्नती देण्यांत यावी अशी मा. महासभा मंजुरी देत आहे.

मिरा भाईंदर शहराचा विकास झपाट्याने होत असून महानगरपालिकेचा कारभार मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे व भविष्यात देखील वाढणार आहे. प्रशासकीय कामकाज परिणामकारक होण्यासाठी सध्या असलेला कर्मचारी वर्ग अपुरा पडत आहे. प्रशासकीय काम गतिमान व लोकाभिमुख होण्याच्या दृष्टीने महापालिकेसाठी अधिक अधिकारी व कर्मचारी वर्गाची आवश्यकता आहे. महापालिकेचे कामकाज गतिमान होण्याच्या दृष्टीने खालील पदनिर्मिती करणे आवश्यक आहे.

| **अ.क्र.** | **पदाचे नांव** | **वर्ग** | **प्रस्तावित पदे मंजुरीकरिता** |
|---|---|---|---|
| १) | उपायुक्त | वर्ग-१ | ०१ |
| २) | सहा. सार्वजनिक आरोग्य अधिकारी | वर्ग-२ | ०२ |
| ३) | सर्व्हेअर | वर्ग-३ | ०१ |
| ४) | उद्यान विद्या सहाय्यक | वर्ग-३ | ०१ |
| ५) | अन्न निरिक्षक | वर्ग-२ | ०१ |
| ६) | वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक | वर्ग-३ | ०१ |
| ७) | वरीष्ठ सर्व्हेअर | वर्ग-३ | ०१ |
| ८) | मुख्य सर्व्हेअर | वर्ग-२ | ०१ |
| | **एकूण** | | **०९** |

तसेच प्रशासकिय कालावधीत प्रशासकिय ठराव क्र. ७१ दि. २९/०४/२००२ ने मंजुर केलेल्या पदनिर्मिती प्रस्तावास सदर प्रस्तावात नमुद केलेल्या पदांपैकी खालील पदांची अत्यंत आवश्यकता असून ती तातडीने मंजूर करणेसाठी शासनाला विनंती करावी.

| अ.क्र. | पदाचे नांव | वर्ग | प्रस्तावित पदे मंजुरीकरिता |
|---|---|---|---|
| १) | सहाय्यक आयुक्त | वर्ग-२ | ०२ |
| २) | क्रिडा अधिकारी | वर्ग-२ | ०१ |
| ३) | हेडक्लार्क | वर्ग-२ | ०५ |
| ४) | पर्चेस ऑफीसर (पाणी पुरवठा) | वर्ग-२ | ०१ |
| ५) | सादरकर्ता अधिकारी | वर्ग-२ | ०१ |
| | **एकूण** | | **१०** |

यासाठी होणाऱ्या वित्तीय खर्चाला मंजुरी देण्यांत येत आहे.

**ठरावाच्या बाजूने असलेले सदस्य**

१) श्रीम. निर्मला बाबुराव सावळे
२) श्री. चंद्रकांत सिताराम वैती
३) श्री. पाटील मोहन मधुकर
४) श्री. कोलासो लिओ इजिदोर
५) श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस
६) श्रीम. सपार उमा विश्वनाथ
७) श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी
८) श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज
९) श्री. चिंतामण कमलाकर पाटील
१०) श्रीम. ज्युडी थॉमस डिसोझा
११) श्री. शेख आसिफ गुलाब
१२) श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ
१३) श्रीम. प्रभात प्रकाश पाटील
१४) श्रीम. पाटील सुनिता कैलास
१५) श्री. पाटील जयंत महादेव
१६) श्रीम. वाडे जिवी हिरा
१७) श्रीम. अनिता जयवंत पाटील
१८) श्री. आसिफ गुलाम पटेल
१९) श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड
२०) श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी
२१) श्री. खान शफीक अहमद
२२) श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन
२३) श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन
२४) श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट
२५) श्री. कुरेशी याकुब इस्माईल
२६) श्रीम. उर्मिला कोमल भामरे
२७) श्रीम. चौहाण महेंद्रसिंग
२८) श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर
२९) श्री. प्रेमनाथ गजानन पाटील
३०) श्री. मेहता नरेंद्र
३१) श्री. म्हात्रे तुळशीदास दत्तू
३२) श्री. पाटील मिलन गोविंदराव

**ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य**

१) श्री. अनंत रामचंद्र पाटील
२) श्रीम. म्हात्रे संगीता विजय
३) श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर
४) श्रीम. म्हात्रे नयना गजानन
५) श्री. अग्रवाल धनराज नंदलाल
६) श्री. ओमप्रकाश गंगाधरजी अग्रवाल
७) श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश
८) श्री. सिंग मदन उदितनारायण
९) श्री. रोहिदास शंकर पाटील
१०) श्री. भोईर गजानन लक्ष्मण
११) श्रीम. पाटील लिला गुरुनाथ
१२) श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ
१३) श्री. पाटील अशोक पांडुरंग
१४) श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन
१५) श्री. जेम्स कोलासो इजिदोर
१६) श्री. पाटील रतन कृष्णा
१७) श्री. शरद केशव पाटील
१८) श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत
१९) श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर
२०) श्रीम. नाईक शुभांगी सिताराम
२१) श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र
२२) श्रीम. शाह रक्षा एस.
२३) श्री. रमेश धरमचंद जैन

**गजानन भोईर :-**

दिलेली दुरुस्ती वाचून दाखवा. ठराव काय केला हे आम्हांला कसे समजेल. आपण दुरुस्ती काय केली ती वाचून दाखवा.

**प्र. सचिव :-**

सदर ठरावाच्या बाजूने एकूण ३२ आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

सचिव साहेब, दुरुस्ती ज्या पानावर घेतली आहे ते पान क्रमांक आपण आम्हांला सांगा आणि एकूण पान सांगा. असे नाही चालत, खरं म्हणजे सगळं वाचायला लागते. मतदानाची प्रक्रियाच तशी आहे. कुठल्या कुठल्या पानावर दुरुस्ती घेतलेली आहे. ती एकूण पान सांगा आणि एकूण पदे किती आहेत तेही सांगा.

**प्र. सचिव :-**

एकूण पान ६८ आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

एकूण पदे किती आहेत?

**प्र. सचिव :-**

एकूण पदे एकत्रित आलेली नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

पान क्र. ६८ पर्यंत एकूण पदे लिहिलेली नाही आणि वेतनश्रेणीही नाही.

**प्र. सचिव :-**

वेतनश्रेणी नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

ते आपण प्रोसिडींगमध्ये नमुद करा.

**प्र. सचिव :-**

दुरुस्तीची पान क्रमांक सांगतो, पान क्र. १३, २०...

**गजानन भोईर :-**

सचिव साहेब, पान क्र. १३ वर आपण दुरुस्ती काय आहे ते सांगा. आम्ही तसे लिहून घेतो. प्रत्येक पेजवरची दुरुस्ती सांगा.

**प्र. सचिव :-**

पान क्र. २४.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

जो पान नंबर मे दुरुस्ती दी है उतना ही बता दिजीए।

**लिओ कोलासो (मा. सभागृह नेता सो.) :-**

मा. महापौर मॅडम, दुरुस्तीचे असे होणार असेल तर सचिव साहेब, मी आपले वेळेकडे लक्ष वेधू इच्छितोय की, त्याच्यासाठी आपल्याला सभागृहाची वेळ वाढवायला पाहिजे.

**प्र. सचिव :-**

वेळ वाढवता येणार नाही.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सभागृहाला विनंती करतो आहे की, मतदानाकरिता आपल्याला आपली संख्या लक्षात आलेली आहे आणि सायं. ७.०० वा. सभा संपवण्याचे आपले संकेत आहेत तर त्यासाठी आपण जर उशिरा करत असाल तर हे अतिशय चुकीचे आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

आमची संख्या तुम्ही धरुन टाका आणि पान क्रमांक द्या.

**मा. उपमहापौर :-**

पान क्रमांक दिले आहे. पण अट्टाहास नको. आपले कर्मचाऱ्यांविषयी एवढे प्रेम, औदार्य दिसले ही आनंदाची गोष्ट आहे.

**प्र. सचिव :-**

दुरुस्तीचे पान क्रमांक प्रथमपासून सांगतोय, पान क्र. १३,२०,

**गजानन भाईर :-**

पान क्र. १७ वर दुरूस्ती करतो असे उपमहापौर साहेब बोलले.

**रोहित सुवर्णा :-**

ओ.बी.सी., एस.बी.सी. आणि अपंग घेणार.

**रोहिदास पाटिल :-**

ओ.बी.सी., एस.बी.सी. आणि अपंग घेणार त्यात करेक्शन करा.

**प्र. सचिव :-**

पान क्र. २०, २३, २४, २९, ३५, ३७, ३८, ४५, ५४, ५५, ५६, ५७, ५८, ६२, ६७ या ठरावाच्या जे विरोधात आहे त्यांनी उभे राहायचे.

**प्रफुल्ल पाटिल :-**

मघाशी जी संख्या होती ती संख्या द्या. तुम्हाला आम्हाला सभा संपवायची आहे.

**मा. महापौर :-**

मा. सदस्य मिलन पाटील व मा. सदस्या सुरेखा गायकवाड ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ३२ मते मिळाली आणि ठरावाच्या विरोधात २३ मते मिळाली. यामुळे दुसरा ठराव मा. सदस्य प्रफुल्ल पाटील व शशिकांत भोईर ह्यांच्या ठरावाच्या बाजूने २३ मते व विरोधात ३२ मते मिळाली. त्यामुळे सन्मा. सदस्य मिलन पाटील व सन्मा. सदस्या सुरेखा गायकवाड ह्यांनी मांडलेला ठराव हा बहुमताने मंजुर करण्यात येत आहे. ठराव वाचून मंजुर करण्यात आलेला आहे. ठराव कायम करण्यात आलेला आहे.

**प्रकरण क्र. २७ :-**

सेवाप्रवेश नियमांना मंजुरी देणे. (मा. स्थायी समिती सभेने शिफारस केलेले प्रकरण.)

**ठराव क्र. २९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर यापुर्वी प्रशासकिय ठराव क्र. ७१, दि. २९/०४/२००२ ने पदनिर्मिती प्रस्तावास मंजुरी दिली असून त्यानुसार नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई, शासन निर्णय क्र. गएग्क/२००२/१७७३/प्र.क्र.१६३/नवि-२५, दि. ३१/१०/२००२ अन्वये वर्ग-१ ची ११, वर्ग-२ ची २९ पदे मंजुर झालेली आहेत. त्या मंजुर पदांपैकी काही तांत्रिक व ज्या पदांची शैक्षणिक पात्रता यापुर्वी शासनाकडून ठरवून दिलेली होती ती पदे आस्थापनेवर सरळसेवा व प्रतिनियुक्तीने भरण्यांत आलेली आहेत. उर्वरीत पदे **''मिरा भाईंदर महानगरपालिका नेमणुकीसाठी अर्हता आणि त्या जागांवर नेमणुक करण्याची पद्धती (सेवानियम)''** तयार नसल्यामुळे अद्यापपर्यंत पदे भरण्याची कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे ग्रामपंचायत व नगरपालिका कालावधीपासून कार्यक्षमरित्या व सचोटिने प्रामाणिकपणे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीपासुन वंचीत रहावे लागत आहे. तसेच पदोन्नती देतांना कर्मचारी थेट भरती सेवेतून आला आहे की, बढती घेऊन आला आहे याचा विचार न करता सेवाजेष्ठतेचा निकष लावावा असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेला आहे.

महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उपलब्ध असलेल्या अधिकारी, कर्मचारी वर्गामधून वर्ग-१ ची ४ पदे व वर्ग-२ ची २३ पदे ही कर्मचाऱ्यांमधूनच भरण्यात यावीत. त्यानुसार सोबत जोडलेल्या यादीनुसार **''मिरा भाईंदर महानगरपालिका नेमणुकीसाठी अर्हता आणि त्या जागांवर नेमणुक करण्याची पद्धती (सेवानियम)''** तयार करुन प्रत्येक पदास संवर्ग निहाय शैक्षणिक पात्रता, अनुभव, सेवाजेष्ठता निश्चित केली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५, ४५(३), ५३(१), ४५७(३), ४६५(१)(अ) कलमानुसार **''मिरा भाईंदर महानगरपालिका नेमणुकीसाठी अर्हता आणि त्या जागांवर नेमणुक करण्याची पद्धती (सेवानियम)''** तयार केलेले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी यांचे जवळ प्रशासकीय कामकाजाचा असलेला अनुभव, प्रदिर्घ काळापासून करत असलेली सेवा, कर्मचाऱ्यांचा सेवाकाळ याचा विचार करता अशा कर्मचाऱ्यांना देखील पदोन्नती देणे आवश्यक आहे. शासनस्तरावर देखील कर्मचाऱ्यांची सेवाजेष्ठता, सेवाकाळ ध्यानी घेवून (जरी पदवीधर नसला तरीही) पदोन्नती दिली जाते. तसेच पदोन्नती देतांना थेट भरतीतून बढती घेऊन आला आहे किंवा कसे याचा विचार न करता सेवाजेष्ठता व अर्हता परिक्षा प्रथम उत्तीर्ण होणाऱ्या कर्मचाऱ्यांना परिशिष्ठ 'अ' व 'ब' प्रमाणे निकष लावावा. सेवाजेष्ठता यामध्ये कामगार न्यायालय व औद्योगिक न्यायालय यामध्ये कोणतेही वाद निर्माण होऊ नये. याकरिता सेवाप्रवेश मंजुर करतांना अनुभवी सेवाजेष्ठता व पात्रता कर्मचाऱ्यांचाच प्राधान्याने विचार करावा. या सर्व बाबींचा विचार करुन मा. स्थायी समिती सभा दि. २६/०७/२००५, ठराव क्र. ७१ अन्वये शिफारस करण्यांत आलेल्या **''मिरा भाईंदर महानगरपालिका नेमणुकीसाठी अर्हता आणि त्या जागांवर नेमणुक करण्याची पद्धती (सेवानियम)''** ह्यास सोबतच्या दुरुस्तीनुसार मान्यता देण्यांत येत आहे. कलम ४५(४) अन्वये सदरचे सेवानियम शासनाकडे मान्यतेसाठी पाठवावे. मा. महासभेने मंजुर केलेले नियमांचे अधिन राहून सेवाजेष्ठता निकष पाहून प्रशासनाने तात्काळ लायक उमेदवारांना पदोन्नती द्यावी व त्या पदांची नियमानुसार वेतनश्रेणी (अनुज्ञेय) तात्काळ देण्यात यावी. त्याचप्रमाणे सदर ठरावाची त्वरील अंमलबजावणी करुन महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचारी वर्गात पदोन्नती देण्यांत यावी अशी मा. महासभा मंजुरी देत आहे.

मिरा भाईंदर शहराचा विकास झपाट्याने होत असून महानगरपालिकेचा कारभार मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे व भविष्यात देखील वाढणार आहे. प्रशासकीय कामकाज परिणामकारक होण्यासाठी सध्या असलेला कर्मचारी वर्ग अपुरा पडत आहे. प्रशासकीय काम गतिमान व लोकाभिमुख होण्याच्या दृष्टीने महापालिकेसाठी अधिक अधिकारी व कर्मचारी वर्गाची आवश्यकता आहे. महापालिकेचे कामकाज गतिमान होण्याच्या दृष्टीने खालील पदनिर्मिती करणे आवश्यक आहे.

| **अ.क्र.** | **पदाचे नांव** | **वर्ग** | **प्रस्तावित पदे मंजुरीकरिता** |
|---|---|---|---|
| १) | उपायुक्त | वर्ग-१ | ०१ |
| २) | सहा. सार्वजनिक आरोग्य अधिकारी | वर्ग-२ | ०२ |
| ३) | सर्व्हेअर | वर्ग-३ | ०१ |
| ४) | उद्यान विद्या सहाय्यक | वर्ग-३ | ०१ |
| ५) | अन्न निरिक्षक | वर्ग-२ | ०१ |
| ६) | वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक | वर्ग-३ | ०१ |
| ७) | वरीष्ठ सर्व्हेअर | वर्ग-३ | ०१ |
| ८) | मुख्य सर्व्हेअर | वर्ग-२ | ०१ |
| | **एकूण** | | **०९** |

तसेच प्रशासकिय कालावधीत प्रशासकिय ठराव क्र. ७१ दि. २९/०४/२००२ ने मंजुर केलेल्या पदनिर्मिती प्रस्तावास सदर प्रस्तावात नमुद केलेल्या पदांपैकी खालील पदांची अत्यंत आवश्यकता असून ती तातडीने मंजूर करणेसाठी शासनाला विनंती करावी.

| **अ.क्र.** | **पदाचे नांव** | **वर्ग** | **प्रस्तावित पदे मंजुरीकरिता** |
|---|---|---|---|
| १) | सहाय्यक आयुक्त | वर्ग-२ | ०२ |
| २) | क्रिडा अधिकारी | वर्ग-२ | ०१ |
| ३) | हेडक्लार्क | वर्ग-२ | ०५ |

| अ.क्र. | पदाचे नांव | वर्ग | प्रस्तावित पदे मंजुरीकरिता |
|---|---|---|---|
| ४) | पर्चेस ऑफीसर (पाणी पुरवठा) | वर्ग-२ | ०१ |
| ५) | सादरकर्ता अधिकारी | वर्ग-२ | ०१ |
| | **एकूण** | | **१०** |

यासाठी होणाऱ्या वित्तीय खर्चाला मंजुरी देण्यांत येत आहे.

**ठरावाच्या बाजूने असलेले सदस्य**

१) श्रीम. निर्मला बाबुराव सावळे
२) श्री. चंद्रकांत सिताराम वैती
३) श्री. पाटील मोहन मधुकर
४) श्री. कोलासो लिओ इजिदोर
५) श्रीम. आल्मेडा जेन्वी युस्टस
६) श्रीम. सपार उमा विश्वनाथ
७) श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी
८) श्री. बोर्जीस हॅरल जॉर्ज
९) श्री. चिंतामण कमलाकर पाटील
१०) श्रीम. ज्युडी थॉमस डिसोझा
११) श्री. शेख आसिफ गुलाब
१२) श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ
१३) श्रीम. प्रभात प्रकाश पाटील
१४) श्रीम. पाटील सुनिता कैलास
१५) श्री. पाटील जयंत महादेव
१६) श्रीम. वाडे जिवी हिरा
१७) श्रीम. अनिता जयवंत पाटील
१८) श्री. आसिफ गुलाम पटेल
१९) श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड
२०) श्री. चंद्रकांत भिकालाल मोदी
२१) श्री. खान शफीक अहमद
२२) श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन
२३) श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन
२४) श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट
२५) श्री. कुरेशी याकुब इस्माईल
२६) श्रीम. उर्मिला कोमल भामरे
२७) श्रीम. चौहाण महेंद्रसिंग
२८) श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर
२९) श्री. प्रेमनाथ गजानन पाटील
३०) श्री. मेहता नरेंद्र
३१) श्री. म्हात्रे तुळशीदास दत्तू
३२) श्री. पाटील मिलन गोविंदराव

**ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य**

१) श्री. अनंत रामचंद्र पाटील
२) श्रीम. म्हात्रे संगीता विजय
३) श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर
४) श्रीम. म्हात्रे नयना गजानन
५) श्री. अग्रवाल धनराज नंदलाल
६) श्री. ओमप्रकाश गंगाधरजी अग्रवाल

७) श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश
८) श्री. सिंग मदन उदितनारायण
९) श्री. रोहिदास शंकर पाटील
१०) श्री. भोईर गजानन लक्ष्मण
११) श्रीम. पाटील लिला गुरुनाथ
१२) श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ
१३) श्री. पाटील अशोक पांडुरंग
१४) श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन
१५) श्री. जेम्स कोलासो इजिदोर
१६) श्री. पाटील रतन कृष्णा
१७) श्री. शरद केशव पाटील
१८) श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत
१९) श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर
२०) श्रीम. नाईक शुभांगी सिताराम
२१) श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र
२२) श्रीम. शाह रक्षा एस.
२३) श्री. रमेश धरमचंद जैन

(ठराव मतदानाच्यावेळी एकूण ५५ सदस्य सभागृहात उपस्थित होते.)

| | | |
|---|---|---|
| ठरावाच्या बाजूने असलेले सदस्य | :- | ३२ |
| ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य | :- | २३ |
| ठरावात तटस्थ असलेले सदस्य | :- | ०० |
| एकूण सदस्य | :- | **५५** |

**सुचक :- श्री. मिलन पाटील.** **अनुमोदन :- श्रीम. सुरेखा गायकवाड.**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

वेळे अभावी सदरची सभा तहकूब करण्यात येत आहे. दि. २३ तारखेला विशेष सभा लावली आहे, त्या विशेष सभेमध्ये दोन विषय आहेत ते विषय संपल्यानंतर ह्या तहकूब सभेचे पुढील विषय त्या सभेत घेण्यात येतील.

**सभा तहकुब झाल्याची वेळ :- सायं ७.०० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**